




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, रविवार २८ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४










## विजेच्या धक्क्याने शेतकरी पितापुत्रासह 4 ठार

**तुळजापूर /प्रतिनिधी-**तुळजापूर तालुक्यातील मौजे केशेगाव शिवारात शनिवारी दुपारी घडलेल्या भीषण विद्युत अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला. बोअरमधील मोटार काढण्याचे काम सुरू असताना कप्पीचा महावितरणच्या जिवंत विद्युत तारेस स्पर्श झाल्याने दोन पितापुत्रांसह चार जणांचा तीव्र विद्युत धक्क्याने जागीच मृत्यू झाला. या दुर्देवी घटनेमुळे केशेगाव व परिसरात शोककळा पसरली आहे. ही घटना शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास घडली. केशेगाव येथील शेतकरी गणपती साखरे यांच्या



शेतातील बोअरमधून मोटार बाहेर काढण्यासाठी कप्पीच्या सहाय्याने काम सुरू होते. याच दरम्यान कप्पीचा अचानक महावितरणच्या जिवंत विद्युत तारेस स्पर्श झाला आणि काम करणारे सर्वजण विजेच्या प्रवाहाच्या कचाट्यात सापडले.या अपघातात काशिम कोंडीबा फुलारी (वय ५४), रतन काशिम फुलारी (वय १६),नागनाथ काशिनाथ साखरे (वय ५५) आणि रामलिंग नागनाथ साखरे (वय ३१) सर्व रा. केशेगाव, ता. तुळजापूर,यांचा जागीच मृत्यू झाला.

## जम्मू काश्मीरात 30 ते 35 दहशतवादी लपल्याची शंका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जम्मू काश्मीरच्या चिल्लई कलान भागातील हिवाळा आणि मुसळधार बर्फवृष्टी दरम्यान भारतीय सैन्याने किश्तवाड आणि दोडा जिल्ह्यांमध्ये दहशतवादविरोधी कारवाया तीव्र केल्या आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, हिवाळी हवामान आणि कठीण भूभाग असूनही, पाकिस्तान समर्थित दहशतवादी या ठिकाणी घुसखोरीचा प्रयत्न करत असल्याने त्यांना सुरक्षित आश्रयस्थान मिळू नये म्हणून लष्कराने उंच आणि बर्फाच्छादित भागात आपली गस्त वाढवली आहे. कडाक्याच्या थंडीचा फायदा घेउन लपण्याचा प्रयत्न करणा-या पाकिस्तानी दहशतवाद्यांना संपवण्यासाठी ही शोध मोहीम सातत्याने राबवली जात आहे.जम्मू प्रदेशात अंदाजे ३० ते ३५ पाकिस्तानी दहशतवादी लपल्याचा संशय आहे. सततच्या दबावामुळे या दहशतवाद्यांना आता लोकवस्तीच्या क्षेत्रांपासून दूर उंचावर आणि एकाकी भागात आश्रय घ्यावा लागत आहे. काही दहशतवादी स्थानिकांना धमकावण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु त्यांना आता पूर्वीसारखा स्थानिक पाठिंबा मिळताना दिसत नाही असे वृत्त आहे.

## नागपूर येथे दोघांची आत्महत्या

**नागपूर/ प्रतिनिधी-**नागपूर येथील वर्धा रोड स्थित हाटेल रोयाल व्हिलामध्ये आई आणि मुलाने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. घटनेत मुलाचा मृत्यू झाला तर आई गंभीर आहे. आईचे नाव जयंती तर मुलाचे नाव सूरज आहे. दोघेही बंगळुरू येथील रहिवासी आहेत. सूरजचे २६ वर्षीय गानवी उर्फ राशीसोबत लग्न झाले होते. सूरजची पत्नी गानवी हिने बंगळुरूमध्ये बुधवार, २४ डिसेंबरच्या रात्री तिच्या आई-वडिलांच्या घरी गळफास घेतला. घरच्यांनी तिला तत्काळ खासगी रुग्णालयात दाखल केले. तिथे शर्थीचे प्रयत्न करूनही तिचा गुरुवारी मृत्यू झाला. हुंड्यासाठी (४० लाख रुपये) तिचा छळ होत असल्याचा आरोप करत मृत तरुणीच्या नातेवाईकांनी बंगळुरू येथील स्थानिक पोलिस स्टेशनसमोर आंदोलन केले होते.दरम्यान गानवीच्या मृत्यूनंतर बंगळुरूमध्ये आंदोलन सुरू असताना आई आणि मुलगा नागपुरात दाखल झाले होते. दोघांनीही स्थानिक हाटेल रोयाल विलामध्ये मुक्काम केला होता. याच हाटेलमध्ये दोघांनीही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.२६ वर्षीय गानवी उर्फ राशीने २९ ऑक्टोबर २०२५ रोजी एका खाजगी कंपनीत काम करणा-या सूरजशी लग्न केले. तिच्या कुटुंबीयांनी आरोप केला आहे की, लग्नानंतर लगेचच सूरज आणि त्याच्या कुटुंबीयांनी हुंड्यासाठी तिचा छळ करण्यास सुरुवात केली. लग्नाच्या स्वागत समारंभासाठी ४० लाख रुपयांची मागणी करीत तिचा छळ केला. मिळालेल्या माहितीनुसार, श्रीलंकेतील त्यांच्या हनिमूनदरम्यानही हा छळ सुरूच होता. त्यामुळे गानवी आपल्या माहेरी परत आली. तिथे ती नंतर गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली.






# शेतक-यांना 12 तास सोलरची मोफत वीज-मुख्यमंत्री

**अमरावती/प्रतिनिधी :** राज्यातील प्रत्येक शेतक-याच्या शेतात २०२६ पर्यंत दिवसा १२ तास सोलरची मोफत वीज पोहोचवण्याचे काम शासन करेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीतर्फे डॉ. पंजाबराव उर्फ भाउसाहेब देशमुख यांच्या १२७व्या जयंतीनिमित्त अमरावती येथे आयोजित समारंभात मुख्यमंत्री फडणवीस यांना ज्येष्ठ संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. या वेळी फडणवीस म्हणाले की, शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता व यांत्रिकीकरणाचा वापर वाढवला जात असून त्यामुळे शेती फायदेशीर ठरणे शक्य आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हवामानातील बदलांचा परिणाम कमी करता येउ शकतो. पुणे येथे झालेल्या एका कृषी कार्यक्रमात विविध कृषीआधारित स्टार्टअप पाहण्याची संधी मिळाली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने हवामानाचा अभ्यास करून पिकांवर कोणती किड येउ शकते, यासह अन्य माहिती शेतक-यांना मिळू शकते, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, शासनाने अवघ्या एका महिन्यात सर्वाधिक सौर कृषी पंप बसवण्याचा जागतिक विक्रम केला आहे. येत्या २०२६ पर्यंत राज्यातील प्रत्येक शेतक-याला दिवसा १२ तास मोफत सौर वीज देण्याचा निर्णय शासनाने निश्चित केला आहे. त्यामुळे कोरडवाहू शेती बागायतीत रूपांतरित करण्याचा मिशन शासन राबवत असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

नदीजोड प्रकल्पांतर्गत ५०० किलोमीटर नवीन नदी प्रवाह तयार करून पश्चिम महाराष्ट्रातील खारपान पट्ट्यासह दुष्काळग्रस्त भागात सिंचन सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असून, त्यामुळे शेतक-यांचे प्रश्न सुटण्यास मदत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना, स्मार्ट आणि मॅग्नेट योजनांद्वारे हजारो कोटी रुपये खर्च करून शेतक-यांना समृद्ध



करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.देशात सर्वांना अन्न देण्याची मुहूर्तमेढ डॉ. पंजाबराव उर्फ भाउसाहेब देशमुख यांनी रोवली. कृषी तंत्रज्ञानाचा विकास व्हावा, सक्षम कृषी अभ्यासक्रम तयार व्हावा, शेतीसाठी कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे आणि देशभर सशक्त कृषी विद्यापीठे उभी राहावीत, यासाठी त्यांनी कार्य केले. देशातील शेतक-यांना सावकारी कर्जातून मुक्त करण्यासाठी पहिला सावकारीविरोधी कायदा करणारे ते अग्रणी होते. चुकीच्या रूढी-परंपरांना आव्हान देत ते नेहमीच त्याविरोधात ठामपणे उभे राहत असत. भारतासह अमेरिका, जपान, सिंगापूर आदी देशांमध्ये मला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. मात्र कृषी व शिक्षण क्षेत्रात विशेष कार्य करणा-या भाउसाहेब देशमुख यांच्या नावाने मिळालेला हा पुरस्कार माझ्यासाठी सर्वांत मौल्यवान आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले

### पाठलाग करून काळोखेंवर केले 27 वार

## *आरोपींच्या निर्दयीपणाचे 'सीसीटीव्ही' फुटेज समोर*

***खोपोली/प्रतिनिधी :*** *खोपोली नगरपरिषदेच्या निवडणुकीतील नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांच्या हत्येने महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. त्या घटनेचा काळजाचा ठोका चुकवणारा सीसीटीव्ही व्हिडिओ आता समोर आला आहे. मुलाला शाळेत सोडून घरी परतणा-या मंगेश काळोखे यांच्यावर झडप घालून आरोपींनी त्यांची निर्घृणपणे केल्याचे या फुटेजमध्ये स्पष्ट दिसत आहे. व्हायरल झालेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये हत्येचा संपूर्ण घटनाक्रम कैद झाला आहे. मंगेश काळोखे आपला जीव वाचवण्यासाठी रस्त्यावरून धावत असताना दिसत आहेत, मात्र हल्लेखोरांनी त्यांना घेरले. मंगेश जमिनीवर कोसळताच तीन जणांनी त्यांच्यावर तलवार आणि कोयत्याने सपासप वार करण्यास सुरुवात केली. त्यांच्या डोक्यावर आणि चेहऱ्यावर एकापाठोपाठ तब्बल २४ ते २७ वार करण्यात आले.*



## मंगेश काळोखे यांच्या मारेक-यांवर मोक्का लावून कठोरात कठोर कारवाई करणार-एकनाथ शिंदे यांचे आश्वासन

**रायगड /प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील खोपोलीमधील शिंदेसेनेच्या नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांची काल काही हल्लेखोरांनी निघृणपणे हत्या केली. या हत्येने रायगडमधील राजकारण ढवळून निघाले आहे. रात्री उशिरापर्यंत स्थानिक नागरिकांनी पोलीस स्थानकाला घेराव घालून या प्रकरणातील आरोपींना अटक करण्याची मागणी केली. दरम्यान आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काळोखे यांच्या कुटुंबीयांची त्यांच्या घरी जाउन सांत्वनपर भेट घेतली. या भेटीत त्यांनी मंगेश काळोखे यांच्या मारेक-यांवर कठोरात कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.या भेटीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना, रायगड जिल्ह्यात यापूर्वी कधीही राजकीय वैमनस्य एवढ्या टोकाला गेले नव्हते. मात्र मंगेश यांच्या



बाबतीत सुडाचे राजकारण घडले. अत्यंत क्रूरपणे त्यांची हत्या करण्यात आली. माझे या संपूर्ण केसवर पूर्ण लक्ष आहे. मंगेश काळोखे यांच्या हत्येला जे कुणी जबाबदार असतील त्यांना सोडणार नाही. या प्रकरणातील काही आरोपींना पोलिसांनी अटक केली असून, इतरांचा शोध सुरू आहे. त्यांच्यावर मोक्का सारखे गुन्हे दाखल करू, या हत्येचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवू, चांगल्या सरकारी वकिलांची नेमणूक करून आरोपींना फासावर वाढवण्यासाठी प्रयत्न करू. असे सांगितले. तसेच या प्रकरणी काळोखे कुटुंबाला लवकरात लवकर न्याय मिळवून देण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करू असेही स्पष्ट केले. यानंतर खोपोली पोलिस स्टेशनला घेराव घालून बसलेल्या शिवसैनिक आणि स्थानिक ग्रामस्थांचीही त्यांनी भेट घेतली. यावेळी त्यांच्याशी संवाद साधून या प्रकरणातील सात आरोपींना अटक केली असून, अन्य आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. त्यांनाही लवकरच अटक करून कुणालाही पाठीशी घालण्यात येणार नाही असे सांगितले. तसेच या प्रकरणी गुन्हा दाखल करून घेण्यात हयगय करणा-या पोलीस अधिका-यांवर कारवाई केली जाईल असे सांगितले. या घटनेत काळोखे कुटुंबाच्या पाठीशी शिंदेसेना ठामपणे उभी असून, त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळत नाही तोवर स्वस्थ बसणार नाही असेही सांगितले.

## राजकारण पेटले! कर्नाटकमध्ये काँग्रेस सरकारची बुलडोझर कारवाई; 400 हून अधिक घरे पाडली

**बंगळुरू/वृत्तसंस्था :** बंगळुरूमध्ये ४०० हून अधिक घरं पाडल्यानंतर कर्नाटक सरकार वादाच्या भोव-यात सापडलं आहे. या कारवाईमुळे शेकडो लोक बेघर झाले असून, त्यात प्रामुख्याने मुस्लिम समुदायातील लोकांचा समावेश आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला झालेल्या या मोठ्या कारवाईमुळे राजकारण तापलं आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, २२ डिसेंबर रोजी पहाटे ४ वाजता कोगिलू गावातील फकीर कॉलनी आणि वसीम लेआउटमध्ये पाडकाम करण्यात आलं. यामुळे सुमारे ४०० कुटुंबं रस्त्यावर आली आहेत. कडाक्याची थंडी असताना ही कारवाई करण्यात आली. 'बंगळुरू सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड' (BSWML) द्वारे राबवण्यात आलेल्या या मोहिमेत ४ जेसीबी आणि १५० हून अधिक पोलीस कर्मचारी सहभागी होते. याप्रकरणी कर्नाटक सरकारने स्पष्ट केलं की, ही घरे उर्दू सरकारी शाळेजवळील तलावाकाठी सरकारी जमिनीवर बेकायदेशीरपणे बांधण्यात आली होती. मात्र रहिवाशांनी दावा केला आहे की, त्यांना कोणतीही नोटीस देण्यात आली नव्हती. पोलिसांनी त्यांना जबरदस्तीने बाहेर काढलं, त्यामुळे शेकडो लोकांना कडाक्याच्या थंडीत रस्त्यावर आली आहेत. स्थानिक प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, काही रहिवाशांनी सांगितलं की, ते गेल्या २५ वर्षांपासून या भागात राहत आहेत आणि त्यांच्याकडे आधार कार्ड आहे. तसेच बहुतेक लोक स्थलांतरित असून मजूर म्हणून काम करतात. या कारवाईविरोधात नागरिक रस्त्यावर उतरले असून निदर्शने करत आहेत.



'पुष्पा 2' प्रीमियर चेंगराचेंगरी प्रकरण

## *अल्लू अर्जुनसह 23 जण दोषी, आरोपपत्र दाखल*

**हैदराबाद/वृत्तसंस्था :** तेलंगणातील हैदराबाद पोलिसांनी संध्या ७० मिमी थिएटरमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीचा तपास पूर्ण केला आहे. २४ डिसेंबर रोजी पोलिसांनी चित्रपट अभिनेता अल्लू अर्जुन, थिएटर मालक आणि आठ बाउन्सरसह २३ जणांविरुद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. पोलिसांनी त्यांच्या आरोपपत्रात सर्वांना दोषी ठरवले आहे. आता सुनावणीनंतर न्यायालय आपला निकाल देणार आहे. हैदराबादचे पोलिस आयुक्त व्ही.सी. सज्जनार यांनी शनिवारी सांगितले की, संध्या ७० मिमी थिएटरमध्ये पुष्पा २च्या प्रीमियर दरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत एका महिलेचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे आणि न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सीपींनी सांगितले की, या प्रकरणात २३ जणांविरुद्ध आरोपपत्र (पान २ वर)




# अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रशासन सज्ज मतदान कर्मचाऱ्यांसाठी व्यापक व सखोल प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात यश

**अमरावती/प्रतिनिधी:** - अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ ही पूर्णपणे पारदर्शक, निर्भय, मुक्त व सुरळीत वातावरणात पार पडावी, यासाठी अमरावती महानगरपालिका व निवडणूक प्रशासनाच्या वतीने सर्वसमावेशक आणि काटेकोर तयारी करण्यात येत आहे. या तयारीचा एक महत्त्वाचा भाग म्हणून मतदान प्रक्रियेत थेट सहभागी असणाऱ्या मतदान केंद्राध्यक्ष तसेच मतदान केंद्राध्यक्ष १, २ व ३ या पदांवर नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने शनिवार, दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत शहरातील सांस्कृतिक भवन तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (घ्ऊघ) येथे हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पार पडले. प्रशिक्षणासाठी विविध शासकीय विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रशिक्षणात मतदान प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याची सविस्तर माहिती देण्यात आली. मतदान केंद्रावरील जबाबदाऱ्या, मतदारांची ओळख पटविण्याची पद्धत, मतदार यादी हाताळणी, मतदान प्रक्रियेदरम्यान घ्यावयाची खबरदारी, आचारसंहिता, आपत्कालीन परिस्थितीत करावयाची कार्यवाही तसेच कायदेशीर बाबी यावर मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (घ्ऊघ) येथे ईव्हीएम (न्श्) आणि व्हीव्हीपॅट यंत्रणांच्या प्रत्यक्ष हाताळणीचे सखोल व प्रात्यक्षिक स्वरूपातील प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी तहसिलदार विजय लोखंडे यांनी प्रशिक्षण दिले. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी मनोगत करतांना सांगितले की, अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ ही लोकशाहीचा महत्त्वाचा उत्सव असून ती पूर्णतः पारदर्शक, निर्भय, मुक्त व शांततामय वातावरणात पार पाडणे ही प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी




आहे. निवडणूक प्रक्रियेत मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून निवडणुकीच्या यशामध्ये त्यांचा वाटा निर्णायक असतो. मतदानाच्या दिवशी कोणतीही चूक, गोंधळ अथवा तांत्रिक अडचण निर्माण होऊ नये, यासाठी प्रशिक्षण अत्यंत आवश्यक आहे. याच उद्देशाने मतदान कर्मचाऱ्यांसाठी सखोल, शिस्तबद्ध व प्रात्याक्षिक स्वरूपातील प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. ईव्हीएम व व्हीव्हीपॅटसारख्या आधुनिक प्रणालींचे अचूक ज्ञान, नियम व कार्यपद्धतींचे पालन आणि मतदारांशी सौजन्यपूर्ण वागणूक यामुळेच निवडणूक प्रक्रिया अधिक विश्वासार्ह ठरते. प्रशिक्षणादरम्यान दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, कोणतीही शंका असल्यास तत्काळ निरसन करून घ्यावे आणि मतदानाच्या दिवशी निष्पक्ष, सजग व जबाबदार भूमिका पार पाडावी, असे आवाहन आयुक्तांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना केले आहे. अमरावती शहरातील प्रत्येक मतदाराला निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी प्रशासन पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे ही निवडणूक आदर्श व यशस्वी ठरेल, असा पूर्ण विश्वास आहे.

दरम्यान, या प्रशिक्षणाचा पुढील टप्पा २८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सांस्कृतिक भवन व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (घ्ऊघ) येथे आयोजित करण्यात आला आहे. या दुसऱ्या टप्प्यात अधिक सखोल मार्गदर्शन, शंका-निरसन तसेच प्रत्यक्ष परिस्थितीवर आधारित सराव घेण्यात येणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमास निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रीमती श्रद्धा बबन उदावंत (उत्तर झोन क्र. १, रामपुरी कॅम्प),

निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अनिल भटकर (नवीन तहसील कार्यालय, मोर्शी रोड), निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रीमती दुर्गा देवरे (मध्य झोन क्र. २, राजापेठ),

निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी प्रसन्नजीत चव्हाण (पूर्व झोन क्र. ३, दस्तुरनगर), निवडणूक निर्णय अधिकारी तथा वन जमाबंदी अधिकारी विवेकानंद काळकर (महानगरपालिका शिक्षण विभाग, अंबापेठ), निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे (पश्चिम झोन क्र. ५, भाजीबाजार), निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी विवेक जाधव (दक्षिण झोन क्र. ४, बडनेरा),

तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, विविध खात्यांचे विभागप्रमुख व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रशिक्षणामुळे मतदान कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास वाढून निवडणूक प्रक्रिया अधिक कार्यक्षम, पारदर्शक व त्रुटीमुक्त पद्धतीने पार पडण्यास मदत होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रशासन पूर्णतः सज्ज असल्याचे या प्रशिक्षणातून स्पष्ट झाले आहे.

# बगीच्या मध्ये खेळणाऱ्या दोन मुलींसोबत छेडछाड

## शुभनिकेतन कॉलनी परिसरातील घटना

## हटकल्यावर वडिलांना मारहाण

**अमरावती** - गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या शुभ निकेतन कॉलनी येथील हनुमान मंदिर परिसरातील बगीचा मध्ये खेळणाऱ्या दोन मुलींसोबत आरोपी शरद नामदेव तायडे ( ५०,विलासनगर ) यानी छेडछाड करून अश्लील चाळे करण्याचा प्रयत्न केला. यावर एका मुलीचे वडिलांनी अडकले असता आरोपीने त्यांच्याशी मारहाण करून तेथून पळ काढला. घटनेची तक्रार पोलीस ठाण्यात देण्यात आलेली आहे. पोलिसांनी तपास सुरू केला आहे. माहितीनुसार शुभ निकेतन कॉलनी परिसरात राहणाऱ्या दोन मुली गुरुवारच्या सायंकाळी सहा वाजता सुमारास घरून सायकल चालवण्यासाठी निघाल्या होत्या. सायकल चालवता चालवता त्या हनुमान मंदिर येथील बगीच्या मध्ये घेण्यासाठी गेल्या. च्या मागे पांढरा रंगाची टी-शर्ट आणि निळ्या रंगाचा पॅन्ट घातलेला एक इसम बगीच्या मध्ये आला. त्याने दोन्ही मुलींसोबत जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. आरोपी शरद तायडे याने दोन्ही मुलीसोबत छेडछाड केली आणि अश्लील इशारे केले. त्यामुळे मुली घाबरल्या आणि आपल्या घराकडे धावाला लागल्या. एका मुलीने संपूर्ण घटनाक्रम वडिलांना सांगितले हे ऐकल्यावर वडिलांनी घरासमोर उभे आरोपी शरद तायडे याला त्याचे नाव आणि पत्ता विचारले आणि घटनेबद्दल विचारपूस केली असता त्याने मुलीच्या वडिलांना शिवीगाळ करून मारहाण केली. आणि तेथून पळ काढला. पोलिसांनी आरोपी विरुद्ध कलम ७५,७८ व ७९ तथा पोस्को ?क्ट ची कलम ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

## १ व १० वरिल उर्वरित

### अल्लू अर्जुनसह २३ जण

दाखल करण्यात आले आहे. यापैकी १४ जणांना अटक करण्यात आली आहे, तर अटकपूर्व जामीन मिळालेल्या नउ आरोपींना प्रक्रियेनुसार नोटीस बजावण्यात आली आहे. मात्र तपासात काही अंशी तरुटी आढळल्या आहेत. पोलीस आयुक्त व्ही.सी. सज्जनार यांनी सांगितले की, तपासादरम्यान संध्या ७० मिमी थिएटरमध्ये नियोजन, गर्दी व्यवस्थापन, सुरक्षा तैनाती आणि आंतर-एजन्सी समन्वय यामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या. या सर्व गोष्टी आरोपपत्रात नमूद करण्यात आल्या आहेत. त्यांनी सांगितले की, थिएटर व्यवस्थापन, कार्यक्रम आयोजक, खाजगी सुरक्षा कर्मचारी आणि कार्यक्रमादरम्यान मैदानाच्या व्यवस्थेसाठी जबाबदार असलेले इतर या घटनेत सहभागी होते. पोलीस आयुत्तांनी सांगितले की, २४ डिसेंबर रोजी नामपल्ली न्यायालयात १०० पानांचे आरोपपत्र दाखल करण्यात आले. या प्रकरणात जामिनावर असलेल्यांनाही नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

**अल्लू अर्जुन, मॅनेजर, बाऊन्सर्सची नावे-** पोलीस आयुत्तांनी सांगितले की, चित्रपट अभिनेता अल्लू अर्जुन, त्याचा मॅनेजर, वैयत्तिक सुरक्षा रक्षक आणि चाहत्यांच्या संघटनेचे प्रतिनिधी, थिएटर भागीदार, कर्मचारी, कार्यक्रम आयोजक आणि बाऊन्सर्स यांची आरोपपत्रात नावे आहेत. तपास अधिकाऱ्याने आरोपपत्रात प्रत्येक आरोपीची माहिती दिली आहे, ज्यामध्ये घटनेच्या वेळी ते काय करत होते आणि घटनेनंतर ते कुठे गेले होते याची माहिती दिली आहे. या सर्व गोष्टी तपशीलवार स्पष्ट केल्या आहेत.

**चेंगराचेंगरी कशी झाली?**गेल्या वर्षी अल्लू अर्जुनचा 'पुष्पा २' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. ४ डिसेंबर रोजी हैदराबादमधील चिक्कडपल्ली येथील संध्या थिएटरमध्ये या चित्रपटाचे रिलीज आयोजित करण्यात आले होते. अभिनेता अल्लू अर्जुन देखील उपस्थित राहणार होता. त्यांच्या लाडक्या अभिनेत्याची एक झलक पाहण्यासाठी चाहत्यांची मोठी गर्दी जमली होती. गर्दी इतकी वाढली की चेंगराचेंगरी झाली. ३५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आणि तिचा ८ वर्षांचा मुलगा जखमी झाला. या घटनेनंतर अल्लू अर्जुनला एक दिवस तुरुंगवासही भोगावा लागला होता.

### भाऊसाहेब राष्ट्रानिमिर्तीत योगदान

तंत्रज्ञानाची ओळख शेतकऱ्यांना करून दिली. ते कृषी क्षेत्रातील सुधारणेचे जनक आहेत. भाऊसाहेबांच्या नावाने असलेल्या पुरस्कारातून मला स्फूर्ती मिळेल म्हणून आपण हा पुरस्कार स्वीकारला असून नवीन तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमाने शेतीला कोरडवाहू पासून बागायतीपर्यंत आणण्याचा आपला प्रयत्न आहे व त्यासाठी विविध योजनांवर काम सुरु आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या सर्वच मागण्या आम्ही पूर्ण करणार आहोत सोबतच ना.भोयर यांनी मागणी केल्याप्रमाणे अमरावती येथील शिक्षण विभागाच्या सर्व विभागीय कार्यालयाला मिळून 'डॉ.पंजाबराव देशमुख' यांच्या नावाने एकच प्रशासकीय भवन तयार करता येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

**विविध शिष्यवृत्ती-** डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातील जयश्री प्रवीण चितारे व साक्षी दिलीप सोरते हिला श्रीमती विमलाबाई देशमुख अभ्यासवृत्ती, श्री शिवाजी कृषी महाविद्यालयातील कु.अश्विनी दीपकसिंग पवार व कु.ऋतुजा

भास्कर घोडके, श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयातील कु.स्वामिनी महेश धर्माळे व श्री शिवाजी कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील कु.पायल राजेंद्र देशमुख हिला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती वितरीत करण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित असलेले संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुंडकर, ॲड.जे.व्ही.पाटील पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेशदादा खोटरे, प्रा.सुभाष बनसोड, संस्थेचे सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, विजय ठोकळ, प्राचार्य डॉ.पी.एस.वायाळ, प्राचार्य अमोल महल्ले यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे संचालन डॉ.मनीष गायकवाड यांनी केले तर कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी आभार मानले.कार्यक्रमाला संस्थेचे आजीव सदस्य, आजी माजी प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, विद्यार्थी व विदर्भातून आलेले विविध जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भाजपा-शिंदे युती नक्कीच

म्हणाले की, या चर्चेचे नेतृत्व भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण करीत असून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजप नेते आशिष शेलार तसेच प्रत्येक महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख नेते हे सर्वजण एकत्रितपणे चर्चा करीत आहेत. काल रात्री पर्यंत घेतलेल्या माहितीप्रमाणे चर्चा अतिशय सकारात्मक मार्गावर आहे, अशी माहिती त्यांनी दिली. लवकरच युती संदर्भात घोषणा केल्या देण्याची माहिती त्यांनी दिलेली आहे यामुळे आता भाजपा सेना युती संदर्भात काय निर्णय होते याकडे सर्वांच्या नजरा लागलेले आहे.

### ट्रकाखाली दबल्याने तरुणाचा

तर एक गंभीर आहे. हे ट्रॅक्टर खुमाई येथील सरपंचाचे असल्याची माहिती मिळालेली आहे. ट्रॅक्टर चालवणारा नवशिका असल्याची माहिती समोर आली आहे. त्याच्याजवळ ड्रायव्हिंग लायसन्सही नव्हता. या प्रकरणात सरपंच अँड कंपनीने पोलिसांसोबत संगमत केल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे वेगवेगळ्या चर्चा परिसरात रंगलेल्या आहे. घटनेनंतर एसडीओ कार्यालयाला माहिती देण्यात आली. नंतर तलाठी राजेश मेश्राम हे शिरजगाव ठाण्यात पोहोचले. त्यांनी घटनेची माहिती दिली.

### ज्या शहरांमध्ये चांगल्या

माननीय मुख्यमंत्री यांनी बँकेने केलेल्या कामकाजाचे विवेचन करून बँकेचे कामकाज समाधानकारक असल्याचे सांगितले, ज्या शहरांमध्ये चांगल्या आर्थिक संस्था असतात या शहरांचा चांगला विकास होतो असे प्रतिपादन केले. भविष्यात बँकेने आपला व्यवसाय आणखीन वाढवावा, टेक्नॉलॉजी मध्ये वाढ करावी, नवीन चांगले ग्राहक शोधावेत. बँकेच्या सुवर्ण महोत्सवाच्या वेळी बँक आणखीन मोठी झालेली असेल अशी अपेक्षा व्यक्त करून पुढील वाटचालीसाठी बँकेत शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास बँकेचे सर्व संचालक, कर्मचारी व मा. श्री. पंकजजी भोयर (राज्यमंत्री गृह निर्माण शालेय शिक्षण सहकार व खनिकर्म महाराष्ट्र राज्य), मा. श्री. अनिलजी बोंडे (खासदार राज्यसभा) मा. श्री. बळवंतराव वानखडे (खासदार), मा. श्री. आमदार रविभाऊ राणा, मा. आमदार सौ. सुलभाताई खोडके, मा. आमदार श्री. उमेश उर्फ चंदू भाऊ यावलकर, मा. आमदार श्री. प्रवीणजी तायडे, मा. आमदार श्री. परिणय फुके, मा. आमदार श्री. संजयजी कुटे, मा. आमदार श्री. प्रतापदादा अडसड, मा. आमदार श्री. राजेशजी वानखडे, मा. आमदार श्री. केवलरामजी काळे, मा. श्री. प्रवीणभाऊ पोटे (माजी पालकमंत्री) इतर सर्वजण उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बँकेचे उपाध्यक्ष श्री प्रमोदराव कोरडे यांनी केले व त्यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. या कार्यक्रमासाठी बँकेचे सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मार्डीकर, हरणे, मेश्राम, पांडे

चांगला प्रतिसाद मिळत आहे. पहिल्या दिवशी सर्वाधिक नामांकन उचलण्यात आले होते त्यानंतर संख्या कमी होत चालली आहे. आज ६ पेक्षा अधिक नामांकन दाखल झाले आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक ७ मधून भाजपाच्या वतीने सोनाली सचिन नाईक ने अर्ज दाखल केला., प्रभाग क्रमांक १ बं मधून चंद्रकांत एकनाथराव खेडकर, प्रभाग क्रमांक २ ड मधून चंद्रकांत लक्ष्मण बोमरे भाजपा , प्रभाग क्रमांक ५ ब मधून नीता प्रमोद राऊत भाजपा, प्रभाग ५ क मधून माधुरी सुहास ठाकरे भाजपा यांच्यासह राजापेठ प्रभाग १८ मधून राहुल खंडार, दीपक दशरथ पाटील बसपा, नईम अली नियाज अली अपक्ष, मीना ओंकार चव्हाण भाजपा, ममता संदीप आवारे राष्ट्रवादी, वंदना महेंद्र कंगाले कॉँग्रेस, अर्चना मनीष पाटील राष्ट्रवादी, रजनी दीपक आमले भाजपा, अविनाश गुलाबराव मारडीकर राष्ट्रवादी, मंगेश अवधूत मनोहरे राष्ट्रवादी, रेणुका पवार राष्ट्रवादी यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

### रुग्णालयाच्या प्रसाधन

वाऱ्यासारखी पसरताच रुग्णालयातील नागरिकांनी तेथे गर्दी केली.अर्भक नेमका कोणाचा या चर्चेला सुरुवात झाली. रुग्णालयातील अधिकाऱ्यांनी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या महिलांची माहिती घेतल्यावर त्यापैकी कोणाचाही हा अर्भक नसल्याचं प्राथमिक अंदाज लावण्यात आला. घटनास्थळी पोलिसांसह अधिकाऱ्यांनी भेट देत प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे. जिल्हाधिकारी सामान्य रुग्णालयात सगळीकडे सिसिटीव्ही कॅमेरे लावलेले आहेत. मात्र या परिसरात कॅमेरे नसल्याने नेमका अर्भक कोणाचा याचा खुलासा झाला नाही. या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून केला जातं असून रुग्णालयातील कॅमेरे तपासले जातं आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### तडीपार सराईत गुन्हेगाराकडून देशी

झडतीदरम्यान आरोपीकडून एक देशी कट्टा (पिस्टल) व दोन जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. आरोपी हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर यापूर्वी गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. तसेच तो फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून शहर व ग्रामीण भागासाठी दोन वर्षांसाठी तडीपार असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणी पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे आरोपीविरुद्ध आर्म ?क्ट कलम ३/२५ सह कलम १३५ व १४२ मपोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख सुफीयान शेख इलीयास (वय : २१ वर्षे रा. बिच्छू टेकडी, गजानन नगर, वडाळी, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. आरोपीच्या ताब्यातून एक देशी कट्टा (पिस्टल) – किंमत ३५,०००, दोन जिवंत काडतूस – किंमत १,००० असा एकूण मुद्देमाल ३६,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरुध्द यापूर्वी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ व सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि महेश इंगोले व पथकातील अधिकारी व अंमलदारांनी केली.

### अनैतिक संशयातून भाजी

अवस्थेत मृतदेह आढळून आला. मृतदेहाच्या कंबरेला व पाठीला जड दगड दोरीने बांधलेले असल्याचे दिसताच ही घटना अपघात नसून निर्घृण हत्या असल्याचे स्पष्ट झाले. मृतकाचा भाऊ मोहम्मद रफी यांच्या तक्रारीवरून धारणी पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या आदेशानुसार तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीनुसार बुडा गंगाराम जांभेकर (४९) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत जबाबात विसंगती आढळताच पोलिसांनी अधिक कठोर तपास केला आणि अखेर आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिस तपासात उघड झाले की, मृतकाचे आरोपीच्या पत्नीशी अनैतिक संबंध असल्याचा संशय आरोपीला होता. याच संशयातून १९ डिसेंबर रोजी आरोपीने चिंटू ऊर्फ जुबेर याला आपल्या झोपडीवर बोलावून दोरीने गळा आवळून ठार मारले. त्यानंतर पत्नीच्या मदतीने मृतदेह विहिरीत फेकून देण्यात आला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला सहा दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. गुन्ह्यात आणखी कोणी सहभागी आहे का, याचा तपास सुरू आहे.

### राकंपा अजित पवार गटाचा

भूमिका स्पष्ट केली आहे असेही ते म्हणाले.

### श्री हव्याप्र मंडळाच्या चार विद्यार्थिनींची

पांडे (बी.ए. – तृतीय वर्ष) आणि दीपाली राऊत (बी.ए. – प्रथम वर्ष) यांचा समावेश आहे. या स्पर्धेसाठी त्यांचा सराव शिबिर २४ डिसेंबर २०२५ पासून डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे सौ. स्वाती गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. यापूर्वी पुरुष संघातही डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनचे दर्शन जाधव (बी.पी.एड. – प्रथम वर्ष) आणि यश उमेकर (बी.ए. – तृतीय वर्ष) यांची निवड झाली होती. त्यांना नितीन काळे, प्रतीक पाथरे आणि प्रणय पवार यांनी प्रशिक्षण दिले असून त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे फळ त्यांना मिळाले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव डॉ. माधुरी चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, योग विभाग प्रमुख डॉ. सुनील लाबडे, प्रा. अर्चना देशपांडे, प्रा. प्रवीण अनासाने, प्रा. संपदा आगरकर, प्रा. सागर होते आणि प्रा. सुषमा शिरभाते व योगशास्त्र विभागातील सर्व सहाय्यक प्राध्यापकांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग अमरावती**

Website :- drgion.ac.in | Email :- drgionamravati@gmail.com

प्रवेश सूचना

Seat Matrix

Constitutional Reservation Category

| Category Wise Seats | SC | ST | VJ | NT-1 | NT-2 | NT-3 | OBC | SEBC | EWS | OPEN | 15% Inst | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 03 | 02 | 01 | 01 | 01 | 01 | 04 | 04 | 04 | 22 | 7 | 60 |

शासन नियमानुसार प्रवेश देणे सुरू आहे

मो. नंबर :- 9511733784 / 8308167143 / 9970075861

प्राचार्या

## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार **बबनराव भिमरावजी गावंडे,** रा.अचलपूर, ता. अचलपूर, जि. अमरावती यांनी दि.२९/०३/२०१० रोजीचे खरेदी दस्त क्र.११६५ नुसार मौजे -परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील नझुल शिट नं.१९-डी मधील नझुल प्लॉट नं.१७०/१ भाग ज्याचे क्षेत्रफळ २६५.७९ चौ.मि. व त्यावरील बांधकाम सह हा मनोजकुमार गुलाबचंदजी जोशी यांचे कडून विकत घेतला आहे.

हयाप्रमाणे सदर खरेदी दि.२९/०३/२०१० रोजीचे दस्त क्र.११६५ चे **मुळ खरेदी दस्त** माझे पक्षकार बबनराव भिमरावजी गावंडे यांचे जवळ आहे. परंतु सदर मालमत्तेचे पूर्वीचे मुळ खरेदी दस्त जसे दि.२५/०४/२००६ रोजी दस्त अ.क्र.१२०५ चे दस्त **अ.क्र.१२०५ चे दस्त, हे या जाहीर सुचनेचा विषय असुन** सदर दस्ताचे मुळ खरेदीखत व त्याची पावती माझे पक्षकार यांचे कडून गहाळ झालेली आहे.

सदर हरविलेल्या दस्ताची रितसर दि.११/१२/२०२५ पोलीस स्टेशन परतवाडा येथे तक्रार दाखल केलेली आहे.

तरी सदर प्लॉट बाबत कोणाचोही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशिर वाद, लवाद,दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासुन १५ दिवसाचें आंत खालील पत्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

दिनांक १२/१२/२०२५
अमरावती.

ॲडव्होकेट
**राहुल व्ही.मोहोड**
प्रेरणा कॉलनी, राधा नगर,
अमरावती- ४४४६०३
मो.क्र.९०९६४६०६७०

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक /१२/२०२५

आज दि.-------------- रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत **घाटलाडकी** कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **म.कैय्युम अ.बशीर** अर्जात नमूद जन्म दिनांक **०४.०६.१९७६** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा)
४) **आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहिती वरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.**

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद मदने (सरपंच) | सही /- |
| २) अ.हफीज शेख रसुल (उपसरपंच) | सही /- |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | सही /- |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | सही /- |
| ५) अ.खालीक अ.मजीद (ग्रा.पं.सदस्य) | सही /- |

शिक्का

निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक /१२/२०२५

आज दि.-------------- रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत **घाटलाडकी** कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अ.सईम अ.बशीर** अर्जात नमूद जन्म दिनांक **२०.१२.१९७४** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा)
४) **आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहिती वरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.**

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद मदने (सरपंच) | सही /- |
| २) अ.हफीज शेख रसुल (उपसरपंच) | सही /- |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | सही /- |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | सही /- |
| ५) अ.खालीक अ.मजीद (ग्रा.पं.सदस्य) | सही /- |

शिक्का

निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक /१२/२०२५

आज दि.-------------- रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत **घाटलाडकी** कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **आशा बानो अ.बशीर** अर्जात नमूद जन्म दिनांक **१२.१०.१९७९** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा)
४) **आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहिती वरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.**

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद मदने (सरपंच) | सही /- |
| २) अ.हफीज शेख रसुल (उपसरपंच) | सही /- |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | सही /- |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | सही /- |
| ५) अ.खालीक अ.मजीद (ग्रा.पं.सदस्य) | सही /- |

शिक्का

निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक /१२/२०२५

आज दि.-------------- रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत **घाटलाडकी** कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अ.मतीन अ.बशीर** अर्जात नमूद जन्म दिनांक **२६.०१.१९८७** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा)
४) **आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहिती वरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.**

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद मदने (सरपंच) | सही /- |
| २) अ.हफीज शेख रसुल (उपसरपंच) | सही /- |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | सही /- |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | सही /- |
| ५) अ.खालीक अ.मजीद (ग्रा.पं.सदस्य) | सही /- |

शिक्का

निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, २८ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com



# पोखरा योजनेतील कथित भ्रष्टाचार उघडकीस

## पत्रकाराच्या कुटुंबास जीवे मारण्याची धमकी

■ प्रतिनिधी | रिसोड ■

**जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या शेलुखडसे येथील पत्रकार वसंत खडसे यांच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची देण्यात आली आहे. या बाबत रिसोड पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून पत्रकार यांच्या पत्नीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. रिसोडचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी तक्रार दाखल करून घेत उचित कारवाई करण्याचे आश्वासन दिले असल्याची माहिती सौ. अनिता वसंत खडसे यांनी दिली आहे.**

प्राप्त माहितीनुसार शेलुखडसे येथील पत्रकार एका वृत्तपत्रात उपसंपादक म्हणून काम करत आहेत. अन्याय, अत्याचार आणि भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवणारे पत्रकार वसंत खडसे यांनी गेल्या काही दिवसांपासून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात 'पोखरा' योजनेमधील भ्रष्टाच्या बातम्यांची वृत्तमालिका सुरू करून सबंधित प्रशासनाचे लक्ष वेधले होते. परिणामी पोकरा योजनेतील गैरप्रकाराला तोंड फुटले आणि संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. पत्रकार वसंत खडसे यांनी त्यासंदर्भात विविध बातम्या प्रकाशित करून वंचित शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी वृत्त मालिका प्रकाशित केली होती. विशेष म्हणजे त्या संदर्भात पुराव्यानिशी राज्याचे मुख्यमंत्री व प्रधान सचिव आणि सबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. त्या अनुषंगाने त्यांच्या तक्रारीची गांभीर्याने दखल घेत जिल्हाधिकारी यांनी तातडीने चौकशीचे आदेश दिले आहेत. यावर वरिष्ठ तपास अधिकाऱ्यांची तपासाठी नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार तपास अधिकारी संतोष वाळके यांचे पथक शेलुखडसे येथे दि. २६ डिसेंबर रोजी चौकशीसाठी आले होते. तक्रारीनुसार संबंधित अधिकाऱ्यांनी ज्ञानेश्वर गजानन खडसे व संजय गजानन खडसे यांच्या गट नंबर ६०२ मधील नेटशेड व विविध घेतलेल्या लाभाची तपासणी केली आणि मयत स्व. गजानन




निवृत्ती खडसे व त्यांच्या पत्नी लक्ष्मी गजानन खडसे यांच्या गट नंबर ६३३ मधील कथित फळबाग व वनीकरण आणि जुनी विहीर असताना देखील पोखरा योजनेतून घेतलेल्या नव्या विहिरीची पाहणी केली. त्या अनुषंगाने तपासाची नोंद करून सदर तपास अधिकारी पुढील तपासासाठी निघून गेले होते. झालेला तपास व पोखरा योजनेतून घेतलेला अवैध लाभ अंगलट येणार असल्याचे लक्षात येताच ज्ञानेश्वर गजानन खडसे यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या पायाखालची वाळू सरकली. आणि त्यांच्या मनाचे संतुलन बिघडले. याच मनःस्थितीतून राग अनावर झाल्याने आरोपी संजय गजानन खडसे व त्याची आई गं.भा.श्रीमती लक्ष्मी गजानन खडसे यांनी त्यांच्या शेजारच्या शेतात काम करत असलेल्या पत्रकार वसंत खडसे यांच्या पत्नी सौ. अनिता वसंत खडसे यांना शिवीगाळ केली. तसेच पत्रकार वसंत खडसे यांनी विरोधात बातम्या प्रकाशित करून पोखरा योजनेतील भ्रष्टाचाराची तक्रार का केली ? असा प्रश्न उपस्थित करत सौ. अनिता वसंत खडसे यांना व त्यांच्या पतीला जीवे मारून टाकण्याची धमकी दिली. पत्रकार वसंत खडसे वाशिमवरुन घरी परतले असता त्यांच्या पत्नीने घडलेली हकिगत त्यांना सांगितली. पत्रकार यांनी आपल्या पत्नीची समजूत काढून त्यांनी रिसोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रार दाखल करून घेत ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार श्री रंजवे पुढील तपास करीत आहेत.

# नायलॉन मांजाविरोधात कठोर कारवाईचा इशारा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी नायलॉन मांजाच्या वापरावर व विक्रीवर कठोर निर्बंध घालण्याबाबत एश्इ्ष्ठ न्द. १/२०२१ अंतर्गत वेळोवेळी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने जिल्ह्यात व्यापक जनजागृती व कारवाईचे निर्देश दिले आहेत. नायलॉन मांजामुळे दरवर्षी अनेक नागरिक जखमी होत असून काही दुर्दैवी प्रकरणांमध्ये मृत्यूही झाल्याचे निदर्शनास आले आहे. ही गंभीर बाब लक्षात घेता, नायलॉन मांजाचा वापर व विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेण्याची गरज असल्याचे मा. न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

नायलॉन मांजावरील बंदीबाबत न्यायालयीन आदेशांची माहिती असूनही काही नागरिक व विक्रेते त्याचे उल्लंघन करीत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत, नायलॉन मांजाचा वापर करणारे तसेच त्याची विक्री करणारे यांना थेट जबाबदार धरले जावे, असे निरीक्षण मा. उच्च न्यायालयाने नोंदविले आहे. तथापि, कोणतीही दंडात्मक कारवाई करण्यापूर्वी संबंधितांना आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्याच्या दृष्टीने सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.


या सूचनेनुसार, अल्पवयीन मुलगा किंवा मुलगी नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळल्यास त्याच्या पालकांवर ५० हजार रुपये दंड, तर प्रौढ व्यक्ती



नायलॉन मांजाचा वापर करताना आढळल्यास त्याच्यावर ५० हजार रुपये दंड ठोठावण्याचा प्रस्ताव आहे. तसेच नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या व साठा बाळगणाऱ्या विक्रेत्यांवर प्रत्येक उल्लंघनासाठी २.५० लाख रुपयांचा दंड आकारण्याचा विचार करण्यात आला आहे.

या संदर्भात मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे ५ जानेवारी २०२६ रोजी पुढील सुनावणी निश्चित करण्यात आली आहे. प्रस्तावित दंडात्मक कारवाईविरोधात ज्यांना हरकती अथवा निवेदन सादर करावयाचे आहे, त्यांनी सदर दिवशी न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ठरावीक दिवशी कोणतीही हरकत सादर न झाल्यास, वरीलप्रमाणे दंडात्मक कारवाईस सर्वसामान्य जनतेचा आक्षेप नाही, असे गृहीत धरले जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिली आहे.

# माळेगावातील स्पर्धेत वाशिमचा अश्वाचा दुसरा नंबर



**वाशिम :** खंडोबा यात्रोत्सवानिमित्ताने नांदेड जिल्हयातील लोहा तालुक्यांतर्गत येत असलेल्या माळेगाव येथे दि. १९ डिसेंबरला आयोजित पशुप्रदर्शनीत वाशिम येथील गोपाल रंगभाळ यांच्या अश्वाने व्दितीय क्रमांक मिळवित ३१ हजाराचे पारितोषीक पटकाविले. नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यांतर्गत माळेगाव येथे दरवर्षी खंडोबा यात्रोत्सवा निमित्ताने पशुप्रदर्शनीचे आयोजन केल्या जाते. त्यानुसार, आयोजित दोन दाती अश्व स्पर्धेत वाशिम येथील गोपाल रंगभाळ यांच्या अश्वाने व्दितीय क्रमांकाचे ३१ हजार रुपये बक्षीस पटकाविले.यामध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस सुरजीतसिंग गिरणीवाले यांच्या अश्वाने ४१ हजार रुपये तर तृतीय क्रमांकाचे २१ हजाराचे बक्षीस बीड जिल्हयातील केज येथील पृथ्वीराज पाटील यांच्या अश्वाने पटकाविले. नांदेड जिल्ह्यातील स्पर्धेत वाशिमच्या अश्वाने व्दितीय क्रमांक पटकवित वाशिम जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तूरा रोवला.

# भाजपाच्या वतीने वीर बाल दिवस उत्साहात साजरा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भाजपा व रेनबो प्युपील शाळेच्या वतीने २६ डिसेंबर रोजी विर बाल दिवस उत्साहात साजरा करण्यात आला स्थानीक जुनी आयुडीपी कॉलनी येथील गुलाटी मील येथे सिख संप्रदायाचे १० वे गुरू श्री गुरूगोविंदसिंहजी महाराज यांचे सहाबजादे जोरावरसिंह व फतेहसिंह यांचा बलीदान दिवस भारत सरकारने विर बालदिवस म्हनुन जाहिर केले भारतीय जनता पार्टी वाशिमच्या वतीने आयोजीत कार्यक्रमात मंच्यावर नगराध्यक्ष अनील केंद

ळे, नगरसेवक राहुल तुपसांडे विर बालदिवस कार्यक्रम संयोजक डॉ दिपक ढोके, नगरसेविका सौ पुजा खंडेलवाल, योगाचार्य राम



छापरवाल, पत्रकार संघटनेचे प्रदेश कार्य अध्यक्ष निलेश सोमाणी, कार्यक्रम प्रमुख चरनजीतसिंग उर्फ बंटी सेठी, शाळेच्या संस्थापीका कमलप्रितकौर गुलाटी, संचालक पवकीरतसिंग गुलाटी, डॉ रत्नेश परळकर, माजी नप उपाध्यक्ष भानुप्रतापसिंह ठाकुर , नगरसेवक अनील ताजने, संतोरु वानखेडे, योगेश लोनसुने, समाजसेवक भीमसेठ जीवनानी, नवीन शर्मा, योगेश सराफ, श्रीकांत जोशी, प्राध्यापक मिलींद लाहोटी, समवेत मान्यवरांची उपस्थीती होती, सर्व प्रथम साहेबजादे यांच्या पावन प्रतीमेस पुरुप अर्पन करून त्यांच्या शौर्य, त्याग, बलीदानाला आदरांजली अर्पन करण्यात आली या वेळी नगराध्यक्ष समवेत सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला सोबतच शौर्य व बलीदानाचे प्रतीक असनारे साहीबजादे यांचे जीवन कार्यावर आधारीत चीत्र प्रर्दशनीचे उदघाटन करण्यात आले या वेळी रेनबो प्युपील इंग्लीश शाळेच्या संस्थांपीका कमलप्रितकौर गुलाटी व प्रा श्रीकांत जोशी समवेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी विर साहेबजादे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला यावेळी नगराध्यक्ष अनिल केंदळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रास्तावीक जिल्हा संयोजक डॉ दिपक ढोके, संचालक राशी तोमर व आकांशा इंगोले तर आभार कार्यक्रम प्रमुख बंटी सेठी यांनी मानले कार्यक्रमाला मान्यवर नागरीक पक्ष पदाधिकारी व शाळेतील सर्व शिक्षक रूंद उपस्थीत होते.

# विषमतेची मनुस्मुर्ती घटना निष्कासीत करून समतावादी घटना देशाला अर्पण केली

**वाशिम :** २५ डिसेंबर रोजी रायगडाच्या पायथ्याशी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जय भवानी जय शिवाजीचा नारा देवून मनुस्मुर्ती ग्रंथाचे जाहीर पने दहन केले कारण मनसमुर्ती मध्ये अस्पृश्य, शूद्र व स्त्रिया बद्दल अन्यायकारक कायदे श्लोक होते या ग्रंथामुळे जातीव्यवस्था, अस्पृश्यता, जतीबांधने बळकट झालेली होती त्यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी विषतावादी ग्रंथ जाळून समतावादी घटना देशाला अर्पण केली असल्याचे प्रतिपादन बिगर सातबारा



शेतकरी संघटनेचे प्रणेते भाई जगदिश कुमार इंगळे यांनी केले यावेळी आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ नेते सरकार इंगोले कॉ संजय बाजड धनंजय पंडित बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे वाशिम जिल्हा अध्यक्ष राजू इंगोले सहित शेख बिबान उपस्थित होते

# स्व. मायादेवी अशोककुमार बगडीया यांचे मरणोत्तर नेत्रदान



■ प्रतिनिधी | वाशिम ■

रिसोड जि.वाशिम येथील रहिवासी अशोककुमार बगडीया (नगरसेठ) यांची पत्नी स्व. मायादेवी अशोकुमार बगडीया यांच्या वयाच्या ६५ व्या वर्षी दिनांक २४ डिसेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता निधन झाले. त्यांच्या मागे बराच मोठा आप्त परिवार आहे तसेच संपुर्ण बगडीया कुंटुबातील आधारस्तंभ तथा सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या तसेच समाजकार्याची आवड असलेल्या स्व. मायादेवी बगडीया यांचे निधन झाल्याने संपुर्ण बगडीया कुटुंबावर दुःखाचा डोंगर उभा असताना बगडीया कुंटुबीयांनी एवढया दुखामध्येही मुत्यनंतर दोन अंधाच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्यासाठी नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त करत एक आदर्श निर्माण केला. त्यानूसार जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, डॉ. अविनाश पुरी, डॉ. आशिष बेदरकर, यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानेश्वर पोटफोडे व रमेश ठाकरे, ओम राऊत यांनी स्व. मायादेवी अशोककुमार बगडिया यांची नेत्र बुबुळे काढली व नेत्र बुबूळे वैद्यकिय महाविद्यालय पाठविण्यात आली.

# राष्ट्रीय हरित सेनेच्या माध्यमातून यशस्वी पर्यावरण शिक्षण कार्यक्रम

■ प्रतिनिधी | रिसोड ■

श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रिसोड येथे राष्ट्रीय हरित सेनेच्या माध्यमातून भव्य पर्यावरण शिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे उपमुख्याध्यापक संजय नरवाडे होते. मार्गदर्शक म्हणून वनपरिक्षेत्र अधिकारी ए. बी. इढोळे, वनपाल एन. एस. डिघोळे, वनरक्षक आर. एस. कदम, पी. आर. जावळे, आडे, डांगे आदी वनकर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक खुशाल राठोड यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक एन. एस. डिघोळे यांनी पर्यावरण जनजागृती व पर्यावरण रक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच स्पर्धेत सहभागी



विद्यार्थ्यांसाठी लवकरच जंगल सफारीचे आयोजन करण्यात येईल, असे आश्वासन दिले. अध्यक्षीय भाषणात उपमुख्याध्यापक संजयराव नरवाडे यांनी वन व पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व विशद केले.

ऊर्जा बचत, पाणी बचत, घनकचरा व्यवस्थापन, कंपोस्ट खत, ध्वनी प्रदूषण, शाश्वत शेती, हवेच्या गुणवत्तेचा अभ्यास, जैवविविधता, माझे आरोग्य माझे पर्यावरण, औषधी वनस्पती उद्यान आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी आकर्षक मॉडेल्स व चित्रकला पोस्टर्स सादर करून भव्य प्रदर्शनी भरविली. प्रदर्शनीची पाहणी करून परीक्षकांनी गुणांकन केले.

**स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे** : प्रथम क्रमांक : पाणी बचत मॉडेल कुमारी वेदांती दीपकराव देशमुख, नयना ज्ञानेश्वर सावके, दिव्या ज्ञानेश्वर सावके द्वितीय क्रमांक : घनकचरा व्यवस्थापन व ऊर्जा बचत मॉडेल — शेख जाहीर, आरिश खान, शेख अश्फाक तृतीय क्रमांक : ऊर्जा व पाणी बचत मॉडेल साची सुनील देशमुख, सृष्टी भागवत नरवाडे चित्रकला व पोस्टर स्पर्धेत प्रथम क्रमांक साची सुनीलराव देशमुख, द्वितीय क्रमांक रुद्राक्षी संजय खोडके, तर तृतीय क्रमांक वेदांती दीपकराव देशमुख यांनी पटकाविला.

विजेत्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी व पदके तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रे देण्यात येणार आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कलाशिक्षक व राष्ट्रीय हरित सेना प्रमुख विठ्ठल सरनाईक यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन खुशाल राठोड यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी वन विभागातर्फे नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली.

# स्काऊट्स अँड गाईड च्या विद्यार्थ्यांचा खरी कमाई उपक्रम



**मालेगाव :** बाल शिवाजी मराठी विद्यानिकेतन मध्ये २६/१२/२०२५ वार शुक्रवार रोजी भारत स्काउट्स अँड गाईड अंतर्गत खरी कमाई हा उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये श्रम व स्वावलंबन हे मूल्य रुजविणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.सर्वप्रथम स्काऊट शिक्षिका व विद्यार्थिनी कल्याणी पवार, आरती देशमुख, रोहिणी बनसोड आणि गौरी मुळे यांनी प्रार्थना घेऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. कार्यक्रमाचे उद्घाटन बाल शिवाजी मराठी विद्यानिकेतन चे मुख्याध्यापक प्रशांत देशमुख यांच्या हस्ते रेबन कापून करण्यात आली.त्यानंतर स्काऊट शिक्षिका जयश्री सरकटे यांनी विद्यार्थ्यांना खरी कमाई चे महत्व समजावून सांगितले मुख्याध्यापक यांनी स्काऊट चा विद्यार्थी वेगळा कसा असावा आणि त्यांनी नियमांचे पालन केले पाहिजे हे विद्यार्थ्यांना समजावले.

# शिक्षण महर्षी कृषीरत्न डॉ. पंजाबराव देशमुख जयंती उत्सवास उत्साहात प्रारंभ



■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

वनोजा येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वनोजा येथे शिक्षण महर्षी कृषीरत्न डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंतीनिमित्त दिनांक २५ ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या जयंती उत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे क्रीडा स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, भावगीत स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, पोस्टर प्रदर्शनी, विज्ञान प्रदर्शनी तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

उत्सवाची सुरुवात दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक ९.०० वाजता संस्थेच्या ध्वजारोहणाने झाली. ध्वजारोहणाचा मान विशेष निमंत्रित सदस्य सुरेश राऊत यांच्या शुभहस्ते पार पडला. त्यानंतर ९.३० वाजता उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक जी. एच. हाडे यांनी भूषविले. उद्घाटक म्हणून स्थानिक शाळा समितीचे विशेष निमंत्रित गजानन भाऊ राऊत उपस्थित होते. तर प्रमुख वक्ते म्हणून विठ्ठलराव गोटे, सेवानिवृत्त शिक्षक, व्यंकटराव कडू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, आसेगाव पूर्णा यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास श्रीकृष्ण कड (अध्यक्ष, तंटामुक्ती समिती, वनोजा), दत्ता वाळले (उपाध्यक्ष, पालक-शिक्षक संघ), लक्ष्मण गोरे, प्रा. संजयभाऊ राऊत, ज्ञानदेवराव राऊत, सुखदेवराव झोंबाडे, एस. पी. नारळे, प्रा. कु. एम. आर. बेलोकर, उत्सव प्रमुख व्ही. बी. खोरणे, वरिष्ठ लिपिक हमीद कुरेशी यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे प्रभारी पर्यवेक्षक एस. पी. नारळे यांनी केले. प्रमुख वक्ते विठ्ठलराव गोटे यांनी आपल्या भाषणातून डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक, सामाजिक व कृषी क्षेत्रातील महान कार्याचा सविस्तर आढावा घेत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला.

# ना. रामदास आठवले सर्वसामान्यांना न्याय देणारे नेतृत्व : तेजराव वानखेडे

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ची आढावा बैठक स्थानिक विश्राम भवन येथे संपन्न!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले ची आढावा बैठक दिनांक २५ डिसेंबर २०२६ रोजी जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी बैठकीला परिवर्तन कला महासंघाचे अध्यक्ष शेषराव मेश्राम, तालुकाध्यक्ष प्रकाश गवई, जिल्हा युवा अध्यक्ष गजानन वानखेडे , जिल्हा उपाध्यक्ष अशोकराव कांबळे, राजेश कांबळे, सिने अभिनेते अरविंद उचित, यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना तेजराव वानखेडे म्हणाले की रिपब्लिकन पक्ष तळागाळातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न, त्यांच्या अडचणी, त्यांच्या मूलभूत गरजा, शेतकऱ्यांचे प्रश्न, विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवून ,सर्वसामान्यांना सोबत घेऊन चालणारा पक्ष असून रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष संघर्ष नायक केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले हे सर्व जनतेला न्याय देणार नेतृत्व आहे .म्हणून रिपब्लिकन पक्षांमध्ये सर्व समाज



घटकांनी प्रवेश करून ना. रामदास आठवले यांचे हात मजबूत करावे .असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांनी केले.

आढावा बैठकीमध्ये रिपब्लिकन पक्षाच्या वतीने वाशिम जिल्हा परिषद निवडणुका संदर्भात चर्चा करण्यात आली. रिपब्लिकन पक्ष हा महायुतीमध्ये असून सन्मानपूर्वक जागा सोडण्या संदर्भात महायुतीतील घटक पक्षासोबत चर्चा करण्यात येणार असून कार्यकर्त्यांनी जिल्हा परिषद निवडणुकी करिता कामाला लागावे व पक्ष मजबूत करावा असे आवाहन तेजराव वानखेडे यांनी केले. बैठकीला मालेगाव तालुका अध्यक्ष प्रकाश गवई , , जिल्हा उपाध्यक्ष रामजी भगत, पंढरी कंकाळ, सदानंद गवई, रिसोड तालुका अध्यक्ष हिरामण साबळे, मानोरा तालुका अध्यक्ष माणिकराव जामनिक, ज्येष्ठ नेते परसराम वासनिक ,विनोद किर्दक, जिल्हा नेते दिलीप कांबळे, तालुका उपाध्यक्ष संतोष वानखेडे ,युवा अध्यक्ष सचिन गुडदे ,सर्कल अध्यक्ष सचिन भालेराव ,सिद्धार्थ पाटील, रवी भगत रामजी भगत, महेंद्र जाधव, युवा नेते रवी इंगळे ,जयसिंगराव घुगे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन सिने अभिनेते अरविंद उचित यांनी केले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३३ ■ रविवार, २८ डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# रुग्णालयात मृत अर्भक टाकून पलायन वर्ध्यातील माणुसकी हादरवणारी घटना

## सीसीटीव्ही उघडणार रहस्य; मातेचा शोध सुरू

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहराला हादरवणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय, वर्धा येथील गायनिक ओपीडीतील सत्तावीस क्रमांकाच्या वॉर्डच्या स्वच्छता गृहात मृत अवस्थेत पुरुष जातीचे अर्भक आढळून आले. सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास स्वच्छता कर्मचारी शौचालय स्वच्छता करण्यासाठी गेले असता स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास अर्भक आढळून येताच एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच रुग्णालय प्रशासन, पोलिस व आरोग्य यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. अर्भकाला तात्काळ ताब्यात घेऊन ते अर्भक सहा महिन्याचं असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले ती महिला भरती झाली होती का की ऑबर्शन



करायला आली उलगडा लवकरच पोलीस लावणार तसेच शवविच्छेदनाचे आदेश देण्यात आले ,

या अर्भकाला रुग्णालयात कोणी, कधी आणि कशा परिस्थितीत आणले, हा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

वर्धा शहर पोलीस मातेचा शोध घेत असून, रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी सुरू करण्यात आली आहे. फुटेजमधून आरोपीपर्यंत पोहोचण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या घटनेमुळे शहरात संतापाची लाट उसळली आहे. दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत असून, तपासाला वेग देण्यात आला आहे.सीसीटीव्ही उघडणार रहस्य या मथळाखाली बातमी आहे खरी परंतु जिल्हा सामान्य रुग्णालय मधील गायनिक वार्ड मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लागलेले नाही मग तिथून निघणारी महिलेचा शोध बाहेरील सीसीटीव्ही फुटेच्या माध्यमातून घेतला जाणार असल्याचे आरोग्य प्रशासनाने सांगितले शहर पोलीस महिलेचा शोध घेत आहे

छत्रपती सेनेत नवसंजीवनी

# वर्धा शहर अध्यक्षपदी समीर अग्रवाल; सामाजिक लढ्याची नवी धग

**वर्धा । जनमाध्यम :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारधारेवर उभी असलेली छत्रपती सेना आता वर्धा शहरात नव्या जोमाने कार्यरत होणार असून, संघटनेच्या वर्धा शहर अध्यक्षपदी समीर अग्रवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी वर्धा येथील विश्रामगृहात पार पडलेल्या बैठकीत जाहीर करण्यात आली.



संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मंगेश चोरे (पाटील) यांच्या हस्ते समीर अग्रवाल यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या वेळी राज्य कार्याध्यक्ष प्रा. रमेश चौधरी, राज्य महासचिव दिलीप भुजाडे, सर्व प्रांत अध्यक्ष राजेंद्र झांबरे, विदर्भ उपाध्यक्ष व वर्धा जिल्हा विशेष सचिव सूर्यप्रकाश पांडे, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश डोडाणी, जितेंद्र झाडे, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत तिळले (पेंटर) यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना मंगेश चोरे (पाटील) यांनी ठामपणे सांगितले की, छत्रपती सेना ही कोणत्याही राजकीय पक्षाची बटीक नसून, ती केवळ आणि केवळ सामाजिक कार्यासाठी समर्पित संघटना आहे. गोरगरीब, गरजू आणि उपेक्षित घटकांच्या मदतीसाठी संघटना रस्त्यावर उतरून काम करणार आहे. याच भूमिकेतून ३१ डिसेंबर रोजी जल्लोषात दंग असलेल्या शहरात, उघड्यावर थंडीत झोपणाऱ्या निराधार नागरिकांना ब्लँकेट वाटपाचा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

राज्य कार्याध्यक्ष प्रा. रमेश चौधरी यांनीही आपल्या भाषणातून संघटनेच्या सामाजिक ध्येयधोरणांवर प्रकाश टाकत नव्या अध्यक्षांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप भुजाडे यांनी केले, तर समारोप सूर्यप्रकाश पांडे यांनी केला.

नवनियुक्त शहर अध्यक्ष समीर अग्रवाल यांनी विश्वास व्यक्त करताना सांगितले की, छत्रपती सेनेचा प्रत्येक कार्यकर्ता समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल आणि सामाजिक न्यायासाठी संघर्ष करेल.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व पदाधिकाऱ्यांनी समीर अग्रवाल यांचे अभिनंदन करत त्यांच्या कार्यकाळासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. आभार प्रदर्शन श्रीकृष्ण दिवेदी, सागर नरबरिया, विशाल डोडाणी, अजित नाडे, आशिष सिंग व बादल साहू यांनी केले.

# गांजाचे हब हिंगणघाट : पोलिसांच्या धडक छाप्यात विक्रेत्याला अटक

## -५११ ग्रॅम गांजा व २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** हिंगणघाट हे नागपूरहून पुढे चालणाऱ्या गांजा हबपैकी एक असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ज्ञानेश्वर वार्डातील शहालंगडी रोडवरील लोकेश तांदुळकर यांच्या भाड्याच्या खोलीत शुक्रवार, २६ डिसेंबर रोजी धडक छापा टाकला.



झडतीत ५११ ग्रॅम गांजा, मोबाईल व २५ हजार २२० रुपयांचा मुद्देमाल जप्त झाला. तपासात समोर आले की, हा गांजा लोकेशच्या मालकीचा असून त्याला पारितोष चौधरी यांनी आणून दिला होता. दोघांविरुद्ध तत्काळ गुन्हा नोंदवण्यात आला आहे.


पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अप्पर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या निर्देशानुसार ही धडक कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विनोद चौधरी, उपनिरीक्षक प्रकाश लसुंते, कर्मचारी अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, रवी पुरोहित, अभिषेक नाईक व विनोद कापसे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.

पोलिसांनी ही मोहीम अंमली पदार्थ विक्रीवर दडपशाही आणण्यासाठी आणि हिंगणघाट परिसरात सुरक्षेचा संदेश देण्यासाठी राबवली असल्याचे सांगितले.

# बोपापुरात आजपासून शाकंबरी नवरात्रीचा भव्य उत्सव; शतचंडी महायज्ञास प्रारंभ

**वर्धा । जनमाध्यम :** बोपापूर (वाणी) येथील ॐ नवशक्ती अंबिका भक्तीधाम संस्थानमध्ये आज (दि. २८) पासून शाकंबरी नवरात्रीनिमित्त भव्य धार्मिक सोहळ्याला प्रारंभ होणार आहे. आदिशक्ती माँ जगदंबा व चतुर्भुज आशापूरा मातेंच्या कृपेने आयोजित शतचंडी महायज्ञ, स्वाहाकार, गोपूजन व कुंकुमार्चन यामुळे परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे. प.पू. महंत प्रेममयी आई अंबिकाभारती यांच्या पावन सान्निध्यात हा महायज्ञ दि. ३ जानेवारी २०२६ पर्यंत चालणार आहे.

उत्सवाची सुरुवात सकाळी ८ वाजता जलयात्रा, दिंडी व भजनी मंडळांच्या सहभागाने पालखी सोहळ्याने झाली. दररोज सकाळी ८.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत यज्ञकर्म व सायंकाळी



महाआरती होणार आहे. महिलांसाठी विशेष कुंकुमार्चनाचे आयोजन करण्यात आले आहे. ३ जानेवारी रोजी पूर्णाहुती व महाप्रसाद होणार असून, भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# विदर्भस्तरीय माळी समाज उपवर-वधू परिचय मेळाव्याचे आज वर्ध्यात आयोजन

## -'शोध जीवनसाथी' पुस्तिकेचे प्रकाशन; नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा होणार गौरव

**वर्धा जनमाध्यम :** माळी समाजातील उपवर-वधू व त्यांच्या पालकांसाठी महत्त्वाचा ठरणारा विदर्भस्तरीय माळी समाज उपवर-वधू परिचय मेळावा आज (रविवार, दि. २८) वर्ध्यात होत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा मेळावा स्थानिक मातोश्री सभागृह, आर्वी रोड येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला असून, या निमित्ताने 'शोध जीवनसाथी' या विशेष पुस्तिकेचे प्रकाशन तसेच नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार सोहळाही पार पडणार आहे.




मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी अशोक कडू राहणार असून, उद्घाटन जीएसटी उपसंचालक (नागपूर) भूषण निरपासे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते निळकंठ यावलकर, महात्मा फुले प्रतिष्ठानच्या अध्यक्षा रोहिणी पाटील, माजी अध्यक्ष रंगराव सावरकर, वासुदेव कडुकार व सुधाकर मेहरे उपस्थित राहणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून देवळी पंचायत समितीचे माजी सभापती दीपक फुलकरी यांची उपस्थिती राहील.

यावेळी माळी महासंघ, नागपूरचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश ठाकरे यांच्या हस्ते शोध जीवनसाथी या उपवर-वधू परिचय पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात येणार आहे. ही पुस्तिका समाजातील युवक-युवतींसाठी योग्य जीवनसाथी शोधण्यास मार्गदर्शक ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. दरम्यान, या मेळाव्याच्या व्यासपीठावरून वर्धा शहराचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष सुधीर पांगुळ तसेच नवनिर्वाचित नगरसेवक यशवंत झाडे, सचिन होले, वंदना देवघरे व सोनू कुबडे यांचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. समाजातील युवक-युवती, पालक व समाजबांधवांनी या विदर्भस्तरीय मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन माळी समाज उपवर-वधू परिचय मेळावा आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# समृद्धी महामार्गावर विकास बाहेरच्यांचा, बेरोजगारी स्थानिकांच्या वाट्याला

## - विरूळ आकाजी परिसरात संतापाची लाट; पेट्रोल पंप : हॉटेल्समध्ये मुंबई-पुण्याच्या गुंतवणूकदारांना संधी, स्थानिक युवक डावलले

**विरूळ आकाजी जनमाध्यम :** समृद्धी महामार्गामुळे परिसराचा चेहरामोहरा बदलत असताना, या विकासाचा खरा लाभ मात्र स्थानिक नागरिकांना मिळत नसल्याची तीव्र भावना विरूळ आकाजी व आसपासच्या गावांमध्ये व्यक्त होत आहे. महामार्गालगत सुरू झालेले पेट्रोल पंप, हॉटेल्स, ढाबे, दुकाने व इतर मोठे व्यवसाय स्थानिक बेरोजगारांना न देता थेट मुंबई-पुण्यासारख्या शहरांतील श्रीमंत व बाहेरील लोकांच्या हाती दिले जात असल्याने ग्रामस्थांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.



विरूळ आकाजीपासून अनेक गावांच्या हद्दीतून समृद्धी महामार्ग गेल्याने या भागात रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. मात्र पेट्रोल पंप, हॉटेल्स व व्यावसायिक संकुलांमध्ये स्थानिक युवकांना साध्या कामांसाठीही संधी दिली जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. परिणामी, गावातील तरुण बेरोजगारच राहिले असून बाहेरील लोक येथे आर्थिक लाभ घेत आहेत. दरम्यान, या परिसरात वखार मंडळ, कारखाने व विविध खासगी कंपन्यांचे जाळे उभे राहत असल्याचे संकेत आहेत. उद्योग येणे स्वागतार्ह असले तरी या ठिकाणीही स्थानिक बेरोजगारांना प्राधान्य दिले जावे, अशी ठाम मागणी नागरिकांनी संबंधित विभागांकडे केली आहे. आमची जमीन, आमचा परिसर आणि आमचा विकास; पण नोकऱ्या मात्र परक्यांच्या अशी भावना आता उघडपणे बोलून दाखवली जात आहे.स्थानिकांना डावलण्याची हीच भूमिका कायम राहिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

समृद्धी महामार्गासाठी या भागातील अनेक शेतकऱ्यांची सुपीक शेती संपादित करण्यात आली. त्या वेळी शासनाकडून शेती गमावलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना महामार्गाशी संबंधित रोजगार देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात हे आश्वासन हवेतच विरल्याचे चित्र आहे. जमिनी गेल्या, पण रोजगार मिळाला नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकरी व युवकांकडून व्यक्त होत आहे.

शासन व प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी करावी, तसेच समृद्धी महामार्गालगतच्या सर्व व्यवसाय व उद्योगांमध्ये स्थानिक युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी जोरदार मागणी विरूळ आकाजी व परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# जिल्ह्यात 'वाघ' की 'व्हायरल अफवा'चाच कहर ?

## -सोशल मीडियावर दहशत, प्रत्यक्षात वाघाचे दर्शन शून्य

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील आष्टी, कारंजा, समुद्रपूर, गिरड, या परिसरात बिबट्याची दहशत असली तरी इतर

ग्रामीण आणि शहरी भागात सध्या वाघ आणि बिबट्याच्या नावाने दहशतीचे वातावरण पसरवले जात असून, या भीतीमागे प्रत्यक्ष वन्यप्राण्यांपेक्षा सोशल मीडियावरील अफवाच अधिक असल्याचे चित्र समोर येत आहे. भुगाव, आष्टा, जऊळगाव, सेलुकाटे, कुरझडी, नेरी या परिसरात वाघ असल्याच्या चर्चांनी शेतकरी, महिला मजूर आणि नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. या पार्श्वभूमीवर वनविभागाने तात्काळ पत्र काढून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

वनविभागाला मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार वाघ गिरड मार्ग व खुरसापुर जंगलातून सेलुकाटे भुगांव शेतशिवारात फिरल्याची चर्चा आहे. काही शेतकऱ्यांनी दोन बछड्यांच्या हालचालींबाबत अंदाज व्यक्त केल्याने वाघ परिसरातच वावरत असल्याची चर्चा अधिकच पेटली. यामुळे शेतात काम करणारे शेतकरी, कापूस वेचणाऱ्या महिला तसेच रात्री बाहेर पडणारे नागरिक भयभीत झाले आहेत. वनविभागाने दिवसा व रात्री दोन्ही वेळेस विशेष खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.मात्र, गेल्या आठ दिवसांपासून सोशल मीडियावर झपाट्याने पसरत असलेल्या वाघाच्या फोटो व व्हिडिओंची प्रत्यक्ष चौकशी केली असता धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

रस्त्याच्या मधोमध उभा असलेला वाघ, वस्तीत फिरणारा वाघ असे फोटो मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले; पण वनविभाग व पोलिसांनी घटनास्थळी केलेल्या पाहणीत एकाही ठिकाणी प्रत्यक्ष वाघ दिसल्याचे कोणतेही ठोस पुरावे आढळले नाहीत. एकाही प्रत्यक्षदर्शी शेतकऱ्याने किंवा नागरिकाने वाघ पाहिल्याचे प्रमाणितपणे सांगितलेले नाही. प्रशासनाच्या तपासात असेही समोर आले आहे की, काही फोटो व व्हिडिओ हे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (ँ) माध्यमातून तयार करून समाजमाध्यमांवर पसरवले जात असावेत. अफवा पसरवून भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा हा गंभीर प्रकार असून प्रशासनाने याची दखल घेतली आहे. संबंधित बाबींवर प्रशासन 'सत्य पडताळणी'च्या मोडवर असून, अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाईची शक्यता नाकारता येत नाही.

वनविभागाने नागरिकांना स्पष्ट इशारा दिला आहे की, सोशल मीडियावरील अप्रमाणित फोटो-व्हिडिओंवर विश्वास ठेवू नये. शेतात व जंगलालगत एकट्याने जाणे टाळावे, लहान मुले व पशुधनाची विशेष काळजी घ्यावी आणि कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ प्रशासनाला कळवावे.

हिंगणघाट व परिसरात सध्या 'वाघापेक्षा अफवाच जास्त' अशी परिस्थिती असून, नागरिकांनी घाबरून न जाता सजग राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# संत गजानन महाराजांच्या नामस्मरणाने वर्ध्यात नववर्षाचा आध्यात्मिक प्रारंभ

**वर्धा जनमाध्यम :** नववर्षाच्या स्वागताला आध्यात्मिक उंची देण्यासाठी वर्ध्यात संत गजानन महाराजांच्या नामस्मरणाचा भव्य पर्वणारा कार्यक्रम रंगणार आहे. जागतिक पारायण सोहळा समितीच्या वतीने ११ जानेवारी २०२६ रोजी शहरातील सर्कस मैदानावर सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हा भव्य जागतिक पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याचा उद्देश विश्वशांती, आत्मशांती आणि मनःशांती या मूल्यांचा प्रसार करणे आहे. पत्रकार परिषदेत मयूर महाराज दरणे यांनी भाविकांना या आध्यात्मिक सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. यंदा पारायण सोहळ्याचे दहावे वर्ष असून ग्रंथवाचक विजया जगदाळे व श्वेता पाचखेडे यांच्या उपस्थितीत चार हजारांहून अधिक महिला-पुरुष भक्त गजानन महाराजांच्या चरणी श्रद्धा अर्पण करणार आहेत. भक्तांच्या सोयीसाठी आरोग्यसेवा, रुग्णवाहिका, अग्निशमन सेवा, सीसीटीव्ही सुरक्षा, ज्येष्ठांसाठी खुर्च्यांची व्यवस्था तसेच ५०० स्वयंसेवक विविध सेवांसाठी तैनात राहणार आहेत. महिला भक्तांसाठी ड्रॉद्वारे ५१ साड्यांचे वाटप करण्यात येणार असून हिंगणघाट, सेलू व वर्धा शहरातून भक्तांना सोयीसाठी वाहनसेवाहि उपलब्ध आहे. सोहळ्याचे उद्घाटन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर व ॲड. शीतल पंकज भोयर यांच्या हस्ते होणार आहे.

# नववर्षारंभी वर्ध्यात भक्तीचा महाघोष ३०० मंदिरात एकाचवेळी हनुमान चालीसा पठण

## -१६ वर्षांची परंपरा अखंड; संजीव लाभे यांची पत्रपरिषदेत माहिती

**वर्धा जनमाध्यम :** नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी वर्धा शहर आणि परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. जगात शांतता, समाजात सौहार्द आणि सर्वांच्या जीवनात सुख-समाधान नांदावे, या मंगल संकल्पनेसह १ जानेवारी रोजी सकाळी शहर व परिसरातील तब्बल ३०० मंदिरांमध्ये एकाचवेळी हनुमान चालीसा पठणाचे आयोजन करण्यात आले आहे. मागील १६ वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या या उपक्रमाची माहिती श्रीराम शोभायात्रा समितीचे उपाध्यक्ष संजीव लाभे यांनी शनिवारी आयोजित पत्रपरिषदेत दिली.

लाभे यांनी सांगितले की, वर्षारंभ मंगलमय वातावरणात व्हावा, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे. गेल्या वर्षी २७७ मंदिरांमध्ये हनुमान चालीसा पठण करण्यात आले होते. यंदा हा आकडा वाढवून ३०० मंदिरांपर्यंत नेण्याचा निर्धार करण्यात आला असून त्यासाठी व्यापक प्रचार-प्रसार सुरू आहे. वर्धा शहराचे २० विभाग करण्यात आले असून प्रत्येक विभागात ५ ते १० कार्यकर्ते मंदिरांशी थेट संपर्क साधत आहेत. मंदिरांमध्ये फ्लेक्स लावण्यात आले असून मंदिर व्यवस्थापनांना पत्रे देण्यात आली आहेत.



प्रत्येक मंदिरात किमान १० ते २० भक्तांनी सहभागी व्हावे, यासाठी हनुमान चालीसाची पत्रकेही वितरित करण्यात आली आहेत.

वर्धेतील श्रीराम मंदिराचे बांधकाम सुरू असल्याने यंदाचा मुख्य कार्यक्रम महादेवपुरा येथील प्राचीन महादेव मंदिराच्या सभागृहात होणार असल्याची माहिती लाभे यांनी दिली.

यंदा वर्धेसह बोरगाव, इंझापुर सेलू काटे, सावंगी, सालोड, नागठाणा, रोठा, उमरी, पिपरी, कारला, साटोडा, आलोडी, महाकाळ, नालवाडी, म्हसाळा, वरूड, सेवाग्राम, नांदुरा, गोजी, बरबडी, धानोरा, चितोडा, भूगाव आदी गावांमध्येही संपर्क सुरू आहे. तसेच जिल्ह्यातील सेलू, सिंदी रेल्वे, समुद्रपूर, हिंगणघाट, देवळी, पुलगाव, आर्वी, आष्टी आणि कारंजा तालुक्यांतील मान्यवरांनाही अधिकाधिक गावांमध्ये हा उपक्रम राबविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हनुमान चालीसा पठणाच्या माध्यमातून वर्धा जिल्हा संपूर्ण महाराष्ट्रासाठी एक आदर्श मॉडेल' ठरावा, अशी अपेक्षा संजीव लाभे यांनी व्यक्त केली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
e paper www.janmadhyam.com

# पद्मश्री, पद्मभूषण, भारतरत्न नागरी पुरस्कार उपाधी नाही

■ मुंबई हायकोर्ट ■ व्यक्तीच्या नावापूर्वी वापर बेकायदेशीर




**मुंबई : प्रतिनिधी-** पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण आणि भारतरत्न हे नागरी पुरस्कार उपाधी नाहीत, असे मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे ते एखाद्या व्यक्तीच्या नावापूर्वी किंवा नंतर वापरता येत नाहीत. न्यायालयाने एका याचिकेच्या केस शीर्षकात पद्मश्री शब्दाच्या वापराबद्दल हे निरीक्षण नोंदवले.

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरेसन यांच्या खंडपीठासमोर यासंदर्भातील याचिकेची सुनावणी सुरू होती. २००४ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित झालेले डा. शरद मोरेश्वर हर्डीकर हे देखील एक पक्ष होते. त्यांचे नाव केस शीर्षकात पद्मश्री डा. शरद मोरेश्वर हर्डीकर असे सूचीबद्ध केले होते. न्यायाधीशांनी यावर आक्षेप घेत म्हटले की, हे कायद्यानुसार बेकायदेशीर आहे. यासंदर्भात उच्च न्यायालयाने १९९५ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाच्या निर्णयाचा हवाला दिला.त्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले होते की, पद्म पुरस्कार आणि भारतरत्न ही उपाधी नाही आणि ते नावापूर्वी किंवा नंतर वापरले जाउ नये. न्यायमूर्ती सुंदरेसन यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय संविधानाच्या कलम १४१ अंतर्गत सर्वांना लागू आहे आणि त्याचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. पुढील कायदेशीर कार्यवाहीमध्ये सर्व पक्ष आणि न्यायालये या नियमाचे पालन करतील, असे निर्देश त्यांनी दिले.देशात पद्म पुरस्कारांची सुरुवात १९५४ मध्ये झाली. हे चार पुरस्कार म्हणजे भारतरत्न, पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री. हे पुरस्कार २६ जानेवारी रोजी जाहीर केले जातात. मार्च-एप्रिलमध्ये राष्ट्रपती भवनात हा समारंभ आयोजित केला जातो. या पुरस्कारात पदक आणि प्रशस्तिपत्र असते. भारतरत्न हा देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार आहे, जो राष्ट्रीय सेवा, क्रीडा, विज्ञान, साहित्य आणि कला यासाठी दिला जातो. दरवर्षी फक्त तीन लोकांनाच हा पुरस्कार दिला जाउ शकतो. आतापर्यंत एकूण ४८ जणांना भारतरत्न मिळाला आहे; पहिल्यांदा १९५४ मध्ये डा. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना भारतरत्न देण्यात आला.

**तीन श्रेणींमध्ये दिलेजातात पद्म पुरस्कार-** देशातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी पद्म पुरस्कार तीन श्रेणींमध्ये दिले जातात. पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण. हे पुरस्कार कला, समाजसेवा, विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवसाय, उद्योग, वैद्यक, साहित्य, शिक्षण, क्रीडा आणि नागरी सेवा अशा विविध क्षेत्रातील उत्कृष्टतेसाठी दिले जातात. यंदा क्रिकेटपटू आर. अश्विनसह ७१ व्यक्तींना पद्म पुरस्कार देण्यात आले.

# राष्ट्रवादीची चर्चा फिस्कटली

◆ निवडणूक चिन्हावरून मतभेद
◆ शरद पवार मविआसोबत
◆ अजित पवार यांनी घातली घड्याळावर लढण्याची अट



**पुणे / प्रतिनिधी-**पुणे महापालिका निवडणुकीच्या तोंडावर गेल्या काही दिवसांपासून शहरात शरद पवार आणि अजित पवार गटाच्या स्थानिक युतीची जोरदार चर्चा सुरू होती. मात्र, आज दुपारी झालेल्या एका निर्णायक बैठकीत या चर्चांना पूर्णविराम मिळाला. जागावाटप आणि निवडणूक चिन्हावरून मतभेद झाल्यानंतर अजित पवारांसोबतची बैठक फिस्कटली असून, शरद पवारांच्या राष्ट्रवादीने पुन्हा एकदा महाविकास आघाडीच्या (मविआ) साथीनेच लढण्याचा निर्णय घेत थेट काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेशी जुळवून घेतले. पुण्यात रात्री उशिरापर्यंत शिवसेना, कांग्रेस नेत्यांसोबत शरद पवार गटाची बैठक सुरू होती. पुण्यात जागावाटपासाठी आज दुपारी अजित पवार गट आणि शरद पवार गट यांच्यात एक महत्त्वाची बैठक पार पडली. सूत्रांच्या माहितीनुसार या बैठकीत अजित पवारांच्या गटाकडून शरद पवारांच्या पक्षाला अत्यंत जाचक अटी घालण्यात आल्या. अजितदादांच्या गटाने शरद पवार गटाला पुण्यात केवळ ३५ जागा देण्याचा प्रस्ताव ठेवला. एवढेच नव्हे तर या ३५ जागांवरही उमेदवारांनी अजित पवारांच्या घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवावी, अशी अट घालण्यात आली. स्वतःच्या पक्षाचे अस्तित्व पणाला लावणारा हा प्रस्ताव शरद पवार गटाला पूर्णपणे अमान्य होता. त्यामुळे ही युती होणे अशक्य असल्याचे स्पष्ट होताच शरद पवार गटाच्या नेत्यांनी बैठकीतून काढता पाय घेतला. या अगोदर शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हे आणि आमदार रोहित पवार यांनी गुरुवारी रात्री उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची भेट घेतली. या भेटीत जागावाटपावर चर्चा झाली. त्यानंतर रात्री उशिरा अजित पवार यांची भेट घेउन चर्चा केली. त्यानंतर शुक्रवारीही शरद पवारांच्या शिष्टमंडळाने अजित पवारांसोबत चर्चा केली. मात्र, शरद पवार यांच्या पक्षासमोर जाचक अटी ठेवल्याने ही चर्चा थांबली. दरम्यान, पुणे महापालिकेत काका-पुतण्या एकत्र येतील या आशेवर असलेल्या कार्यकर्त्यांना या घडामोडीमुळे मोठा धक्का बसला. आता महाविकास आघाडीच्या हाटेल शांताईमधील बैठकीतून जागावाटपाचे कोणते नवीन सूत्र ठरते, याकडे लक्ष लागले आहे.

**हाटेल शांताईमध्ये मविआची संयुक्त बैठक-**अजित पवारांसोबतची बोलणी फिस्कटताच शरद पवार गटाने वेळ न दवडता थेट महाविकास आघाडीच्या घटक पक्षांशी संपर्क साधला. पुण्यातील हाटेल शांताई येथे तातडीने काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी यांची संयुक्तबैठक सुरू झाली. या बैठकीत पुण्यात आता मविआविरुद्ध महायुती असाच सामना रंगणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**दिग्गज नेत्यांची उपस्थिती**

या बैठकीला तिन्ही पक्षांतील प्रमुख स्थानिक नेते उपस्थित आहेत. शरद पवार गटाकडून विशाल तांबे, अंकुश काकडे, मनाली भिलारे, अश्विनी कदम आणि आमदार बापूसाहेब पठारे तर काँग्रेसकडून अरविंद शिंदे, अभय छाजेड आणि रमेश बागवे आणि ठाकरे गटाकडून (शिवसेना) वसंत मोरे, गजानन थरकुडे आणि संजय मोरे हे बैठकीत हजर आहेत.

**जयंत पाटील-ठाकरे भेटीने पुण्यात समीकरण बदलले-**दोन राष्ट्रवादीची पुण्यात चर्चा सुरू असतानाच शरद पवारांच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते आज दुपारी मुंबईत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी मातोश्री निवासस्थानी दाखल झाले. दोन्ही नेत्यांमध्ये तब्बल २ तास चर्चा झाली. यावेळी आपण महाविकास आघाडी म्हणून निवडणूक लढवण्याबाबत चर्चा करण्यासाठी आल्याचे जयंत पाटील म्हणाले. त्यानंतर पुण्यात महाविकास आघाडीचे नेते एकत्र आले.

# नववर्ष गर्दीसाठी रेल्वे सज्ज!

## पुणे-नागपूरसह 3 मार्गांवर विशेष गाड्या

**पुणे/प्रतिनिधी :** हिवाळा आणि ख्रिसमस, नव वर्षाच्या स्वागतामुळे रेल्वेला मोठी गर्दी होत असल्याने मध्य रेल्वेने पश्चिम मध्य रेल्वेशी समन्वय साधून नागपूर - हडपसर, पुणे - नागपूर आणि राणी कमलापती - हडपसर दरम्यान विशेष शुल्कासह रेल्वे चालवण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर-हडपसर मार्गावर विशेष रेल्वेच्या चार,



राणी कमलापती-हडपसर-राणी कमलापती रेल्वेच्या प्रत्येकी तीन तर पुणे-नागपूर-पुणे साप्ताहिक विशेष रेल्वेच्या प्रत्येकी चार रेल्वे चालविल्या जातील.गाडी क्रमांक ०१२२१ नागपूर - हडपसर विशेष रेल्वे २९, ३१ डिसेंबर आणि २ जानेवारीस नागपूरहून संध्याकाळी ७ वाजून ४० मिनिटांनी सुटेल आणि दुस-या दिवशी सकाळी सव्वा अकराला येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०१२२२ हडपसर- नागपूर रेल्वे २८, ३० डिसेंबर तसेच १ आणि ४ जानेवारी रोजी हडपसरहून दुपारी ३ वाजून ५० मिनिटांनी सुटेल आणि दुस-या दिवशी पहाटे साडेसहा वाजता नागपूर येथे पोहोचेल.गाडी क्रमांक ०१४१९ पुणे-नागपूर विशेष रेल्वे २९, ३१ डिसेंबर आणि ३ जानेवारी रोजी पुणे येथून रात्री साडेआठ वाजता सुटेल आणि दुस-या दिवशी दुपारी २ वाजून ५ मिनिटांनी नागपूर येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०१४२० नागपूर-पुणे विशेष रेल्वे २८, ३० डिसेंबर तसेच १ आणि ४ जानेवारी रोजी नागपूर येथून दुपारी चार वाजून १० मिनिटांनी सुटेल . दुस-या दिवशी सकाळी पावणेबारा वाजता पुणे येथे पोहोचेल.

# श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर तीन महिन्याकरिता बंद

भाविकांनी सहकार्य करण्याचे पुणे जिल्हाधिका-यांचे आवाहन

**पुणे/प्रतिनिधी :** श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरातील सभामंडप व पायरी मार्गाच्या बांधकाम तसेच भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करण्याच्यादृष्टीने मंदिर ९ जानेवारी २०२६ पासून पुढील तीन महिन्यांसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून भाविकांना दर्शनाकरिता बंद करण्याचा निर्णय श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थानने घेतला आहे, भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूड्डी यांनी केले आहे.



राज्य शासनाने १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखडा मंजुर केला आहे. या आराखड्यातील अत्यंत महत्वाच्या टप्प्याची अंमलबजावणी तसेच प्रत्यक्ष बांधकामाच्या काळातील सुरक्षितता लक्षात घेता २३ डिसेंबर रोजी जिल्हा प्रशासन, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान संस्थानचे विश्वस्त, स्थानिक दुकानदार व श्री. भीमाशंकर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठकीत सर्वांच्या सहमतीने मंदिर ९ जानेवारीपासून पुढे तीन महिन्यासाठी (महाशिवरात्रीचा १२ ते १८ फेब्रुवारी २०२६ हा कालावधी वगळून) तात्पुरते बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापि भाविकांच्या सोयी करिता महाशिवरात्रीच्या कालावधीमध्ये मंदिर दर्शनाकरिता खुले राहणार आहे.सन २०२७ मध्ये त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे, त्यापूर्वी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ २०२५ च्या अनुभवावरून कुंभमेळ्याच्या काळात नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणारे लाखो भाविक श्री क्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक पायाभूत सुविधा, सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था तसेच गर्दी नियंत्रणाची कामे वेळेत पूर्ण करणे हे प्रशासनाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.कामाचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेता भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक असल्याने मंदिर परिसर भाविकांसाठी तात्पुरता बंद करण्यात येणार आहे. मंदिर दर्शनासाठी बंद असले तरी श्री भीमाशंकर यांची नित्य पूजाअर्चा, अभिषेक व धार्मिक विधी परंपरेनुसार व नियोजित वेळेत सुरू राहतील. थेट दर्शन बंद या कालावधीत भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश अथवा प्रत्यक्ष दर्शन सेवा उपलब्ध राहणार नाही. बांधकाम यंत्रणा, अधिकृत अधिकारी कर्मचारी तसेच भीमाशंकर ग्रामस्थ वगळता कोणालाही श्री क्षेत्र भीमाशंकर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. 'श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराचा विकास हा दीर्घकालीन सुरक्षितता, सुविधा आणि भाविकांच्या सोयीसाठी अत्यंत आवश्यक आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ही कामे नियोजनबद्ध व वेळेत पूर्ण करण्यासाठी मंदिर तात्पुरते बंद ठेवण्याचा निर्णय मंदिर संस्थानने घेतलेला असून भाविकांनी व स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे गांभीर्य लक्षात घेउन मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासन यांना पूर्ण सहकार्य करावे,' असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री. डूड्डी यांनी केले आहे.



# कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांना लोकभवन येथे आदरांजली

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताचे माजी कृषिमंत्री डा. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र लोकभवन येथे राज्यपालांचे सचिव डा. प्रशांत नारनवरे यांनी डा. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला आज (दि.२७) पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी उपस्थित राज्यपालांचे परिसहायक अभयसिंह देशमुख तसेच राजभवनातील अधिकारी व कर्मचारी यांनी देखील डा. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.

# राजधानीत डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताचे पहिले कृषिमंत्री तथा शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त निवासी आयुक्ततथा सचिव आर विमला यांनी कापर्निकस मार्गावरील महाराष्ट्र सदनाच्या सभागृहात त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार तसेच महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. यावेळी अक्षय गाडेकर यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रेरणादायी जीवनाचा आणि कृषी तथा शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या अविस्मरणीय योगदानाचा सर्वांना परिचय करून दिला.



# महापालिका निवडणुका महायुतीनेच जिंकणार -शिंदे



**मुंबई/प्रतिनिधी :**कल्याण डोंबिवली महानगर पालिका निवडणुकीसाठी स्वत? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मी स्वत? लक्ष घालत आहोत. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या बरोबर याविषयी बोलली झाली आहेत. कोणी कितीही काहीही आकड्यांचा हिशोब लावून युतीवर कोटी केली तरी कल्याण डोंबिवली महानगर पालिका महायुतीच जिंकेल असा ठाम विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डोंबिवलीत व्यक्तकेला.डोंबिवलीत पश्चिमेत सम्राट चौकात शिवसेना (शिंदे गट) माध्यमातून निर्धार मेळावा आयोजित केला होता. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर खासदार डा. श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, महिला आघाडी प्रमुख लता पाटील, माजी महापौर विनिता राणे यांच्यासह माजी नगरसेवक - नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता टोला लगावला की, आम्ही कार्यकर्त्यांना एकटे टाकले नाही. आम्ही लोकांच्यात जाउन कार्यकर्त्यांच्या पाठीशी राहिलो आणि दणक्यात नगरपालिका जिंकलो. घरात बसून नुसते तुम लढो हम कपडे सांभालते है असे काम केले नाही. छातीचा कोट करून रस्त्यावर उतरलो. कोविड काळात काय केलं ते जनतेला समजून चुकलं आहे. आता मराठी माणसासाठी नाही तर स्वतच्या स्वार्थासाठी एकत्र आला आहात. कल्याण डोंबिवली हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे येथे दुस-या कोणाचे काहीच चालणार नाही. माझ्या बहिणीची ताकद माझ्या मागे आहे तशीच माझे भाउ ही माझ्या बरोबर आहेत. कारण मी कार्यकर्ता आहे त्यांच्यात जाउन काम करतो. मला गरिबी काय असते ती मी अनुभवली आहे. मी माझ्या आईचे व पत्नीचे कष्ट पाहिले आहेत म्हणूनच माझ्या बहिणीसाठी लाडकी बहीण योजना आणली आणि ही योजना कोणाचा माइकलाल आला तरी बंद पडणार नाही. त्यांनी उपस्थितांना युतीलाच निवडून आणा असे आवाहन केले.

तर यावेळी खासदार डा. श्रीकांत शिंदे यांनी त्यांच्या खासदाकीच्या कार्यकाळात केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा मांडला. पूर्वीचे कडोंमपालिकेतील रस्ते आणि आता झालेला बदल हे स्पष्ट चित्र सर्वांसमोर ठेवले. कल्याण डोंबिवलीत आणखी मोठे विकासकामे करण्यासाठी चंग बंदला आहे. शास्त्रीनगर हास्पिटलचे रूप पालटून भव्य हास्पिटल होणार याची मी खात्री देतो. काही वर्षातच सुतीकागृह आणि कन्सर हास्पिटल झालेले दिसेल. पण महापतिलेच्या निवडणुकीत युतीमध्ये कोणी मिठाचा खडा टाकू नका असा उल्लेख करीत टोला मारला. आम्ही निवडणूक युतीतच लढणार आणि युतीचाच विजय होईल असे ठामपणे सांगितले. यावेळी उपजिल्हाप्रमुख राजेश कदम यांच्या तडफदार भाषणाचे खासदार डा. श्रीकांत शिंदे यांनी कौतुक केले. दरम्यान शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना गदा भेट देत भव्य पुष्पहार घालून सत्कार केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करीत शिवसेना जिंदाबाद अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

# मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या प्रसिद्ध करण्यासाठी 3 जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**मुंबई/प्रतिनिधी :**महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ - २६ च्या अनुषंगाने मतदान केंद्रनिहाय मतदार यादी जाहीर करण्याबाबत माननीय राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी आज सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार मतदान केंद्र निहाय याद्या प्रसिद्ध करण्यासाठी शनिवार, दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी राज्यातील सर्व महानगरपालिकांना दिलेल्या सुचनेनूसार, दुबार मतदार व मतदान केंद्रनिहाय मतदार यादीचे कंट्रोल चार्ट संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी शनिवार, दिनांक २७ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. तर, मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्यासाठी ३ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महानगरपालिका निहाय संपूर्ण मतदारयादी जसजशी पूर्ण होईल तसतशी प्रसिद्ध करावी, असेही आदेशात नमूद केले आहे. यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाने मतदान केंद्रनिहाय याद्या प्रसिद्ध करण्यासाठी दिनांक २७ डिसेंबर २०२५ तारीख निश्चित केली होती.

# मनरेगा वाचवण्यासाठी देशव्यापी आंदोलनाची गरज-खरगे

**नवी दिल्ली, २७ डिसेंबर (हिं.स.)** काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मनरेगा योजनेवरून केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आणि म्हटले की, या निर्णयामुळे लाखो गरीब आणि असुरक्षित घटकांना केवळ निराधारच नाही. तर महात्मा गांधींचा अपमानही आहे. त्याविरुद्ध एक ठोस योजना आखली पाहिजे आणि देशव्यापी चळवळ सुरू केली पाहिजे असे ते म्हणाले.शनिवारी पक्ष मुख्यालयात काँग्रेस कार्यकारिणी समिती (सीडब्ल्यूसी) च्या बैठकीत बोलताना खरगे म्हणाले की, मनरेगा योजनेने ग्रामीण भारताचे रूपांतर केले आणि जगातील सर्वात मोठा ग्रामीण रोजगार कार्यक्रम बनला. यामुळे स्थलांतर थांबले, गावांना दुष्काळ आणि उपासमारीपासून मुक्त केले आणि दलित, आदिवासी, महिला आणि भूमिहीन मजुरांना आश्वासन दिले की गरिबीविरुद्धच्या लढाईत सरकार त्यांच्यासोबत आहे. त्यांनी आरोप केला की मोदी सरकारने पहिल्या



तीन कृषी कायद्यांप्रमाणेच कोणताही अभ्यास किंवा सल्लामसलत न करता ही योजना रद्द केली आणि नवीन कायदा लागू केला.खरगे म्हणाले की, आता एक ठोस योजना आखली पाहिजे आणि देशव्यापी जनआंदोलन सुरू केले पाहिजे. संघटना निर्मिती मोहीम, आगामी निवडणुकांची तयारी आणि मतदार यादीतून गरीब, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याकांची नावे वगळण्याची शक्यता याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. लोकशाही मजबूत करण्यासाठी काँग्रेस संपूर्ण एकजुटीने निवडणुका लढवेल असे खरगे यांनी सांगितले.ईडी, आयटी आणि सीबीआय सारख्या संस्थांचा गैरवापर, नॅशनल हेराल्ड प्रकरणात काँग्रेस नेत्यांची प्रतिमा मलिन करण्याचे प्रयत्न आणि बांगलादेशात हिंदू अल्पसंख्याकांवर अलिकडेच झालेल्या हल्ल्यांचाही खरगे यांनी निषेध केला.'विकसित भारतः रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण)' (व्हीबी-जी रामजी विधेयक २०२५), जे मनरेगाची जागा घेणार होते, ते आता संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर झाल्यानंतर आणि राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर कायद्यात रूपांतरित झाले आहे.

# दिग्विजय सिंह यांच्याकडून पंतप्रधान आणि संघाची प्रशंसा

ट्विटरवर शेअर केला अडवाणी-मोदींचा जुना फोटो

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह यांनी सोशल मीडियावर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे वरिष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांचे छायाचित्र शेअर करत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपची प्रशंसा केली आहे. त्यांच्या या पोस्टमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला वेग आला असून विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.दिग्विजय सिंह यांनी पंतप्रधान मोदी यांचे १९९० च्या दशकातील एक जुने कृष्णधवल छायाचित्र शेअर केले आहे. या छायाचित्रात नरेंद्र मोदी हे लालकृष्ण अडवाणी यांच्या पायाजवळ जमिनीवर बसलेले दिसत आहेत. या छायाचित्रासोबत त्यांनी लिहिले की,



संघाचा जमीनीवर काम करणारा स्वयंसेवक आणि भाजपचा कार्यकर्ता खाली बसून मुख्यमंत्री आणि नंतर पंतप्रधान बनतो हीच या संघटनेची ताकद आहे. या पोस्टद्वारे दिग्विजय सिंह यांनी भाजप आणि तिच्या वैचारिक अधिष्ठान असलेल्या संघाच्या संघटनात्मक रचनेचे कौतुक केले. सामान्य कार्यकर्ता संघटनेतून पुढे जात राज्याचा मुख्यमंत्री आणि देशाचा पंतप्रधान कसा बनू शकतो, याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. सोबतच दिग्विजय यांनी हे छायाचित्र काँग्रेस पार्टी, राहुल गांधी आणि प्रियंका वाड्रा यांना देखील टॅग केले आहे. काही दिवसांपूर्वी दिग्विजय सिंह यांच्या लहान भावाने काँग्रेस विरोधात वक्तव्य केले होते. त्यानंतर आता दिग्विजय यांनी केलेल्या ट्विटमुळे काँग्रेस पक्ष आणि राजकीय वर्तुळात अनेक तर्क-वितर्क लावले जात आहेत.दरम्यान, दिग्विजय सिंह यांनी ट्विटरवर (एक्स) सांगितले की, हे छायाचित्र त्यांना क्वोरा या संकेतस्थळावर आढळले. त्यांनी या छायाचित्राला प्रभावी असे संबोधत संघ-भाजपच्या जमीनीवरील कार्यकर्त्यांना मिळणा-या संधींचे उदाहरण म्हणून त्याचा उल्लेख केला.मिळालेल्या माहितीनुसार, हे छायाचित्र १९९६ मधील असल्याचे सांगितले जात आहे. गुजरातचे माजी मुख्यमंत्री शंकरसिंह वाघेला यांच्या शपथविधी सोहळयादरम्यान हे छायाचित्र काढण्यात आले होते. त्या वेळी भाजपचे अनेक वरिष्ठ नेते या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## विस्तारीकरणाला बळ

नवी मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिल्या विमानाने आकाशात झेप घेतली आणि अनेक विक्रमांची नोंद झाली. देशातील सर्वात मोठे ग्रीन फिल्ड विमानतळ प्रवासी आणि मालवाहतुकीसाठी खुले झाले. देशातील एकाच शहरात दोन आंतरराष्ट्रीय विमानतळ असण्याचा बहुमान मुंबईने पटकावला. महामार्ग, द्रुतगती मार्ग, उपनगरीय रेल्वे, मेट्रो आणि जलवाहतुकीने जोडलेले हे देशातील एकमेव विमानतळ आहे. जवळपास २८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर नवी मुंबई विमानतळाचे स्वप्न प्रत्यक्षात साकारले. १९९७ मध्ये या विमानतळाचा प्रस्ताव पुढे आला. २००७ मध्ये त्याला केंद्राने मान्यता दिली. दरम्यानच्या काळात झालेली सत्तांतरे आणि कोरोनाचा कालावधी, यामुळे विमानतळ आकारास येण्यास तीन वर्षांचा विलंब झाला. या विमानतळामुळे मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर येणारा भार मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. त्याचबरोबर कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांचा देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय प्रवास अधिक सुकर होणार आहे.सध्या प्रचंड मोठी वाहतूक कोंडी भेदत मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचावे लागते. जितका वेळ पुण्याहून मुंबईच्या वेशीपर्यंत येण्यासाठी लागतो तितकाच; किंबहुना त्याहीपेक्षा अधिक वेळ गर्दीच्या वेळेत मुंबईच्या वेशीवरून आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत पोहोचण्यासाठी लागतो. हा वेळ आता नवी मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे वाचणार आहे. २०३२ पर्यंत या विमानतळावरून दरवर्षी तब्बल नऊ कोटी प्रवासी प्रवास करू शकणार आहेत. दुसरीकडे, अडीच दशलक्ष मेट्रिक टनांची मालवाहतूकदेखील या विमानतळावरून सुरू होईल. दोन समांतर धावपट्ट्या आणि चार टर्मिनल असलेले हे महाकाय विमानतळ येत्या काळात देशातील प्रमुख आंतरराष्ट्रीय विमानतळांपैकी एक असेल.देशातील कोणत्याही विमानतळावर नसतील इतक्या अत्याधुनिक सुविधांनी युक्त असे हे विमानतळ महाराष्ट्रासाठी नक्कीच गौरवास्पद ठरेल. याच नवी मुंबईत जेएनपीटीसारखे आंतरराष्ट्रीय बंदर आहे. तिथून भारतीय उत्पादने जगभर जातात. विशेषतः, कृषी उत्पादने विदेशात पाठवण्यात हे बंदर सिंहाचा वाटा उचलते. आता या बंदराच्या जोडीलाच नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळावरून मालवाहतूक सुरू होईल. त्यामुळे भाजीपाला, फळे आणि मासे असा नाशिवंत माल विदेशात मोठ्या गतीने पोहोचू शकेल. एका विमानतळाच्या उभारणीमुळे परिसराचा काय कायापालट होऊ शकतो. हे पाहायचे असेल तर नवी मुंबईच्या थक्क होणाऱ्या प्रगतीकडे एक नजर फिरवावी लागेल. पायाभूत सुविधा, बांधकाम व्यवसाय, हॉटेल उद्योग, वैद्यकीय आणि शैक्षणिक सुविधा उभारण्यासाठी प्रचंड मोठी चढाओढ लागली आहे. अर्थात, याआधीच नवी मुंबईचा नियोजनबद्ध पद्धतीने विकास सुरू झाला आहे.याशिवाय जगातील नामवंत विद्यापीठांनीदेखील नवी मुंबईमध्ये आपला परिसर उभारण्यासाठी महाराष्ट्र सरकारशी सामंजस्य करार केला आहे. माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या येथे पाय रोवत आहेत. आंतरराष्ट्रीय कृषी उत्पन्न बाजाराची पायाभरणीदेखील झाली आहे. महाराष्ट्रातील सर्वात मोठे मोत्यांचे पार्क होऊ घातले आहे. भविष्यात नवी मुंबईसारखे शहर आंतरराष्ट्रीय नकाशावर झळकणार आहे. पायाभूत सुविधांतून कोणत्याही शहराच्या प्रगतीचा महामार्ग ठरत असतो. या शहराची वाटचाल त्यादृष्टीने वेगाने सुरू आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे या प्रगतीला विशाल असे पंख लाभले आहेत.हे आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होत असतानाच देशातील अनेक शहरांमध्ये मेट्रोचे जाळे विस्तारण्याचा निर्णय केंद्र आणि तेथील राज्य सरकारांनी घेतला आहे. राजधानी दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहराला मेट्रो मार्गामुळे बऱ्यापैकी दिलासा मिळाला आहे. आता हा मेट्रो मार्ग आणखी विस्तारणार आहे. १६ किलोमीटर लांबीच्या या विस्तारित मेट्रो मार्गावर १३ स्थानके तयार करण्यात येत आहेत. सध्या दिल्लीचे नाव वायू प्रदूषणाच्या बाबतीत जगभरात कुप्रसिद्ध आहे. या प्रदूषणाला रस्ते वाहतूक ४० टक्के कारणीभूत असल्याचा निष्कर्ष नुकताच काढण्यात आला आहे. हे प्रदूषण कमी करायचे असेल, तर धूरविरहित सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला प्राधान्य द्यावे लागेल. दिल्लीत साडेतीन हजारांवर इलेक्ट्रिक बसेस धावतात. मात्र, मोठ्या लोकसंख्येच्या तुलनेत त्या अत्यंत कमी आहेत.रस्त्यांची मर्यादा लक्षात घेता एका ठराविक संख्येपर्यंतच या बसेस रस्त्यावर धावू शकतील. त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा मोठा डोलारा मेट्रोवर अवलंबून असणार आहे. वातावरण प्रदूषणमुक्त राखण्यासाठी आणि जलदगतीने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यास मेट्रोसारखा उत्तम पर्याय दुसरा नाही. त्यामुळेच दिल्ली मेट्रोच्या विस्तारीकरणाला केंद्र सरकारने १२,००० कोटींहून अधिक निधी देण्याचे ठरवले आहे. बंगळूरसारख्या महानगरातही कर्नाटक सरकारने मेट्रोचे जाळे विस्तारण्याचा निर्णय घेतला आहे. जपानच्या सहकार्याने बंगळूरमध्ये मेट्रो मार्गाची उभारणी सुरू आहे. पुढील वर्षी ३८ किलोमीटर, तर २०२७ पर्यंत १७५ किलोमीटरच्या मेट्रो मार्गाची उभारणी या शहरात केली जाईल. पर्यटन आणि माहिती-तंत्रज्ञान कंपन्यांमुळे बंगळूरने आंतरराष्ट्रीय नकाशावर आपले स्थान निर्माण केले आहे. या शहराचे क्षेत्रफळ पाहता तिथे लोकसंख्येची दाटी अधिक आहे.खासगी वाहनांची संख्याही अधिक आहे. परिणामी, हे शहर सातत्याने वाहतूक कोंडीत अडकलेले असते. त्यावर उपाय म्हणून तेथे मेट्रो मार्गाचे जाळे अधिकाधिक पसरवणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे जितके झपाट्याने हे जाळे विस्तारेल, तितकी या वाहतूक कोंडीतून नागरिकांची मुक्तता होईल. पुणे आणि नागपूर येथेही मेट्रो मार्ग शहराच्या विविध भागांमध्ये पोहोचवण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. नागपुरात दुसऱ्या टप्प्याचे काम सुरू झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सततच्या पाठपुराव्यांमुळे नागपूरची मेट्रो वेळेत सुरू झाली आणि त्याचे विस्तारीकरणही झपाट्याने होईल यासाठी प्रयत्न सुरू आहेत. पुणे मेट्रोसाठी सरकारने शंभर कोटींचे भाग भांडवल उभारण्यासाठी मंजुरी दिली. त्यामुळे या शहरातील मेट्रो मार्ग विस्तारण्यासाठी सज्ज झाला आहे. एकूणच देशातील मोठ्या शहरांत सार्वजनिक वाहतूक सुविधांची उभारणी झपाट्याने सुरू झाली आहे.यात प्राधान्याने महानगरांतील वाहनांमुळे होत असलेले प्रदूषण रोखण्यासाठी मेट्रोसारखे पर्याय आणखी सक्षम करायला हवेत.

# उबाठा मनसे युती म्हणजे एकादशीच्या घरी शिवरात्र !!

महानगर पालिका निवडणुकात श्रीमान उबाठा आणी श्रीमान राश्रीठा एकत्रित आल्याचे वृत्तवाहिन्यातून दिसले.एरव्ही एकमेकांचे प्रचंड वस्त्रहरण करून एकमेकांच्या इज्जती पार वेशीवर टांगणारे दोघे भाऊ एकत्र आले.दोन परिवारातून विस्तव आडवा जात नव्हता ते आता एकमेकांना गोडाचा घास भरवतांना दिसताहेत.संपलेल्या पक्षावर न बोलण्याची भाषा करणारे एकमेकांवर स्तुतीसुमने उधळतांना दिसत आहेत.असा चमत्कार का झाला असेल? हा प्रश्न महाराष्ट्राला अजिबात पडलेला नाही.दोन्ही पक्ष शेवटच्या घटका मोजत असल्याचे सर्वांना ज्ञात आहे.'मरता क्या न करता?'या दयनीय स्थितीत असल्याने दोन शरपंजरी असलेले अखेरचा प्रयत्न म्हणून एकत्रित येवून एकमेकांना संजीवनी देण्याचा प्रयत्न करीत आहेत.हे लहान लेकरालाही कळते.



हिंदूहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे जिवंत असतांना घटस्फोट घेऊन वेगळे होतांना पु.बाळासाहेबांच्या भावनेचा, स्वप्नांचा, आकांक्षेचा, इच्छेचा कुठलाही विचार न करता शिवसेनेची चिरफाड करून वध करण्याचे महापातक ज्यांनी केले ते त्यांच्या पश्चात खरेच स्वच्छ मनाने एकत्र येतील?पूजनीय बाळासाहेबांच्या भावनांचा शिरच्छेद करून विलग होतांना ज्यांनी 'जनाची जाऊ द्या पण मनाचीही बाळगली नाही'ते आता एकत्रित येताहेत.त्यांच्या एकत्र येण्याने वंदनीय बाळासाहेबांच्या पिंडाला काकस्पर्श होईल असे मराठी माणसाला अजिबात वाटत नाही.

तत्वाला तिलांजली देवून वाटचाल करणारे उद्धवजी आणी प्रत्येक वेळा विचार बदलणारे तळ्यात मळ्यात करणारे राजसाहेब या दोघांच्याही बदललेल्या भूमिकांचा महाराष्ट्राला विट आलाय.नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज संस्था नगरपालिका निवडणुकीत महाराष्ट्राने स्पष्ट केले.उबाठाला बेन्यापुरते तर मनसेला बेन्यालाही ठेवले नाही.बर ते ही जाऊ द्या ! यश अपयश योगायोग समजू आपण.पण वागणूक तर विधायक आणी योग्य हवी ! वागण्यबोलण्यात मार्दव,विनय हवा.कथनी करणीत साधर्म्य हवे!संस्कृतात एक म्हण आहे.'अव्यास्थित चित्तांनां प्रसादोपी भयंकर:!'ज्याचे चित्त अस्थिर आहे त्याचा कृपाप्रसादही भयंकर असतो.मविआ स्थापन झाल्यावर उबाठासोबत राहतांना इतर घटक पक्षांना त्याचा अनुभव आला.उबाठाच्या मदतीने महाराष्ट्रात मविआने सत्ता तर आणली पण सत्तेच्या काळातील उबाठाच्या वागणुकीने सर्वच त्रस्त होते.घरातून काम करणारा,कोणालाही न भेटणारा मुख्यमंत्री त्यांच्या नशिबात आला.ही बाब दस्तूरखुद्द श्री.शरद पवार साहेबांनी आपल्या पुस्तकात त्यांच्या शैलीत स्पष्ट नमूद केली.त्यानंतर सरकारच गेले आणी मविआ तील सर्वच पक्षांची अवस्था 'जळो जिने लाजिरवाणे'अशी झाली.मविआ तील घटक पक्षांना क्षयरोगाने पछाडले.उबाठाचा कृपाप्रसाद किती भयंकर हे त्यांना जाणवले.कॉंग्रेसने तर महानगरपालिका निवडणुकात आपला वेगळा घराठाव मांडला देखील.आपल्या कडे काळतोंड्या नावाचा प्रकार असतो.अस म्हणतात या काळतोंड्याचे तोंड देखिल पाहू नये.मविआ तील इतर घटक पक्षांना उबाठा काळतोंडी वाटू लागल्याने त्यांनी त्यांनी आपापला मार्ग निवडला.

एकट्या आणी वांझोट्या उबाठाला कुणाच्यातरी आधाराची गरज होती.मग काय? एकादशीच्या घरी शिवरात्र गेली.उबाठाच्या दारात मनसे गेली.दोन्ही पक्षावरची सोप गेलेली.'नाइलाज को कोई इलाज नही'म्हणून एकत्र आलेत.एकत्र यायचच होते तर वेगळे का झाले? हा प्रश्न महाराष्ट्र विचारतोय त्यांना.सध्या जरी ते एकत्रित आले असतील तरीही ते फार काळ टिकतील असे कोणालाही वाटत नाही.दोघांचीही रस्सी जळाली असली तरी पिळ कायम आहे.तसेही पाण्यात पेटतेल कितीही घातले तरी ते एकमेकात मिसळत नसतात.तैसे होणार उबाठा मनसेचे.

मराठी माणसाचा राग आळवत ते एकत्र आले खरे पण त्यांचा हा राग जुना झाला असून महाराष्ट्रातील जनता वैतागली आहे.मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा प्रयत्न सुरू आहे हे सर्व फंडे जनतेने जाणले आहेत.त्यांचे मित्रपक्ष त्यांना जवळ घेत नाहीत,मराठी माणसाने यांचे इरादे ओळखले आहे.अशावेळी काय करावे? सोम्या पाशी गोम्या गेला.पण लक्षात ठेवा!उघड्या पाशी नागडे गेल्याने दोघेही थंडीने कुड कुड कुडतात आणी मरतात.उबाठा आणी मनसे ही मोठ्या उदात्त हेतूने एकत्र आली नसून व्यक्तिगत राजकीय स्वार्थ म्हणून एकत्र आलेली अभद्र एकी आहे.खरच यांचा विधायक विचार असता तर हे वेगळेच झाले नसते.पू.बाळासाहेब ठाकरेंना दिलेल्या यातनांचा हिशेब मराठी माणूस घेतोय आणी घेत राहणार.

शून्यात कितीही शून्य मिळवा उत्तर शून्यच असेल.एकादशीच्या घरी शिवरात्रीने मुक्काम केला तरी पोटाला उपवासच असतो. स्वपक्षियांनी अव्हेरले,मराठी माणसाने नाकारले,कुठेच मार्ग दिसत नाही.अखेरची घरघर म्हणून उसणे अवसान आणण्याचा हा प्रकार म्हणजे उबाठा मनसे युती होय.तूर्तास इतकेच.

**प्रा.दिलीप जोशी,**
वाशिम.मो.९८२२२६२७३५

## चांदीचे भावही गगनाला

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील वेगवान आर्थिक घडामोडी आणि सततच्या वाढत्या मागणीमुळे सोन्या-चांदीच्या दरात वेगाने वाढ होत आहे. विशेषतः चांदीचे दर द्रुतगतीने वाढत आहेत.३१ डिसेंबर २०२४ रोजी ८९,७०० रुपये प्रतिकिलो असणारी चांदी १,४३३०० रुपयांनी वाढून २४ डिसेंबर २०२५ रोजी तब्बल २,३३,००० रुपये प्रतिकिलो वर जाऊन पोहोचली आहे. गुंतवणुकीचा सर्वाधिक सुरक्षित पर्याय असलेल्या सोन्याने यावर्षी अंदाजे ७८ टक्के परतावा दिला असताना चांदीने मात्र गुंतवणूकदारांना १४२ टक्क्यांचा विक्रमी परतावा देऊन मालामाल केले. चांदी २०२६ मध्ये तीन लाखांचा टप्पा सहज पार करेल असा अंदाज तज्ज्ञांनी वर्तविला आहे. सोलर पॅनल, इलेक्ट्रिक व्हेइकल, इलेक्ट्रॉनिक उद्योग तसेच ग्रीन एनर्जीशी संबंधित उद्योग क्षेत्रात वाढलेला चांदीचा वापर, डॉलरच्या तुलनेत रुपयाची होत असलेली घसरण, सुरक्षित गुंतवणूक म्हणून चांदीकडे वाढलेला गुंतवणूकदारांचा कल, चांदीच्या मागणी आणि पुरवठ्यातील तफावत तसेच जागतिक स्तरावरील युद्धजन्य परिस्थिती यामुळे चांदीच्या दरात मोठी वाढ झाली आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा चांदीचा ग्राहक असल्यामुळे भारताला या वाढीचा सर्वाधिक फटका बसतो आहे.

**- प्रदीप मोरे**

## पर्यावरणद्रोही धोरणांना एकजुटीची गरज

भांडवलशाही व्यवस्थेकडून देशाच्या पर्यावरणावर पद्धतशीरपणे घाव घातला जात असल्याचा आरोप भाजपविरोधी पक्षांकडून केला जात आहे. शहरांच्या प्रदूषणांनी घातक पातळी गाठली असून याला कारणीभूत सत्ताधाऱ्यांचे पर्यावरणविरोधी धोरण कारणीभूत ठरते मात्र, कुठलीही जबाबदारी अंगावर न घेता त्यातून पुन्हा पर्यावरण ऱ्हासाची खेळी खेळली जात आहे. अरावली पर्वताबाबत देण्यात आलेला हा निर्णय त्याचेच एक उदाहरण म्हणता येऊ शकेल. त्यामुळे अरावली पर्वतराजीच्या अस्तित्वासाठी हजारो लोक संघटित होण्यासाठी पुढे येत आहेत. समाज माध्यमावर याबाबत हॅश टॅग चालवला जात आहे. पुढील पिढ्यांच्या भवितव्यासाठी आजच लोकांनी संघटित होऊन पर्यावरणविरोधी धोरणांना कडाडून विरोध केला पाहिजे. यावर सर्वांचे एकमत होत आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

# विदर्भातले बोधप्रद निवडणूक निकाल





**नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकांच्या मतमोजणीने विदर्भातील राजकीय चित्र स्पष्ट केले आहे. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक नगराध्यक्षपदे जिंकत आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले, तर काँग्रेसनेही ग्रामीण भागात आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निकालातून राज्यातील दिग्गज नेत्यांची ताकद, काहींचा प्रभाव कमी झाल्याचे संकेत, तसेच घराणेशाहीविरोधात मतदारांचा बदलता कल ठळकपणे समोर आला आहे. विदर्भातील हे निकाल सर्वच पक्षांसाठी दिशादर्शक ठरणारे आहेत.**

यात सर्वात अधिक ५२ ठिकाणी आपले नगराध्यक्ष निवडून आणून भारतीय जनता पक्ष सर्वात मोठा पक्ष ठरला. दुसऱ्या क्रमांकावर २१ जागा घेत काँग्रेसने बाजी मारली आहे. तिसऱ्या क्रमांकावर शिंदे यांची शिवसेना आठ जागा, त्या खालोखाल अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस चार जागा घेऊन थांबली आहे. उबाठा सेनेला देखील चार नगराध्यक्ष पदे मिळाली, तर शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस एमआयएम आणि वंचित बहुजन आघाडी यांचाही प्रत्येकी एक नगराध्यक्ष निवडून आला. अपक्ष आणि अन्य आठ जागी नगराध्यक्ष विजयी झाले आहेत.याशिवाय नगरसेवक निवडीत देखील भारतीय जनता पक्षानेच आघाडी घेतलेली दिसत आहे. अनेक ठिकाणी तर अध्यक्ष जरी काँग्रेसचा असला, तरी सदस्य भाजपच्याच बहुमतात आहेत, असेही चित्र दिसत आहे. विदर्भात भारतीय जनता पक्षाचा आजही चांगलाच जोर आहे हे चित्र स्पष्ट झाले आहे. नगर परिषद निवडणुका या जरी स्थानिक स्तरावरील असल्या तरी त्यात अनेक राज्यस्तरीय नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागलेली दिसून येत होती. विदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आशीष जयस्वाल, परिणय फुके, विजय वडेट्टीवार इत्यादी नेते आपली बाजी राखण्यात यशस्वी झाले आहेत, तर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कर्जरोखे घोटाळा प्रकरणात आमदारकी गमवावी लागणारे माजी मंत्री सुनील केदार, माजी विधानसभा अध्यक्ष आणि माजी काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले, राज्यमंत्री पंकज भोयर, माजी मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार, माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल तसेच केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांना अपयशाचा सामना करावा लागला आहे. शिवसेनेचे आमदार नरेंद्र भोंडेकर हे आपल्या नगराध्यक्ष पदासाठी उभ्या असलेल्या पत्नीचा पराभव देखील टाळू शकलेले नाहीत. माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल यांना देखील मतदारांनी नाकारलेले दिसत आहे.

महाराष्ट्राची उपराजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागपूर जिल्ह्यात १५ नगर परिषद आणि १२ नगरपंचायतीपैकी २२ ठिकाणी भाजपनेच आपला झेंडा रोवला आहे. रामटेक आणि पारशिवनीत आशीष जयस्वाल यांच्या शिवसेनेने देखील आपले खाते उघडले आहे. नागपूर जिल्ह्यात मोहोपा वगळता काँग्रेसला कुठेही जागा मिळाली नाही. भाजपचे आमदार आशीष देशमुख यांनी आपले परंपरागत वैरी सुनील केदार यांच्या सर्वच उमेदवारांना धूळ चारली आहे. रामटेक लोकसभा क्षेत्रातील खासदार श्याम कुमार बर्वे यांच्या उमेदवारांचाही पराभवच झालेला दिसतो आहे. हिंगण्यातील भाजप आमदार समीर मेघे यांच्या क्षेत्रातील नगर परिषदांमध्ये देखील भाजपचा जोर राहिलेला दिसत आहे. वर्ध्यात भाजप शिवसेना युती आणि काँग्रेसप्रणीत आघाडी यांनी अर्ध्या जागा वाटून घेतल्याप्रमाणे दिसत आहे. गेल्या वेळेच्या तुलनेत भाजपला वर्धा जिल्ह्यात तीन नगराध्यक्षपदावर पाणी सोडावे लागले. वर्धा आणि देवळी येथे जरी नगराध्यक्षपद गेले तरी नगरसेवकांचे बहुमत आहे. यावेळी हिंगणघाट, आर्वी, सिंधी रेल्वे येथे नगराध्यक्षपदी भाजप उमेदवार विजयी झाले आहेत. काँग्रेसने वर्धा पुलगाव येथे आपले नगराध्यक्ष निवडून आणलेले आहेत. विशेष म्हणजे भाजप नेते आणि माजी खासदार रामदास तडस यांच्या पत्नीला देखील पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

चंद्रपूरमध्ये भाजपने जोर मारला होता मात्र काँग्रेसने तब्बल सात नगर परिषदांवर आपले वर्चस्व कायम राखले आहे. दोन जागा शिवसेना शिंदे गटाला तर भाजपला फक्त एका नगर परिषदेत आपला अध्यक्ष निवडून आणता आला आहे. इथे काँग्रेसच्या सर्व निवडणुकांचे नियोजन विधानसभेतील काँग्रेस गटनेते विजय वडेट्टीवार यांनी केले होते. त्यामुळे यशाचे मानकरी तेच ठरले आहेत. भाजपचे सुधीर मुनगंटीवार, देवराव भोंगळे, किशोर जोरगेवार, करण देवतळे असे चार आमदार असतानाही हा अपयशाचा सामना करावा लागला आहे. या अपयशाबाबत माजी मंत्री आणि आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी पक्ष नेतृत्वावरच टीका केली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील तिन्ही नगर परिषदांवर भाजपने आपला झेंडा फडकवला आहे. चंद्रपूरचे गडचिरोलीचे पालकमंत्री असणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. गोंदिया जिल्ह्यात गोंदिया तिरोडा नगर परिषद आणि सालेकसा व गोरेगाव नगरपंचायतीत सत्ताधारी भाजपला केवळ एक जागा रिक्त झाली, तर काँग्रेसने तीन जागा जिंकल्या. गोंदिया नगर परिषदेत प्रफुल्ल पटेल, भाजपचे आमदार विनोद अग्रवाल आणि गोपालदास अग्रवाल यांनी पूर्ण ताकद लावली होती. मात्र त्यांना अपेक्षित यश मिळवता आले नाही. भंडारा जिल्ह्यात भंडारा तुमसर पवनी आणि साकोली या चार नगर परिषदांमध्ये भाजपचे नगराध्यक्ष निवडून आले. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसची इथे चांगलीच पिछेहाट झाली आणि शिंदे सेनेला देखील इथे यश मिळवता आले नाही. अमरावती जिल्ह्यात दहा नगर परिषद आणि दोन नगरपंचायतींचा निकाल भाजपला चांगलाच धक्का देणारा ठरला आहे. भाजपला सहा नगराध्यक्षपदे, काँग्रेसला दोन, प्रहार, उबाठा, शिंदे सेना आणि अपक्ष प्रत्येकी एक असे नगराध्यक्ष निवडून आले आहेत.

यावेळी ग्रामीण भागात काँग्रेसने बऱ्यापैकी जोर मारल्याचे दिसून आले आहे. चिखलदरा येथे काँग्रेसचा नगराध्यक्ष निवडून आला आहे. यवतमाळ जिल्ह्यात पंधरा ठिकाणी निवडणुका झाल्या. त्यात राष्ट्रवादी पक्षाचे इंद्रनील नाईक यांच्या पत्नी मोहिनी नाईक या पुसदमध्ये विजयी झाल्या. यवतमाळमध्ये आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांची कन्या प्रियदर्शनी उईके या विजयी झाल्या आहेत. उमरखेडमध्ये भाजपला पराभवाचा सामना करावा लागला आहे. पालकमंत्री संजय राठोड यांच्या मतदारसंघातील दारव्हा व नेर नवापूर नगर परिषदांवर सेनेचा भगवा फडकला आहे. दिग्रस नगर परिषद अध्यक्षपदी उबाठा सेनेचा उमेदवार विजयी झाला आहे. वाशिम जिल्ह्यात चार नगर परिषद आणि एक नगरपंचायत निवडणुकीत माजी आमदारांसह विद्यमान आमदार अमित झनक यांनाही मतदारांनी धक्का दिला आहे. रिसोड नगर परिषद अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भाजपचा तर मालेगावात शिंदे सेनेचा उमेदवार विजयी झाला. कारंजा नगर परिषदेत एमआयएमचा नगराध्यक्ष विजयी झाल्याने भाजप आमदार सई डहाके यांच्यासाठी तो धक्काच ठरला आहे. या मतदारसंघात नेत्यांच्या नातेवाइकांना देखील मतदारांनी नाकारलेले दिसून आले आहे.

अकोला जिल्ह्यातही नेत्यांच्या नातेवाइकांना मतदारांनी नाकारलेले दिसून आले आहे. भाजप आमदार हरीश पिंपळे यांचे भाऊ मूर्तिजापूर नगर परिषदेत पराभूत झाले. बाळापूर नगर परिषदेत माजी आमदार नातेपुते यांच्या पत्नी रजिया बेगम यांनाही पराभवाला सामोरे जावे लागले. अकोल्यातही काँग्रेसचे नेते दीपक बोडखे यांच्या पत्नींचाही पराभव झाला. एकूणच अकोल्यात मतदारांनी आता घराणेशाही थांबवा हा संदेश दिल्याचे दिसून आले आहे. बुलढाणा जिल्ह्यात भाजपचे चार, तर काँग्रेसचे तीन नगराध्यक्ष विजयी झाले. चिखली खामगाव नांदुरा आणि जळगाव जामोद येथे भाजपचे, तर लोणार-मलकापूर आणि शेगावमध्ये काँग्रेसचे नगराध्यक्ष निवडून आले. शिंदेसेना, राष्ट्रवादी अजित पवार गट, शरद पवार गट आणि उबाठासेना प्रत्येकी एका ठिकाणी नगराध्यक्ष निवडून आणू शकले आहेत. मलकापूरचे आमदार चैनसुख संचेती, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि भाजपचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष विजयराव शिंदे यांच्या उमेदवारांना देखील फटका बसलेला दिसून आला आहे.

एकूणच विदर्भाचे सर्व निकाल बघता इथे भाजपने आपले एकहाती वर्चस्व सिद्ध केलेले दिसून आले आहे. भाजप पाठोपाठ काँग्रेसने देखील आपले अस्तित्व कायम राखले आहे. एका काळात विदर्भ हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता. अजूनही ग्रामीण विदर्भात काँग्रेसचे नेटवर्क कायम आहे, हे या निकालातून दिसून आले आहे. त्यातही भाजपमध्ये काही ठिकाणी असलेला अंतर्गत संघर्ष त्यांना अडचणीचा ठरला आहे. अन्यथा भाजप काँग्रेसला देखील रोखू शकला असता अशी परिस्थिती होती मात्र चंद्रपुरात मुनगंटीवार, जोरगेवार आणि हंसराज जाहीर यांच्यातील अंतर्गत संघर्षामुळे चंद्रपूरमध्ये भाजपचे असे पानिपत झालेले दिसून आले आहे. आता विदर्भात चार महापालिकांच्या निवडणुका तोंडावर आहेत. या निकालातून सर्वच पक्षांनी घ्यायचा तो बोध घेऊन वाटचाल करायची आहे. त्यावरच सर्व पक्षांचे महापालिका निवडणुकातील यशापयश ठरणार आहे.

**अविनाश पाठक**

# भोपळ्याच्या राजकारणातून शिवसेनेतील अंतर्गत संघर्ष चव्हाट्यावर

## यवतमाळात ठाकरे गटात आरोप–प्रत्यारोप, सत्कार कार्यक्रमात गोंधळ





जनमाध्यम प्रतिनिधी

**यवतमाळ – स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांमध्ये अनेक पक्षांनी घवघवीत यश मिळविले, तर शिवसेना ठाकरे गट पक्षांच्या पदरी निराशा आली. या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील अंतर्गत राजकारण उघडकीस येत असून, निवडणुकीतील अपयशावरून पक्षातील दोन गट आमनेसामने आले आहेत.**

निष्कासित माजी विधानसभा प्रमुख संतोष ढवळे यांनी २६ डिसेंबर रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत थेट खासदार संजय देशमुख यांच्यावर गंभीर आरोप करत, निवडणूक प्रक्रियेत दुर्लक्ष केल्यामुळे शिवसेनेला 'भोपळा' मिळाल्याचा दावा केला होता. खासदारांनी निवडणूक काळात मदत न केल्याने अनेक उमेदवारांचे राजकीय भवितव्य धोक्यात आल्याचेही त्यांनी सांगितले होते. याच निषेधार्थ २७ डिसेंबर रोजी उत्सव मंगल कार्यालयात खासदारांचा "उपरोधिक सत्कार" करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्यासंबंधी बातम्याही प्रसारित झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर आज शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली यवतमाळ येथे पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी गायकवाड यांनी संतोष ढवळे यांच्यावर जोरदार टीका करत, "ढवळे यांनी आधीपासूनच पक्षाच्या विरोधात काम केले असून काँग्रेस नेत्यांशी संगनमत करून शिवसेनेशी गद्दारी केली," असा आरोप केला. राजेंद्र गायकवाड म्हणाले की, "निवडणुकीच्या काळात काँग्रेससोबत युती तुटलेली असतानाही युती असल्याचा अपप्रचार करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्यात आला. याचा थेट फटका शिवसेनेच्या उमेदवारांना बसला." खासदार संजय देशमुख यांनी निवडणूक जाहीर झाल्यानंतर अनेक ठिकाणी सभा घेतल्या व मतदारांशी थेट संवाद साधल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे खासदार यांच्या विरोधात अपप्रचार शिवसेना सहन करणार नाही. असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. मात्र यवतमाळात अपेक्षित यश न मिळण्यामागील कारणे स्पष्ट करताना गायकवाड यांनी सांगितले की, "पक्षाने काँग्रेससोबत युती करण्याचा प्रयत्न केला होता, मात्र काँग्रेसची तशी इच्छा नव्हती. युती तुटल्यानंतर संतोष ढवळे यांनी पक्षाला विश्वासात न घेता काँग्रेसचे आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्याशी गुप्त बैठका घेतल्या. प्रभाग क्रमांक ०८ साठी जिल्हा सचिव तुषार देशमुख यांच्या आईंना उमेदवारी देण्याचा पक्षाचा निर्णय असतानाही, ढवळे यांचा ती जागा स्वतःसाठी मिळवण्याचा अट्टाहास होता." "मागणी मान्य न झाल्यास पक्षाचे सर्व उमेदवार मागे घेऊन काँग्रेसकडून निवडणूक लढवण्याची धमकी देण्यात आली. त्यानंतर त्यांनी उघडपणे काँग्रेसचा प्रचार केला," असा गंभीर आरोपही त्यांनी केला. दरम्यान, उत्सव मंगल कार्यालयात आयोजित सत्कार कार्यक्रमा दरम्यान मोठा गोंधळ उडाला. शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी कार्यक्रमस्थळी जाऊन बॅनर फाडले व जोरदार घोषणाबाजी केली.

परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी अवधूतवाडी पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी दोन्ही बाजूंना समज देत शांतता राखण्याचे आवाहन केले. यावेळी संतोष ढवळे व राजेंद्र गायकवाड यांच्यात शाब्दिक चकमक झाली. ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी खासदार संजय देशमुख यांच्या विरोधात घोषणाबाजी करू नये, असे आवाहन केले. राजेंद्र गायकवाड यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "संतोष ढवळे यांची शिवसेनेतून अधिकृत हकालपट्टी झाली आहे. त्यांच्या सोबत असलेले लोक आता शिवसैनिक राहिलेले नाहीत. शिवसेनेत इमानदार कार्यकर्त्यांनाच स्थान आहे, गद्दारांना कोणतीही माफी नाही." या संपूर्ण घडामोडींमुळे यवतमाळच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर शिवसेना ठाकरे गटातील अंतर्गत संघर्ष उघडपणे समोर आल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. आगामी काळात या वादाचा पक्षाच्या संघटनात्मक रचनेवर काय परिणाम होतो, याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख जयंतीनिमित्त शिवरामजी मोघे महाविद्यालयात विशेष कार्यक्रम संपन्न



जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा - महान समाजसुधारक, थोर शिक्षणतज्ज्ञ, शेतकऱ्यांचे कैवारी तसेच भारताचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पांढरकवडा येथे राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. विश्वजीत कांबळे व प्रा. डॉ. उल्हास राठोड उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. विश्वजीत कांबळे यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक, सामाजिक व कृषी क्षेत्रातील भरीव योगदानावर सखोल मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांनी केलेले कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच प्रा. डॉ. उल्हास राठोड यांनी आपल्या मनोगतातून डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शिक्षणप्रसाराच्या कार्याचा आढावा घेत युवकांनी त्यांच्या विचारांवर चालण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारांचा वारसा युवकांनी पुढे नोवा, असे सांगत शिक्षणातून समाजपरिवर्तन घडवणे हा त्यांचा मूलमंत्र असल्याचे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे संचलन कु. चंचल कुळसंगे हिने केले, तर आभार प्रदर्शन कु. निकिता घोडाम हिने केले. सदर कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डॉ. अमर वंजारी व प्रा. डॉ. उषा राखुंडे यांनी स्वयंसेवकांच्या सहकार्याने विशेष परिश्रम घेतले.

## वेचक



### खो-खोमध्ये कलगाव शाळेची थेट जिल्हास्तरावर निवड

महागाव - जि.प.उच्च प्राथमिक शाळा,कलगाव केंद्र.. सवना येथील शाळेने शालेय क्रीडा क्षेत्रात अत्यंत अभिमानास्पद अशी कामगिरी नोंदवत नवा इतिहास रचला आहे. प्रथमच कलगाव शाळेत खो-खो या पारंपरिक सांघिक खेळाची सुरुवात करण्यात आली आणि पहिल्याच प्रयत्नात विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत थेट जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड मिळवली. तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खो-खो (सांघिक) प्रकारात जि.प.शाळा कलगाव शाळेने प्रथम क्रमांक पटकावून आपल्या गुणवत्तेची चुणूक दाखवली. याचबरोबर रिले स्पर्धेत उपविजेतेपद मिळवून संघभावना व वेगाचे उत्कृष्ट प्रदर्शन करण्यात आले. वैयक्तिक क्रीडा प्रकारांतही कलगाव शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. १०० मीटर धावणे व लांब उडी या स्पर्धांत प्रथम क्रमांक, लहान गट रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक, तर २०० मीटर धावणे या प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावून विद्यार्थ्यांनी शाळेच्या क्रीडा परंपरेत नवा अध्याय जोडला. या उज्वल यशामागे विद्यार्थ्यांचा सातत्यपूर्ण सराव, क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन, मुख्याध्यापकांचे प्रेरणादायी नेतृत्व तसेच शाळा व्यवस्थापनाचा मोलाचा पाठिंबा लाभला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शिक्षकवृंद, पालक व ग्रामस्थांनी विजेत्या खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव केला असून, आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. प्रथमच खो-खोची सुरुवात करून थेट जिल्हास्तर गाठणे हे कलगाव शाळेच्या क्रीडा इतिहासातील प्रेरणादायी व सुवर्णअध्याय ठरले आहे. या यशाचे श्रेय खो खो खेळाचे मार्गदर्शक शिक्षक बाबासाहेब आचार्य, शाळेचे मुख्याध्यापक साहेबराव भांगे, रमेश पवार, गजानन खराटे, शिवशंकर पंचपुत्रे, बालाजी देशमाने, सौ.शलाका राजे शिक्षण प्रेमी प्रितम सर खंदारे केंद्र प्रमुख बाबु खंदारे यांना जाते.

### शौर्य व त्यागाचे प्रतीक : वीर साहिबजाद्यांच्या स्मृतीत कला, वाणिज्य महाविद्यालयात बाल दिवस साजरा




राळेगाव - कला वाणिज्य महाविद्यालय, राळेगाव येथे केंद्र शासन तसेच विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या निर्देशानुसार दिनांक 26 डिसेंबर रोजी बाल दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्करराव सावरकर होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "शिख धर्माचा इतिहास हा शौर्य आणि त्यागाचे प्रतीक आहे. दहावे गुरु गोविंदसिंग यांच्या चारही मुलांचे बलिदान भारतीय समाजासाठी प्रेरणादायी ठरते. त्यालाच अनुसरून बाल दिवस साजरा केला जातो." राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. विशाल दौलतकर यांनी प्रस्ताविक व संचालन करताना साहिबजाद्यांच्या बलिदानाचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, 26 डिसेंबर रोजी गुरु गोविंदसिंग यांच्या चारही मुलांनी मोगलांशी झालेल्या संघर्षात वीरमरण पत्करले. त्यापैकी लहान साहिबजादे जोरावर सिंग (८ वर्षे) आणि फतेह सिंग (६ वर्षे) यांनी धर्म बदलण्यास नकार दिला. वझीर खानने त्यांना सरहिंदच्या किल्ल्यात जिवंत भिंतीत चिणून मारण्याचा आदेश दिला. त्यांच्या बलिदानाने शीख समाजात शौर्य आणि धैर्याची ज्योत कायम ठेवली. या कार्यक्रमात वीर साहिबजाद्यांच्या बलिदानावर आधारित लघुचित्रफित विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली. इतिहास विभागाच्या वतीने शीख धर्माचा जाज्वल्य इतिहास विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आला. कार्यक्रमाचे आभार महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. शालिनी हटवार यांनी मानले. कार्यक्रमाला मराठी विभाग प्रमुख प्रा. अनिल दौलतकार, ग्रंथपाल प्रा. सुरेश फुलकर, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रुपेश पवार, कर्मचारी नारायण बुरबुरे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २८ बालकांना मिळणार 'दिलसा..!

### मोफत हृदय शस्त्रक्रियेसाठी निवड, आरोग्य भारती व जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाचा स्तुत्य उपक्रम



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ – आरोग्य भारती यवतमाळ व जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिबिरात 28 बालकांना नवजीवन मिळणार आहे. राष्ट्रय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या या शिबिरात या बालकांची मोफत हृदयरोग शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली आहे.स्थानिक शिवनेरी चिल्ड्रेन्स हॉस्पिटल अँड कार्डियाक सेंटर येथे हे बालहृदयरोग तपासणी शिबिर पार पडले. यात एकूण 79 बालकांची मोफत '2 डी ईको' तपासणी करण्यात आली. त्यातील 28 बालकांवर शस्त्रक्रिया गरजेची असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले. यामुळे गरजू कुटुंबांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड आणि पत्रकार उज्ज्वल सोनटक्के उपस्थित होते. भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने शिबिराची सुरुवात झाली. यावेळी आरोग्य भारतीचे प्रांत सचिव डॉ. प्रसाद बनसोड व डॉ. दीपक घरझोडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. संजय जोशी यांनी राष्ट्रभक्तीपर गीत सादर करून वातावरणात चैतन्य निर्माण केले. याप्रसंगी डॉ. रमेश मंदन, डॉ. शंतनू गोमासे, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम जिल्हा संयोजक कुणाल पिसोळे, डॉ. ओंकार कोंडोलीकर, मनीष गुबे, राकेश मिश्रा, संजय सांबजवार, प्रशांत बोराडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

### जनजागृतीसाठी उपक्रम राबवणार – डॉ. आखरे

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभारप्रदर्शन करताना आरोग्य भारतीचे जिल्हा कार्याध्यक्ष डॉ.अनिल आखरे म्हणाले की, बालहृदयरोगाचे वेळेत निदान होणे गरजेचे आहे. त्यासाठी यापुढेही नागरिकांमध्ये बालहृदयरोगाबाबत जनजागृती करण्यासाठी आरोग्य भारतीच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येतील.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर अध्यक्ष प्रकाश खुडसंगे यांचा कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश

### आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक ऊईके यांच्या नेतृत्वाखाली पक्ष प्रवेश



जनमाध्यम प्रतिनिधी

राळेगाव - राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राळेगाव शहर अध्यक्ष प्रकाश खुडसंगे यांनी आपल्या असंख्य समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे राळेगाव शहरात राष्ट्रवादी काँग्रेसला भगदाड पडले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची उरलीसुरली ताकद आता कमी झाली असून भाजपची ताकद राळेगाव शहरात अधिक वाढली आहे.

दिनांक २६ डिसेंबर रोजी सायंकाळी ५:३० वाजता स्थानिक विश्रामगृह येथे हा सोहळा पार पडला. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष अॅड. प्रफुलसिंह चौहाण, राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके, तालुका अध्यक्ष छायाताई पिंपरे व शहर अध्यक्ष शुभम मुके यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला. या सोहळ्याला भाजपचे ज्येष्ठ नेते चित्तरंजन दादा कोल्हे, संजय काकडे, डॉ. कुणाल भोयर, माजी जिल्हा परिषद सदस्य उषाताई भोयर, माजी नगराध्यक्ष बबनराव भोंगारे, अरविंद फुटाणे, प्रवीण कोकाटे, प्रशांत तायडे, अनिल नंदुरकर, गणेश देशमुख, विनोद मांडवकर, दिनेश गोहणे, आशिष इंगोले, अरुण शिवणकर, संदीप तेलंगे, निखील राऊत यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रकाश खुडसंगे यांच्या नेतृत्वात खालील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला तानबाजी चिंचोलकर (यवतमाळ जिल्हा सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस – करंजी सो.) प्रभाग क्र. ९ मधील ज्येष्ठ नागरिक व कार्यकर्ते नामदेवराव गवारकर, शिवदासजी राऊत, शंकर शिवणकर, प्रमोद भटे, सुनील मरसकोल्हे, निलेश जुनघरे, किशोर रोहनकर, महादेव लांबाडे, गणेश चौधरी, सतीश गवारकर, संजय शिंदे, गौरव केवटे, गजानन तिवसे, घनश्याम शिंदे, अभिजित शिवणकर, धनराज चामलाटे, सौरभ पातकमवार, सुमित ठाकरे, आशिष तिवसे, आकाश भोकरे. या पक्षप्रवेशामुळे राळेगाव शहरातील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल झाल्याचे चित्र स्पष्ट दिसून येत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश भाजपसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून, पक्षसंघटन मजबूत होण्यास मोठी मदत होणार आहे. अनेक नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करत विकासाच्या दिशेने सकारात्मक पाऊल अशी प्रतिक्रिया दिली. या पक्षप्रवेशानंतर भाजपच्या स्थानिक नेतृत्वात नवचैतन्य निर्माण झाले असून, राळेगाव शहरात भाजपचा जनाधार आणखी वाढेल, असा विश्वास उपस्थित नेत्यांनी व्यक्त केला.

# अवघ्या २३ व्या वर्षी बनली नगरसेविका, उमरखेड नगरपालिकेत सर्वात कमी वयाची म्हणूण नोंद



जनमाध्यम प्रतिनिधी

वडार समाजाला मिळाला न्याय

उमरखेड - झालेल्या नगरपालिका निवडणुकीत निवडून आलेल्या 26 नगरसेवकापैकी सर्वात तरुण चेहरा म्हणून 23 वर्षीय खुशबू पवन मेंढे हीने तरुण पिढीतील नगरसेविका म्हणून उमरखेड शहरवासीयांचे लक्ष वेधले असून वडार समाजाची पहिली उच्चशिक्षित नगरसेविका होण्याचा मान मिळविला आहे .

उमरखेड शहरात जवळपास दोन हजाराच्या वर वडार समाज बांधव हे मतदार असून प्रभाग क्रमांक आठ अ मधून काँग्रेस उबाठाच्या वडार समाजातीलच सुमनबाई बाभुळकर यांचा भाजपाच्या खुशबू पवन मेंढे या 23 वर्षीय महिलेने पराभव करून नगर पालिकेत सर्वात कमी वयाच्या नगरसेविका होण्याचा मान मिळविला. नगरसेविका खुशबू यांचे पती पवन मेंढे हे उमरखेड भाजपा युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष असून त्यांची पक्षातील तरुण कार्यकर्त्यावर पकड असल्याने सर्व शहरातील युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी खुशबू मेंढे यांच्यासाठी प्रचाररूपी कार्य केले. त्यांच्या विजयात मोलाचा वाटा कार्यकर्त्यांचा राहिला असून प्रचार यंत्रणेत त्यांनी सुरुवाती पासून पॅनल टु पॅनल वर भर दिल्याने या प्रभाग ८मधून दोन्ही उमेदवार भाजपाचे निवडून आले तर या प्रभागातून नगरअध्यक्ष पदाच्या उमेदवाराला 321 मतांची आघाडी मेंढे यांनी मिळवून दिली.खुशबू मेंढे यांनी यावेळी हा विजय भाजपाच्या सच्च्या कार्यकर्त्यांचा असून खऱ्या अर्थाने उमरखेड शहरातील माझ्या वडार समाजाला न्याय मिळाला असून विजयाचे श्रेय भाजपा नेते नितिन भुतडा, आमदार किसनराव वानखेडे सर्व माजी आमदार , शहर अध्यक्ष अतुल खंदारे व सर्व कार्यकर्त्यांचा असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करून शहराच्या विविध समस्येवर काम करून जनतेची सेवा करणार असल्याचे सांगीतले.

निवडून आलेल्या सर्व २६ नगरसेवकापैकी सर्वात लहान वयाच्या खुशबु पवन मेंढे ह्या असून त्या उच्चशिक्षित आहेत .बि. कॉम .पदवी झालेल्या खुशबू ह्यांच्याकडून एक तिव्र विरोधकाची भुमीका न.पा. सभागृहात मांडण्यात येईल यात शंकाच नाही.

# अवैध हातभट्टीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

## २.७९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त ७ आरोपी अटकेत



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - राज्य उत्पादन शुल्क विभागाने यवतमाळ जिल्ह्यात अवैध हातभट्टी दारू निर्मितीविरोधात कारवाई करत एकूण ८ गुन्हे दाखल केले असून ७ आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत २ लाख ७९ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई आज दिनांक २७ डिसेंबर २५ रोजी डॉ. पराग नवलकर, विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, अमरावती विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली व नितेश शेंडे, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, यवतमाळ यांच्या नेतृत्वात करण्यात आली. मौजे खरोला, मुरझडी व राणी अमरावती (जि. यवतमाळ) या गावांमध्ये महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ही कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान १४० लिटर हातभट्टी दारू, २९९० किलो मोहाफुल सडवा व दोन दुचाकी वाहने जप्त करण्यात आली. जप्त केलेला मोहाफुल सडवा, हातभट्टी दारू व लोखंडी ड्रम जागीच नष्ट करण्यात आले असून अवैध दारूभट्ट्या उध्वस्त करण्यात आल्या.या प्रकरणी श्याम शंकर ठाकरे (वय १९), सुमित शंकर ठाकरे (वय २२), विकास देविदास शेडमाके (वय २५), शंकर गणेश गाडेकर (वय ५६), मंगल शंकर गाडेकर (वय ३२), सागर पद्माकर जाधव (वय ३७) व मीना सुरेश दातार (वय ४९) या आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या कारवाईत राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. अवैध हातभट्टी दारूविषयी माहिती असल्यास नागरिकांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागाने केले आहे.

### अंधश्रद्धा, संविधान जाणीव आणि भटक्या–विमुक्त समाजाचे प्रश्न केंद्रस्थानी : ॲड.पल्लवी रेणके

# स्मृती पर्व येथे भटक्या विमुक्त जनजातींचे विचारमंथन



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - विमुक्त भटक्या जमातींना जाणीवपूर्वक अंधश्रद्धेच्या दिशेने ढकलले जात असून ही बाब अत्यंत धोकादायक आहे. श्रद्धा असावी, मात्र अंधश्रद्धा नसावी, असे ठाम मत अध्यक्षीय भाषणात राजूदास जाधव यांनी व्यक्त केले. फुले–शाहू–आंबेडकरी विचारच बंजारा व विमुक्त भटक्या समाजाच्या मुक्तीचा मार्ग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संत सेवालाल महाराज यांनीही समाजाने सतत जागृत राहण्याचा संदेश दिला असल्याचे त्यांनी स्मरण करून दिले.

विमुक्त भटक्या जनजातींच्या स्मृती पर्वानिमित्त आयोजित कार्यक्रमात दोन सत्रांमध्ये सामाजिक, राजकीय व संविधानिक प्रश्नांवर परखड मंथन झाले. दुसऱ्या सत्रात प्रमुख वक्त्या अॅड. पल्लवी रेणके, प्रसिद्ध संविधान तज्ञ व माजी सदस्य, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोग यांनी "भारतीय संविधानाला अभिप्रेत असलेली लोकशाही आपण किती जगतो?" या विषयावर प्रभावी भाष्य केले. लोकशाही व संविधानिक प्रश्नांवर चर्चा होत असताना समाजाची उदासीनता ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृती दहना मागील ऐतिहासिक अर्थ समजून घेतल्याशिवाय "आम्ही भारताचे लोक" या संकल्पनेचा आशय कळणार नाही, असे त्या म्हणाल्या. भटक्या-विमुक्त समाजाच्या महिलांनी परिवर्तनाची जबाबदारी स्वीकारल्या शिवाय समाजपरिवर्तन शक्य नाही, असे ठाम मत त्यांनी मांडले. संविधान निर्मिती ही विषमतावादी व्यवस्थे विरोधातील संघर्षातून झाली असून बाबासाहेब आंबेडकर धर्मविरोधी नव्हते, तर अन्यायकारक धार्मिक व्यवस्थेचे चिकित्सक होते, हे त्यांनी स्पष्ट केले. बंजारा समाजाला "टायगर हंटर" ठरवणारे २०२५ मधील शासकीय पत्र अत्यंत संतापजनक असून लोकप्रतिनिधी या अन्यायाविरोधात गप्प का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.भटक्या-विमुक्त समाजाची लोकसंख्या १५ ते २० कोटींच्या घरात असून ९८ टक्के जनता भूमिहीन, ९४ टक्क्यांकडे बीपीएल कार्ड नाही, ५७ टक्के लोक उघड्यावर राहतात, तर ३० टक्क्यांकडे दफन भूमीही नाही, ही विदारक वास्तवस्थिती त्यांनी मांडली. परंपरागत व्यवसाय हिरावून घेऊनही पर्यायी साधने न दिल्यामुळे अनेक समाज आजही भिक्षेकरी व गुन्हेगार ठरवले जात आहेत. भिक्षेकरी कायदा व अँटी-बेगारी कायद्याचा वापर करून लोकशाही मूल्यांची पायमल्ली होत असल्याची तीव्र टीकाही त्यांनी केली. जात प्रमाणपत्रासाठी भटक्या समाजाला आजही भ्रष्टाचार व अपमान सहन करावा लागतो, ही लोकशाहीची शोकांतिका असल्याचे सांगत, प्रशासन असंवेदनशील असल्याचा आरोप त्यांनी केला. २ सप्टेंबरच्या तथाकथित "हैदराबाद जीआर"वर भाष्य करताना, कोणताही शासन निर्णय कायद्यापेक्षा मोठा नसतो आणि २०१२ च्या जात प्रमाणपत्र कायद्यालाच अंतिम महत्त्व आहे, असे स्पष्ट केले.

# पुसद येथे २००८ मध्ये झालेल्या दंगल प्रकरणात सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - येथे सन २००८ साली झालेल्या दंगलीप्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्याचा अखेर न्यायनिवाडा झाला असून, या प्रकरणात सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. या प्रकरणाचा सखोल तपास पोलीस स्टेशन पुसद शहर यांनी करून पुसद येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.

सदर प्रकरणात सरकारी पक्षातर्फे एकूण १० साक्षीदार तपासण्यात आले होते. हा खटला अत्यंत वादग्रस्त (Highly Contested) स्वरूपाचा होता. सेशन्स केस क्रमांक 72/2009 (शासन विरुद्ध अझरोद्दीन व इतर 10) या प्रकरणाचा निकाल देताना मा. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश क्र. १, श्रीमती एस. जे. रामगडिया मॅडम, पुसद यांनी भा.दं.वि. कलम 147, 148, 149, 324, 427, 395 अंतर्गत दाखल सर्व आरोपांमधून आरोपींची निर्दोष मुक्तता केली. आरोपींच्या वतीने प्रभावी व सखोल युक्तिवाद करत निर्दोष मुक्तता मिळवून दिल्याबद्दल अॅड. तनवीर खान यांचे सर्वत्र मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच या प्रकरणात सहकार्य करणारे अॅड. इमरान चव्हाण, अॅड. मिस्बाह आणि अॅड. अमोल भालेराव यांचेही हार्दिक अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे. या निकालामुळे संबंधित आरोपींना मोठा दिलासा मिळाला असून, न्यायालयाच्या या निर्णयाची कायदेशीर व सामाजिक स्तरावर चर्चा होत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

### डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात नवीन एमआरआय (३ टेसला )मशीनचे उद्घाटन

# दिव्यांगांना स्वावलंबी जीवन जगण्याची संधी देणारा उपक्रम-ना.प्रतापराव जाधव





### जयपूर फूट वितरण कार्यक्रमाचे केंद्रीयमंत्र्यांनी केले कौतुक
### ११०० नोंदणी, ७५२ दिव्यांगांना अवयवाचे वाटप

**अमरावती/का.प्र.**

डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्मृती वैद्यकीय महाविद्यालयात आणि रुग्णालय येथे अत्याधुनिक एम आर आय मशीनचे उद्घाटन हा या संस्थेचा सामाजिक जाणवेचा आणि बांधिलकीचा सर्वोत्तम नमुना आहे. दिव्यांग बांधवांना कृत्रिम अवयव देणे म्हणजे केवळ शारीरिक सहाय्य देणे नाही तर त्यांना पुन्हा एकदा स्वावलंबी जीवन जगण्याची संधी देणे हे आहे. त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देणारे आणि त्यांच्या कुटुंबासाठी आशेचा एक नवीन किरण देणारा हा उपक्रम असल्याचे प्रतिपादन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आज एमआरआय मशीन (३ टेसला) च्या उद्घाटन समारंभाचे आयोजन तसेच जयपूर फूट वितरण उपक्रमाच्या प्रसंगी उद्घाटक म्हणून ना. प्रतापराव जाधव बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले होते. कार्यक्रमाला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर, उपाध्यक्ष ॲड.भैयासाहेब पुसदेकर,केशव मेतकर, सदस्य हेमंत काळमेघ, सुभाष बनसोड,प्राचार्य केशव गावंडे, सुरेश खोटरे, प्राचार्य पुरुषोत्तम वायाळ यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना प्रतापराव जाधव म्हणाले की, एमआरआय सारख्या अत्याधुनिक वैद्यकीय सुविधेमुळे विदर्भातील सामान्य गरीब आणि ग्रामीण रुग्णांना दर्जेदार तपासण्यासाठी आता दूर जाण्याची आवश्यकता भासणार नाही.वेळेवर निदान आणि योग्य उपचार आणि परवडणारे आरोग्य सेवा हे खऱ्या अर्थाने आरोग्य सेवेचे ध्येय आहे. या दिशेने डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेजने उचललेले हे पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे. या संस्थेने विविध सामाजिक उपक्रमांमधून भाऊसाहेबांच्या विचारांना सातत्याने कृतीत उतरवण्याचे काम केले आहे. अशा संस्था संस्थात्मक आणि सामाजिक उपक्रमामुळे केंद्र व राज्य सरकारची धोरणे तळागाळापर्यंत पोहोचत असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

अध्यक्षीय भाषणातून दिलीप बाबू इंगोले यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था सर्व प्रकारचे सहकार्य करायला तयार आहे आपण संधी द्यावी अशी विनंती नामदार प्रतापराव जाधव यांच्याकडे केली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ.ए.टी देशमुख यांनी केले संचालन किशोर इंगळे यांनी केले.'उमेद-पंख-विश्वासाचे' या सामाजिक उद्देशाने दिव्यांग बांधवांसाठी निशुल्क जयपुर फुट वितरणाचा कार्यक्रम डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती, इंडियन रेड क्रॉस सोसायटी अकोला, जयपूर फुट उपक्रमाचे प्रणेते आर्किटेक्ट रामेश्वर मणियार (पुणे) आणि अंबादास खोब्रागडे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने होत आहे. आतापर्यंत या उपक्रमासाठी अकराशे दिव्यांगांनी नोंदणी केली असून ७५२ दिव्यांगांना कृत्रिम अवयवाचे वाटप करण्यात आले आहे.कार्यक्रमाला राजेश अग्रवाल पुणे,इंडियन रेड क्रॉस सोसायटी अकोलाचे डॉ. किशोर मालोकार, जयपुर फुट उपक्रमाचे प्रणेते आर्किटेक्ट रामेश्वर मनियार, दि अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशनच्या अध्यक्ष आर्टिस्ट रजनी अंबादे, आकाश अंबादे, दानदाते दिपक चांडक, अनिता चांडक,प्रभजीत सिंह बच्छेर, मानद सचिव, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, अकोला,कृषी उत्पन्न बाजार समिती अकोलाचे संचालक चंदू खेडकर, उमेद-पंख-विश्वासाचे जयपूर फुट वितरण समन्वयक सदीप पुंडकर, माजी जिल्हा विस्तार माध्यम अधिकारी प्रकाश गवळी, डॉ. विनीत कौर यांची उपस्थिती होती.

## एसटीमधील प्रवाशांना नाहक त्रास

### ग्राहक पंचायतचे तिवसा बसस्थानक प्रमुखांना निवेदन

**तिवसा/वार्ताहर**



दिवसेंदिवस तिवसा बस थांब्याला घेऊन ग्राहकांच्या तक्रारी समोर येत असल्याने आपण याबाबत दखल घेऊन तसे एसटी महामंडळ प्रमुखांना निवेदन आराष्ट्रीय ग्राहक दिनाचे औचित्य साधून तिवसा येथील एसटी डेपो व्यवस्थापक यांना देण्यात आले.

अमरावती ते नागपूर येथे जाणाऱ्या काही एसटी चे चालक ,वाहक तिवसा येथे थांबा नाही म्हणून प्रवाशांना एस.टीत बसल्यानंतर खाली उतरून देतात याबद्दलची तक्रार केली असता त्यांनी सांगितले की, त्या एस.टी चा नंबर, आगार व वेळ लिहून घ्यायचा आणि त्यानंतर तशी तक्रार केल्यास आम्ही निश्चितच त्याच्यावर कारवाई करू असे आश्वासन यावेळी बसस्थानक प्रमुख प्रतिक मोहोड यांनी दिले. अमरावती ते नागपूर जाणाऱ्या एसटी बसेस मधील प्रवाशी जनतेसोबत होणारा त्रास खपवून घेतल्या जाणार नाही. याप्रसंगी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष गुणवंत देवतारे,उपाध्यक्ष भीमरावजी बारी, पर्यावरण प्रमुख रामभाऊ टेकाडे, रावसाहेब बाखडे ,अनिल मापले,सुमित अनासने ,मधुकर पिंगळे, गजानन कावरे उपस्थित होते.

## चार गावातील शेतकऱ्यांना मिळणार दहेगाव धरणाचे पाणी

### प्रशांत कांबळे यांनी दिला होता जलसमाधी आंदोलनाचा इशारा

**तिवसा/वार्ताहर**

शेतकऱ्यांना रब्बी हंगामाच्या पीक पेरणीसाठी नोव्हेंबर मध्येच धरणाचे पाणी मिळणे अनिवार्य होते. मात्र, मृद्जलसंधारण विभागाने तब्बल एक महिना फक्त धरणाच्या कॅनल दुरुस्तीतच घातल्याने अखेर शेतकऱ्यांची पेरणी लांबणीवर पडली होती. परिणामी यासंदर्भात शिरजगाव मोझरी, धोत्रा, अनकवाडी, मालधूर येथील शेतकऱ्यांच्याना तातडीने कॅनल बंधाऱ्याची दुरुस्तीचे कामे पूर्ण करून पाणी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी सोडण्याच्या मागणीसाठी दहेगाव धरणात जलसमाधी आंदोलनाचा इशारा दिला होता. दरम्यान मृद्जलसंधारण विभागाने शुक्रवारी ११ वाजताच प्रशांत



कांबळे आणि धोत्रा ग्रामपंचायत सरपंच भूषण गाठे यांच्या उपस्थितीत पाणी सोडण्यात आले.

गेल्या एक महिन्यांपासून दहेगाव धरणाच्या पाण्यासाठी शिरजगाव, धोत्रा, अनकवाडी आणि मालधुरच्या चार गावातील शेतकऱ्यांची प्रतिक्षा होती. त्यानंतर यासंदर्भात शिरजगाव येथील शेतकऱ्यांनी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांच्याकडे आपली समस्या मांडली. त्यावरून सलग तीन दिवस मृद्जलसंधारन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क आणि तक्रारी केल्यानंतर कार्यकारी अभियंता निकिता देशमुख यांनी दहेगाव धरणाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी सुद्धा केली होती. त्यानंतरही कॅनलच्या बंधाऱ्यांची कामे अपूर्ण असल्याने आणि संबंधित ठेकेदाराकडे मजूर कमी असल्याने पाणी सोडण्यास उशीर होण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. मात्र, प्रशांत कांबळे यांनी संबंधित शेतकऱ्यांसोबत धरणात जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा दिल्यानंतर मृद्जलसंधारण विभागाने दुरुस्तीच्या कामाचा वेग वाढवला. शिवाय, कंत्राटदाराला सुद्धा प्रशासनाने तंबी दिली. परिणामी शुक्रवारी सकाळी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे, धोत्रा ग्रामपंचायत सरपंच भूषण गाठे, शिरजगाव ग्रामपंचायत सदस्य पुरुषोत्तम मेश्राम, हर्षल मेश्राम, जयंत तायवाडे, निमचंद कोचर, प्रमोद जाधव, अमोल बद्रे, जीवन गजभे, सदानंद भालेराव आदी शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### क्रांती ज्योती बिग्रेडचा जिल्हास्तरीय कला महोत्सव आज


**अमरावती-** येथील क्रांती ज्योती बिग्रेड सामाजिक संघटनेचा जिल्हास्तरीय कला महोत्सव आज रविवार दिनांक २८ डिसेंबर रोजी कांडली परतवाडा येथील साई मंदिरात संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. नंदेश अंबाडकर यांचे अध्यक्षतेखाली होत आहे. कला महोत्सवाचे उदघाट्न आमदार रवि राणा तर विशेष अतिथी म्हणून आमदार प्रवीण तायडे यांची विशेष उपस्थिती राहील.स्वागताध्यक्ष म्हणून अतुल वाठ तर कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून रिल स्टार हरेश व स्वाती विजेकर उपस्थित राहतील.महोत्सवात नृत्य, पोवाडा, सिनेगीत, भारूड, समूह गीत, आदी मनोरंजनाची धमाल कलाकार सादर करतील. सर्व पदाधिकारी आणि कलावंत यांनी आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन अंजनगाव सुर्जी, अचलपूर, परतवाडा शाखेच्या वतीने आयोजक मंडळी रामदास मसने, वसंत धोबे, प्रशांत शेकोकार, योगेश चिमोटे,अनिल वऱ्हेकर, माधुरी भुयार, प्रशांत व विशाल वऱ्हेकर, जिल्हाध्यक्ष ॲड. प्रभाकर वानखडे,सुभाष मालपे, किरण खवले, उमाताई अंबुलकर, निलिमा मुळे, योगिता सोनार, संगीता कविटकर आदींनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले.

### डॉ सतीश अग्रवाल यांना 'आरोग्य ज्ञानेश्वरी' पुरस्कार प्रदान



**अमरावती-** मुंबईत 'आरोग्य ज्ञानेश्वरी' पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या पुरस्कारासाठी अमरावतीचे वरिष्ठ बालरोगतज्ञ डॉ सतीश अग्रवाल, साताऱ्याच्या वरिष्ठ बालरोगतज्ञ डॉ चित्रा दाभोलकर व मुंबईचे मानसोपचारतज्ञ डॉ सुरेश पाटील यांची निवड करण्यात आली. हे पुरस्कार वितरण नालासोपारा येथील रिद्धी विनायक रुग्णालयात करण्यात आले. यावेळी वसई तालुका पत्रकार संघटना, वसई विरार शहर महानगरपालिका, आरोग्य विभाग नालासोपारा, नालासोपारा मेडिकल असोसिएशन, रिद्धी विनायक रुग्णालय नालासोपारा,पालघर जिल्हा बालरोगतज्ञ संघटना, विरार मेडिकल असोसिएशन,इंडियन मेडिकल असोसिएशन विरार यांच्या संयुक्त विद्यमाने एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात वरील तज्ञांसोबत मुंबईच्या डॉ अर्चना जोशी व डॉ हेमंत जोशी यांनी उपस्थितांचे मार्गदर्शन केले. या सत्राचे संचालन मुंबईचे डॉ राजेंद्र आगरकर यांनी केले. डॉ सतीश अग्रवाल यांनी 'जागतिक ध्यान दिना'च्या निमित्ताने सर्वांना ध्यानाचे महत्त्व सांगितले आणि त्याचे प्रात्यक्षिक दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ शैलेश बारोट, डॉ विनीत दंडवते, डॉ विवेक कामतीकर, डॉ व्यंकट गोयल आणि गौरीसह सर्वांनी श्रम केले. डॉ अग्रवालांच्या या यशस्वीतेकरिता आयएपी अमरावती शाखेचे अध्यक्ष डॉ शैलेश जयस्वाल, उपाध्यक्ष डॉ प्रतिभा काळे, सचिव डॉ नीलेश पाचकवडे, कोषाध्यक्ष डॉ ऋतुराज देशमुख, सहसचिव डॉ अमित रुद्राकार, प्रचार प्रमुख डॉ आदित्य टांक सहित सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.

### नांदगाव पेठ येथे आज रक्तदान शिबीर



**नांदगाव पेठ-** परमहंस श्री संत काशिनाथ महाराज यांच्या २० व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त रविवार, दि. २८ डिसेंबर रोजी नांदगाव पेठ येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.हे रक्तदान शिबीर सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत पार पडणार आहे.रक्तदान शिबिरात सर्व तरुण युवक मंडळी, सामाजिक संस्था, स्वयंसेवक व नियमित रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, अशी विनंती करण्यात आली आहे. रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांसाठी आवश्यक वैद्यकीय तपासणी, सुरक्षितता व आरोग्याची संपूर्ण काळजी आयोजकांकडून घेतली जाणार आहे.

### पी.आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे शेतीशाळा

**अमरावती-** येथील पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे पीक काढणी पश्चात तंत्रज्ञान या विषयावर मूर्तिजापूर तालुक्यातील मौजे बपोरी येथे शेती शाळा व प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. कृषी महाविद्यालयातील प्रा. डॉ. स्वप्नील ज्ञानेश्वर देशमुख यांनी तूर पिकातील खत व कीड व्यवस्थापन आणि पीक काढणी पश्चात तंत्रज्ञान याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर भेट देऊन तूर पिकातील अन्नद्रव्य व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या शंकांचे निरसन केले.कार्यक्रमाला सहायक कृषी अधिकारी डॉ.शिल्पा दीपक देशमुख, कृषीसखी अर्चना भगेवार व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रामपंचायत निवडणुका दिवाळीपर्यंत लांबण्याचे संकेत

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

> निवडणुका लांबणीवर गेल्यास विद्यमान सरपंचांना प्रशासक म्हणून प्राधान्य द्यावे, अशी मागणी पुढे आली आहे. राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल उके व महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद सांगोले यांनी याबाबत शासनाकडे ठोस मागणी करण्याचे स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, यामुळे गावातील विकासकामे थांबणार नाहीत आणि दैनंदिन प्रशासन सुरळीत राहील.
>
> **- प्रमोद पांडुरंग सांगोले**
> प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रीय प्रधान मुखिया संघ, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्यासह अमरावती जिल्ह्यातील ५५७ ग्रामपंचायतींचा पाच वर्षांचा कार्यकाळ येत्या १५ फेब्रुवारी रोजी संपुष्टात येत आहे. मात्र ग्रामपंचायत निवडणुकांबाबत राज्य ग्रामविकास विभाग अथवा राज्य निवडणूक आयोगाकडून अद्याप कोणताही ठोस निवडणूक कार्यक्रम जाहीर न झाल्याने जिल्हाभरात राजकीय व प्रशासकीय वर्तुळात अस्वस्थता निर्माण झाली आहे. निवडणुका वेळेत न झाल्यास १५ फेब्रुवारीनंतर ग्रामपंचायतींवर प्रशासक राजवट लागू होण्याची दाट शक्यता व्यक्त होत आहे.

सध्या राज्यात महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व नगर परिषदांच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू असून, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या सर्व निवडणुका ३१ जानेवारीअखेर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगावर मोठा ताण असून, ग्रामपंचायत निवडणुका किमान सहा ते आठ महिने लांबण्याची शक्यता वर्तविली जात आहे. परीक्षा कालावधी व पावसाळा लक्षात घेता निवडणुका दसरा–दिवाळीच्या काळातच घेण्यात येण्याची शक्यता आहे. प्रभाग रचना, आरक्षण निश्चिती व मतदार याद्यांची प्रक्रिया अद्याप अपूर्ण असल्याने निवडणुकांना विलंब होत आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ नुसार निवडणुका न झाल्यास प्रशासक नेमण्याची तरतूद आहे. त्यामुळे १५ फेब्रुवारीनंतर जिल्ह्यातील बहुतांश ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्ती अटळ मानली जात आहे.एकूणच, अमरावती जिल्ह्यातील ५५७ ग्रामपंचायतींच्या भवितव्याकडे सर्वांचे लक्ष लागले असून, निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होतो की प्रशासक राजवट लागू होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे राजकीय लक्ष केंद्रीत झाले आहे.

## तालुकास्तरीय कला,क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव

### आ.प्रवीण तायडे यांची उपस्थिती

**अचलपूर/वार्ताहर**



अचलपूर पंचायत समिती शिक्षण विभागाकडून गेल्या २२ व २३ डिसेंबर असे दोन दिवस परतवाडा शहरातील नेहरू मैदान येथे तालुकास्तरीय क्रीडा,कला,सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी उद्घाटन समारंभाकरीता आमदार प्रवीण तायडे यांची प्रमुख उपस्थिती होती तर उद्घाटक म्हणून मेळघाट मतदार संघाचे आमदार केवलराम काळे सुद्धा उपस्थित होते .त्यानंतर दुसऱ्या दिवशी समारोप तथा बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला .

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अचलपूर पंचायत समिती गटविकास अधिकारी सुधीर अरबट,अचलपूर नगर परिषद प्रशासक धीरजकुमार गोहाड आदी मान्यवर उपस्थित होते.गेल्या २२ डिसेंबर रोजी शालेय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते .यामध्ये नोंदणी,उद्घाटन ,सांघिक खेळ व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते .यामध्ये वैयक्तिक खेळामध्ये धावणे उंच उडी,लांब उडी,गोळा फेक कुस्ती, बॅडमिंटन, टेनिक्विड वैयक्तिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याच पद्धतीने सांघिक खेळामध्ये खो-खो, कबड्डी, लंगडी हॉलीबॉल आयोजन होते. त्याच पद्धतीने विविध निदर्शने व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दुसऱ्या दिवशी सांघिक खेळ,समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला. या दोन दिवसीय महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यावेळी पंचायत समिती शिक्षण विभागाचे अधिकारी - कर्मचारी यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतले.

## पवित्र पोर्टल सुरू;रिक्त जागांचा तिढा

### शिक्षण विभागाकडून अद्याप स्पष्टता नाही, पात्र उमदेवारांमध्ये संभ्रम वाढल्याचे दिसून येत आहे

**अमरावती/का.प्र.**

शिक्षक भरती प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा असलेल्या पवित्र पोर्टलवर शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (टेट) दिलेल्या उमेदवारांसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र, दुसऱ्या बाजूला शिक्षक भरतीसाठी प्रत्यक्षात किती जागा उपलब्ध आहेत. याबाबत शिक्षण विभागाकडूनच स्पष्टता नसल्याने पात्र उमेदवारांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगून हजारो उमेदवारांनी डी.एड., बी.एड.चे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर, टीईटी, सी-टीईटी व पुढे टेट परीक्षा देत,पवित्र पोर्टलद्वारे भरतीची प्रतीक्षा केली जात आहे. २०२२ मधील टेट परीक्षेनंतर सर्वात मोठी शिक्षक भरती झाली. त्यानंतर, मे २०२५ मध्ये तिसरी टेट परीक्षा पार पडली. त्यानंतर, आता नोंदणी, स्वप्रमाणपत्र आणि गुणवत्तेनुसार नियुक्ती प्रक्रिया राबविली जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, याच वेळी नव्या संचमान्यतेनुसार राज्यभरात सुमारे २० हजारांहून अधिक शिक्षक अतिरिक्त ठरत असल्याची स्थिती आहे.

> शिक्षक भरतीची प्रक्रिया सुरू झाली, ही बाब समाधानाची असली एकूण जागांची संख्या अगोदर जाहीर न होणे ही बाब चुकीची आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि खासगी अनुदानित शाळांमधील जागा स्वतंत्रपणे स्पष्ट कराव्यात, अन्यथा बेरोजगार उमेदवारांच्या अपेक्षा व अतिरिक्त शिक्षकांची चिंता या दोन्ही आघाड्यांवर असंतोष वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.
>
> **राजेश सावरकर,**
> राज्य प्राथमिक शिक्षण समिती

### नवीन वर्षात खगोलीय घटनांची रेलचेल

**अमरावती-** २०२६ या नवीन वर्षात अनेक खगोलीय घटनांची रेलचेल आहे. ३ जानेवारीला पृथ्वी-सूर्य हे अंतर सरासरी कमी राहील. याला 'पेरेहेलिऑन' असे म्हणतात. या दिवशी सुपरमूनसुद्धा दिसणार आहे. चंद्र प्रकाशमान व मोठा दिसेल.

नवीन वर्षात २१ जून रोजी सर्वात मोठा दिवस राहील. ३० व ३१ जुलै रोजी उल्का वर्षाव पाहता येईल. १२ ऑगस्ट रोजी खंग्रास सूर्यग्रहण आहे. हे भारतातून दिसणार नाही. २३ सप्टेंबर रोजी दिवस व रात्र सारखी राहील. २६ सप्टेंबर रोजी नेपच्यून पृथ्वीजवळ हायरेंज टेलिस्कोपमधून पाहता येईल. ४ ऑक्टोबर रोजी शनी ग्रह पृथ्वीनजीक असल्याने. टेलिस्कोपमधून रिंग पाहता येईल. १६ व १७ नोव्हेंबर रोजी उल्का वर्षाव होईल. २२ डिसेंबर हा सर्वात लहान दिवस १० तास ४७ मिनिटांचा राहील.

१० जानेवारी रोजी गुरू ग्रह पृथ्वीजवळ राहील. १६ फेब्रुवारी रोजी शनी व नेपच्यून या ग्रहाची युती राहील. म्हणजेच हे ग्रह जवळ-जवळ दिसतील. १७ फेब्रुवारी रोजी कंकणाकृती सूर्यग्रहण भारतातून दिसणार नाही. ३ मार्च रोजी खंग्रास चंद्रग्रहण राहील. २० मार्च रोजी दिवस व रात्र सारखी राहील. २२ व २३ एप्रिल रोजी उल्का वर्षाव पाहता येणार आहे, असे मराठी विज्ञान परिषद विभाग अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी कळविले.

## एकल महिलांना सरकारचा मदतीचा हात

### ३१ डिसेंबर पर्यत सर्वेक्षण

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत जिल्ह्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण करण्याचे काम हाती घेतले आहे. शासनाच्या योजना अधिकाअधिक महिलांपर्यंत पोहोचविणे हा त्यामागील उद्देश आहे. येत्या ३१ डिसेंबरपर्यंत सर्वेक्षण पूर्ण करण्याच्या सूचना आहेत. या महिलांची नोंद करून त्यांना विविध योजना, सुविधांचा लाभ मिळवून देण्याचे शासनाचे नियोजन आहे. मिशन वात्सल्यअंतर्गत विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता व अविवाहित महिलांचे सर्वेक्षण १४ तालुक्यांतील २ हजार ५९२ अंगणवाडी सेविकांमार्फत ग्रामीण भागात केले जात आहे. या सर्वेक्षणाचा उद्देश त्यांना सरकारी योजनांचा लाभ देणे, आर्थिक सक्षमीकरण करणे आणि सामाजिक सन्मान मिळवून देणे हा आहे. हे काम अंगणवाडी सेविका व आशा सेविकांमार्फत ग्रामपंचायत स्तरावर केले जात आहे. संबंधित महिलेच्या वयानुसार त्यांच्या गरजा निश्चित केल्या जात आहेत. करोनात एकल झालेल्या महिलांना पेन्शन, घरकूल आणि रोजगाराच्या योजनांचा लाभ मिळवून देणे हा देखील उद्देश आहे. विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता व अविवाहित महिलांचा समावेश एकल महिलांमध्ये होतो. करोनाच्या काळांमध्ये ही संख्या वाढली आहे. वात्सल्य समितीत सर्व तालुक्यात शासकीय कार्यालयामुळे महिलांचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल.

**शिधापत्रिका आणि घरकुलासाठी मदत**

महिलांची शिधापत्रिका, घरकूलाचा प्रश्न, निराधार पेन्शन, मुलांसदर्भातील दाखले, वारस नोंदी अशा कामांसाठी मदत केली जाईल. या पार्श्वभूमीवर शासनाच्या आदेशानुसार महिला व बालकल्याण विभागाकडून ग्रामीण भागात सर्वेक्षणाचे काम सुरू आहे.

**जिल्ह्यात हजारो महिला**

जिल्ह्यात सध्या याबाबत सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. त्यामुळे जिल्ह्यात एकल महिला हजारोंच्या घरात आहेत. त्यामध्ये विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, अविवाहित आदींचा समावेश आहे.कोणत्या तालुक्यात सर्वाधिक किंवा सर्वात कमी एकल महिला आहेत. याची माहिती तालुकानिहाय घेणे सुरू आहे.

# उबाठा आ. गजानन लवटे भाजपच्या संपर्कात

## नगरपरिषद निवडणुकीनंतर राजकीय वर्तुळात खळबळ

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

नगरपरिषद निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर स्थानिक राजकारणात मोठी हालचाल सुरू झाली असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान नगरपरिषद निवडणूक निकालानंतर उबाठा गटाचे आमदार गजानन लवटे हे भाजपच्या संपर्कात असल्याचे चित्र मोठ्या प्रमाणात वृत्तवाहिन्यांवर झळकत आहेत. यामुळे स्थानिक राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगलेली पाहायला मिळत आहे. या संदर्भात झालेल्या गौप्य स्फोटामुळे अनेक तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, निवडणूक निकालानंतर काही महत्त्वाच्या नेत्यांच्या भेटीगाठी वाढल्या असून यामध्ये भाजपचे खासदार अनिल बोंडे यांचे निवासस्थानी आमदार गजानन लवटे यांचा सत्कार घेत असल्याचे दिसत आहे. यामुळे नगरपरिषद निवडणुकीतील निकाल, सत्तासमीकरणे आणि



आगामी राजकीय डावपेच अशा हालचालींना वेग आला असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

दरम्यान, आमदार गजानन लवटे किंवा संबंधित पक्षाकडून याबाबत अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही. मात्र, या चर्चेमुळे स्थानिक राजकारणात खळबळ उडाली असून येत्या काळात राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# नगरपालिका निवडणुकीत १४७ महिला सदस्यांनी मिळवला विजय

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील १० नगरपरिषदा आणि २ नगरपरिषदांच्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. १० नगरपरिषदांपैकी ७ आणि २ नगरपरिषदांपैकी १ मध्ये महिलांनी महापौरपदाची निवड केली, तर १२ नगरपरिषदांमध्ये २७८ सदस्यपदांपैकी १४७ पदांसाठी महिला नगरसेवक म्हणून निवडून आल्या. परिणामी, यावेळी जिल्ह्यातील नगरपरिषदांमध्ये 'लाडली भगिनींचा' पुरुष नगरसेवकांपेक्षा जास्त प्रभाव आहे. १२ नगरपरिषदांपैकी फक्त ४ सदस्यपदांनी पुरुष महापौरपदाची निवड केली, तर २७८ सदस्यपदांपैकी १७१ सदस्यपदे पुरुष नगरसेवकांकडे होती. यामुळे, नगरपरिषदा आणि नगरपरिषदांच्या बैठकांचे व्यवस्थापन करण्यात तसेच प्रशासकीय कामकाजात महिला प्रतिनिधींची भूमिका विशेष महत्त्वाची ठरेल.

२०११ मध्ये राज्याने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण लागू केले होते. परिणामी, सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व लक्षणीयरीत्या वाढत आहे. महिलांसाठी राखीव जागांवर निवडणूक लढवण्यासोबतच, महिला पुरुष आणि महिला दोघांसाठीही खुल्या जागांवर



पुरुषांच्या दाव्यांना आव्हान देतात. यापैकी अनेक जागांवर महिला उमेदवार विजयी होतात. परिणामी, यावेळी १२ पैकी आठ नगरपालिका संस्थांमध्ये महिला महापौर निवडून आल्या. २७८ सदस्य पदांपैकी १४७ जागांवर महिलांनी विजय मिळवला आणि १३१ जागा पुरुषांनी जिंकल्या. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महिलांचा प्रभाव जास्त होता.

### ८ नगरपालिकांमध्ये महिला महापौर

जिल्ह्यातील १२ नगर पालिकांच्या मतमोजणीनंतर, अचलपूर, दर्यापूर, चांदूरबाजार, मोर्शी, शेंदूरजनाघाट, धामणगाव रेल्वे आणि चांदूर रेल्वे नगरपरिषदा आणि नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीच्या महापौरपदांवर महिला निवडून आल्या आहेत. परिणामी, या आठ नगरपालिकांचे कामकाज आता महिला महापौरांकडून चालवले जाईल. दरम्यान, अंजनगाव सुर्जी, चिखलदरा आणि वरुड नगरपरिषदा आणि धारणी नगरपंचायतीचे प्रशासन पुरुष महापौरांच्या नियंत्रणाखाली राहील. शिवाय, सर्व १२ नगरपालिकांमध्ये १४७ महिला सदस्य जनतेचे प्रतिनिधित्व करतील.

| | मंडळ सदस्यांची संख्या | महिला | पुरुष |
|---|---|---|---|
| अचलपूर | ४१ | २२ | १९ |
| अंजनगाव | २८ | १४ | १४ |
| चांदूर बाजार | २० | ११ | ०९ |
| चांदूर रेल्वे | २० | १० | १० |
| चिखलदरा | १० | १२ | ०८ |
| दर्यापूर | २५ | १४ | ११ |
| धामणगाव | २० | १० | १० |
| धारक | १७ | १० | ०७ |
| मोर्शी | २४ | १२ | १२ |
| नांदगाव खांडे. | १७ | ०९ | ०८ |
| शेंदुरजना घाट | २० | १० | १० |
| वरुड | २६ | १३ | १३ |

# आक्षेप असूनही, दुसऱ्या प्रभागात मतदान

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिकेच्या मतदार यादीबाबत असंख्य तक्रारी आहेत. निवडणूक आयोगाच्या अंतिम मुदती पूर्ण करण्याच्या घाईत, पालिकेने हजारो मतदारांची नावे एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात स्थलांतरित केली आहेत. गडगडेश्वर येथील प्रभाग १७ चे सारंग रविकांत काकडे यांनी महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची भेट घेतली आणि त्यांची तक्रार नोंदवली. त्यांनी महानगरपालिका आयुक्तांना कळवले की प्रभागाची मतदार यादी प्रसिद्ध झाली तेव्हा त्यांनी आपला आक्षेप नोंदवला होता. त्यांनी त्यांच्या तक्रारीची प्रत महानगरपालिका आयुक्तांनाही दिली. त्यानंतर महानगरपालिका आयुक्तांनी या संदर्भात उपायुक्तांना सूचना दिल्या आहेत.

काकडे २८ वर्षांपासून प्रभाग १७ चे रहिवासी आहेत. २५ नोव्हेंबर रोजी त्यांना प्रारूप मतदार यादीत त्यांच्या



कुटुंबातील चारही नावे ९०/८५१ क्रमांकाच्या प्रभाग १३ मध्ये नोंद असल्याचे लक्षात आले. त्यांनी तात्काळ लेखी तक्रार/आक्षेप नोंदवला. तथापि, १५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध झालेल्या नवीन अंतिम मतदार यादीतही, काकडे यांचे नाव गडगेश्वर विभाग १७ च्या यादीत समाविष्ट नाही. त्यांचे नाव साईनगर अकोली येथील प्रभाग १९ मध्ये ३६८ क्रमांकावर आहे. परिणामी, काकडे यांनी महानगरपालिका आयुक्तांची भेट घेतली आणि गडगेश्वर विभाग १७ च्या यादीत त्यांचे नाव समाविष्ट करण्याची विनंती केली.

निवडणुकीत प्रत्येक मत महत्त्वाचे असते. त्याचप्रमाणे, जागरूक मतदार त्यांच्या मतदानाच्या अधिकाराबाबत जागरूक आणि संवेदनशील असतात. असंख्य मतदारांना त्यांच्या स्वतःच्या विभागातून इतर विभागात स्थलांतरित करण्यात आले आहे. अनेक मतदारांना त्यांच्या ठिकाणाची माहिती नाही, ज्यामुळे त्यांना मतदानाचा अधिकार हिरावून घेण्याची शक्यता आहे. काकडे यांनी लोकांना या समस्येबद्दल जागरूक राहण्याचे आणि पुढे येण्याचे आवाहन केले. त्यांनी दावा केला की किमान २० मतदारांना इतर विभागात स्थलांतरित करण्यात आले आहे. तर अलिकडे असे दिसून आले आहे. प्रत्येक मताचा परिणाम नगरपालिका आणि पंचायत निवडणुकांच्या निकालांवर झाला आहे.

# राकाँपा 'एकला चलो' चे धोरण

**अमरावती/का.प्र.**

आगामी महानगर पालिका निवडणुकीत अजीत पवार गटाची राकांपा सध्या सर्वात वेगळ्या परिस्थितीत आहे. राज्यातील महायुती गटात सामील भाजप, शिंदे शिवसेना आणि युवा स्वाभिमान पक्ष युतीसाठी तयारी करत असताना, खोडके दंपती यांच्या नेतृत्वाखालील राकांपा स्वतःला या युतीपासून दूर ठेवन 'एकला चलो' धोरणावर ठाम आहे.



मनपा स्तरावर खोडके दंपतींना भाजप, शिंदे शिवसेना, युवा स्वाभिमान पक्ष भाजप-शिंदे गटासह युतीच्या तसेच मविआ गटातील घटक दल, काँग्रेस आणि शरद पवार गटाच्या राकांपा उमेदवारांचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे या गटाच्या रणनितीवर सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्यातील २९ मनपा क्षेत्रांमध्ये निवडणूक प्रक्रिया सुरू असून, प्रत्येक पक्ष स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन युतीसाठी निर्णय घेत आहे. जसे अकोला मनपात अजीत पवार गट राकांपा भाजपसोबत आहे, तसेच अमरावतीत पक्ष स्वतंत्र उमेदवार उतरले आहेत. २०१७ च्या मनपा निवडणुकीत तत्कालीन राकांपा काहीही साधू शकली नाही; त्या वेळी खोडके दंपती काँग्रेससोबत होते आणि पक्षाने काहीही जिंकले नव्हते.

आता राकांपा फूटल्यानंतर अजीत पवार गटाबरोबर असलेल्या खोडके दंपतींसह दोन विधायक असलेल्या पक्षाची कामगिरी यंदाच्या निवडणुकीत कितपत प्रभावी ठरेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

अमरावती मनपा निवडणूक रणभूमीत खोडके दंपतींचा वेगळा मार्ग आणि महायुती गटाच्या युतीसमोर त्यांचा सामना या निवडणुकीत मुख्य आकर्षण ठरणार आहे.

# दोनशे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची निवडणूक कर्तव्याकरीता टाळाटाळ?

**अमरावती/का.प्र.**

सरकारी आणि निमसरकारी कर्मचाऱ्यांसाठी निवडणूक कर्तव्याचा उल्लेख होताच, अनेक जण ते टाळण्याचे मार्ग शोधू लागतात. काही अधिकारी आणि कर्मचारी गंभीर आजार, अपंगत्व किंवा रक्ताशी संबंधित आजारांचा उल्लेख करून निवडणूक कर्तव्यातून सूट मागत असल्याचे आढळून आले आहे.तथापि,आयुक्त आणि निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा यांनी स्पष्टपणे सांगितले की, अशा अर्जांशी जोडलेल्या सर्व कागदपत्रांची घटनास्थळीच चौकशी केली जाईल. जर कोणत्याही अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र बनावट असल्याचे आढळले तर त्यांना तात्काळ निलंबित केले जाईल. महापालिका आयुक्तांनी गेल्या बुधवारी अशा कडक सूचना दिल्या. निवडणूक कर्तव्याचे आदेश जारी होताच, सुमारे २०० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी गंभीर आजार किंवा अपंगत्वाचा उल्लेख करून अर्ज दाखल केले.

ही प्रमाणपत्रे जोडून कर्तव्यातून सूट मिळावी यासाठी प्रशासनाकडे अर्ज (विनंती) सादर करण्यात आला आहे. महानगरपालिका प्रशासन विभागाने ही सर्व प्रमाणपत्रे अतिशय गांभीर्याने घेतली आहेत आणि सचिव विभागात एक विशेष काउंटर सुरू केला आहे.तपासाचे आदेश देण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाने महानगरपालिका निवडणुका जाहीर केल्यानंतर, महानगरपालिकेसह शहरातील सरकारी, निमसरकारी आणि



### अर्ज सादर केलेल्या कागदपत्रांची चौकशी होणार

खाजगी कार्यालये, महाविद्या लये आणि शाळांमधील सर्व प्रमाणपत्रांची तपासणी केली जात आहे हे लक्षात घ्यावे.

महानगरपालिकेतील अधिका री आणि कर्मचाऱ्यांनी आयोगाच्या सूचनांकडे दुर्लक्ष केले आहे आणि आजारपणाचे कारण देत वेळेवर प्रमाणपत्रे सादर केली आहेत आणि त्यांचे नियुक्ती आदेश रद्द करण्याची विनंती केली आहे.

२०० हून अधिक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या या अर्जांनंतर, महानगरपालिका आयुक्तांनी या अर्जांची गंभीर दखल घेतली आहे आणि सर्व अर्जांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याचे आदेश जारी केले आहेत.

**कागदपत्राची चौकशी होणार**

निवडणूक कर्तव्यातून सूट मिळविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या बनावट वैद्यकीय किंवा इतर प्रमाणपत्रांसाठी सरकारी वैद्यकीय तज्ञ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तपासणी करत आहेत असे महापालिका आयुक्तांनी सांगितले. जर प्रमाणपत्रे बनावट किंवा खोटी आढळली तर २ ऑगस्ट २००६ च्या निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार अनुशासन हीनतेबद्दल संबंधितांवर कारवाई केली जाईल.

# मनपा निवडणुकीच्या तोंडावर इच्छुकांच्या 'कोलांटउडया'

**अमरावती/का.प्र.**

मनपाच्या आगामी निवडणुकाची प्रक्रिया ज्या जसजशी पुढे सरकत आहे, तसतशी शहराच्या राजकारणात उलथापालथचे दृश्य स्पष्टपणे उभे राहिले आहे. मनपा निवडणुकीत भाग घेण्यासाठी इच्छुक प्रबळ दावेदारांची गर्दी दिवसेंदिवस वाढत असताना, प्रत्येक पक्षाच्या स्थानिक नेत्यांकडे लॉबिंग आणि तिकीट मिळवण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. मात्र, या प्रक्रियेत नेते स्वतःच्या शिपाईसालारांना प्राधान्य देत, 'सर्वे'च्या आड घेत अनेक दावेदारांना बाजूला सारत असल्याचा आरोप आता जोर धरत आहे.

विधानसभा निवडणुकीच्या काळात आमदार खोडके गट, राणा गट आणि माजी आमदार डॉ. सुनील देशमुख यांनी आपल्या कार्यकर्त्यांना मनपा निवडणुकीत तिकीट देण्याचे आश्वासन दिले होते.या आश्वासनांवर विश्वास ठेवून कार्यकर्त्यांनी पक्षासाठी मेहनत घेतली, प्रचार केला, आणि अनेकांनी तर इतर पक्षांशी असलेले संबंध तोडून आपल्या पक्षासाठी काम केले.काही प्रभागांमध्ये प्रभावी कार्यकर्त्यांच्या घरी नेते स्वयं भेटी दिल्या,दूत पाठवले आणि मनपा निवडणुकीत उमेदवारीची ग्वाही दिली होती. परंतु आता, हेच नेते 'सर्वे अहवाल' या बहाण्याखाली आपली भूमिका बदलत दिसत आहेत.सूत्रांच्या माहितीनुसार, पक्षनेतृत्वाच्या नावाखाली चालवले जाणारे सर्वे काही ठिकाणी स्थानिक नेत्यानुसार बनवले जात असल्याचा आरोप आहे.जमीनीवर पकड असलेले, निवडणूक जिंकण्याची क्षमता असलेले प्रबळ दावेदार या निकषात बसत नसल्याचे सांगून बाजूला केले जात आहेत. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम आणि नाराजी वाढली असून, अनेक प्रबळ दावेदार आता दुसऱ्या पक्षाकडे जाण्याचा विचार करत आहेत. भाजपाच्या नेत्यांकडून सर्वेच्या आधारावर इच्छुकांना थांबण्याचा सल्ला दिला जात आहे. राकांपाच्या खोडके गटातील आमदार दंपती, खोडके गटाचे नेते, आपल्या इच्छुक दावेदारांना सर्वे अहवालाच्या आधारेच तिकीट मिळेल असा संदेश देत आहेत.

### सर्व्हेमुळे अनेकांचे स्वप्न भंगणार

बडनेरा मतदारसंघाचे आमदार रवि राणा, त्यांच्या युवा स्वाभिमान पक्षाच्या माध्यमातून मनपा निवडणुकीसाठी तयारी करत आहेत. त्यांच्या पक्षाने ४०० पेक्षा जास्त इच्छुकांच्या साक्षात्कार घेतले आहेत, परंतु भाजपा सह संभाव्य युतीच्या आधारावर तिकीट वितरणाची दिशा ठरवली जात असल्याची चर्चा आहे. काँग्रेसकडेही परिस्थिती वेगळी नाही. मनपा निवडणुकीत सत्तेत येण्याचा दावा करणाऱ्या काँग्रेसने सर्व ८७ प्रभागांसाठी उमेदवारांची यादी तयार केली आहे, तरीही जाहीर केलेली नाही. यामागील कारण म्हणजे काही दावेदारांना दुसऱ्या पक्षाकडून आकर्षित होण्यापासून रोखणे. माजी मंत्री आणि पूर्व आमदार डॉ. सुनील देशमुख यांनी मागील विधानसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांना मनपा निवडणुकीत आता सर्वेच्या आधारावर निर्णय घेतल्याने, अनेक कार्यकर्त्यांचे आश्वासन 'हवा-हवाई' ठरत आहे. राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे की, या सर्वेच्या नावाखाली चालणाऱ्या तिकीट छाटणीमुळे इच्छुकांमध्ये नाराजी वाढत असल्याने, दल-बदल सुरू होण्याची शक्यता वाजवी आहे. काही दावेदार दुसऱ्या पक्षांचा विचार करत आहेत, तर काही स्वतंत्र किंवा नव्या राजकीय मंचाची तयारी करत आहेत. यामुळे नामांकन प्रक्रियेच्या काळातच अमरावतीच्या राजकारणात मोठ्या प्रमाणावर बदल होऊ शकतो. जर इच्छुकांचा असंतोष वाढत राहिला तर मनपा निवडणुकीच्या समीकरणात मोठा उलटफेर घडू शकतो. सर्वेच्या नावाखाली तिकीट छाटणी, आश्वासनांची विस्मृती, आणि प्रबळ दावेदारांचे दल-बदल यामुळे शहराचे राजकीय वातावरण तापलेले असून, आहे.

आगामी काही दिवसांमध्ये राजकीय मनपा निवडणुकीच्या या संघर्षात, भाजपा, राकांपा (खोडके गट) आणि युवा स्वाभिमान पक्षाने आपापल्या धोरणांनुसार इच्छुकांना थांबवण्याचे प्रयत्न सुरू ठेवले आहेत, तर काँग्रेसनेही सर्वे अहवालाच्या आधारे आपले निर्णय घेण्याचे संकेत दिले आहेत. यामुळे मनपा निवडणुकीच्या मैदानात 'सर्वे विरुद्ध तिकीट' हा प्रश्न केंद्रस्थानी राहिला आहे. सध्या सर्व राजकीय गट 'सर्वे'चा हवाला देऊन इच्छुक दावेदारांना संयम बाळगण्याचे संकेत देत आहेत. मात्र कार्यकत्यांमध्ये वाढत असलेला असंतोष, दलांतराची तयारी आणि आश्वासनांची विस्मृती या तीन घटकांमुळे मनपा निवडणुकीच्या राजकीय समीकरणात अनपेक्षित बदल होऊ शकतात. आगामी काही आठवड-यांत अमरावती महानगरपालिकेच्या राजकारणात मोठ्या उलटफेरीचे दर्शन घडण्याची दाट शक्यता

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

# कृषी उत्पन्न वाढीसाठी कापणीपश्चात प्रक्रिया आवश्यक - कृषी आयुक्त सुरज मांढरे



## ॲग्रोटेक २०२५ कृषी प्रदर्शनीचे भव्य उद्घाटन; तीन लाख शेतकऱ्यांची पहिल्याच दिवशी उपस्थिती

■ प्रतिनिधी | अकोला ■

*शेती केवळ उत्पादनवाढीपुरती मर्यादित न ठेवता शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीवर केंद्रित असावी. त्यासाठी कापणीपश्चात शेतमाल प्रक्रिया अत्यावश्यक असून, गावपातळीवरच प्रक्रिया उद्योग उभे राहिल्यास शाश्वत शेती विकासाचे उद्दिष्ट साध्य होईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे कृषी आयुक्त सुरज मांढरे यांनी केले.*

कृषी क्रांतीचे प्रणेते स्व. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या क्रीडांगणावर २७ ते २९ डिसेंबरदरम्यान आयोजित तीन दिवसीय राज्यस्तरीय '?ग्रोटेक २०२५' कृषी प्रदर्शनी, कृषी महोत्सव, पुष्प व पशुप्रदर्शनी आणि चर्चासत्र कार्यक्रमाचे उद्‌घाटन कृषी आयुक्तांच्या हस्ते झाले. यावेळी ते उपस्थित शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करत होते. मांढरे म्हणाले की, आजची शेती श्रमाधारित न राहता तंत्रज्ञानाधारित झाली आहे. उत्पादन वाढले तरी योग्य प्रक्रिया व बाजारव्यवस्थेअभावी शेतकऱ्यांना कमी दरात माल विकावा लागतो. यावर उपाय म्हणून कापणीपश्चात कृषी माल प्रक्रिया संचालनालय स्थापण्याबाबत शासनस्तरावर सकारात्मक विचार सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. शाश्वत शेतीसाठी ज्ञानसंपत्तीचा योग्य वापर केल्यास विकासाची नवी दालने उघडतील, असेही त्यांनी नमूद केले.

**शाश्वत शेतीत ग्राम बीज उत्पादनाची गरज - कुलगुरू डॉ. शरद गडाख**

उद्‌घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी शाश्वत एकात्मिक पीक पद्धतीमध्ये ग्राम बीज उत्पादन कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता अधोरेखित केली. विद्यापीठस्तरावरील बीजोत्पादनातील अडचणी दूर करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**'आदर्श ग्राम' उपक्रमांतर्गत शाश्वत शेती पद्धती :** राबविल्यामुळे अल्पभूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांना मोठा लाभ झाल्याचे सांगून, निवडलेल्या गावांचे उत्पन्न सहा कोटी रुपयांपर्यंत



नेण्याचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हळद लागवडीमुळे चिल्का या आदर्श गावाचे उत्पन्न तीन कोटींवरून साडेपाच कोटींपर्यंत पोहोचल्याचे उदाहरण त्यांनी दिले.

**५५० हून अधिक स्टॉल्स; तंत्रज्ञानाची मेजवानी :** कार्यक्रमाच्या प्रारंभी विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे यांनी प्रास्ताविकातून मागील ४४ वर्षांपासून सुरू असलेल्या कृषी प्रदर्शनीच्या परंपरेचा आढावा घेतला. यंदा कृषी, पुष्प व पशुप्रदर्शनीसह सुमारे ५५० हून अधिक स्टॉल्स उभारण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. महाबीजच्या व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती भुवनेश्वरी, हैदराबाद येथील कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाचे संचालक डॉ. व्ही. के. सिंग, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्यासह अनेक मान्यवरांनी विद्यापीठाच्या संशोधन व तंत्रज्ञान प्रसार कार्याचे कौतुक केले.

**शेतकऱ्यांचा सन्मान, प्रकाशनांचे विमोचन :** यावेळी कृषी संवादिनी, कृषी दैनंदिनी तसेच विविध शास्त्रीय प्रकाशनांचे विमोचन करण्यात आले. आदर्श ग्राम उपक्रमांतर्गत पीक स्पर्धांतील विजेत्या तसेच 'पीपीव्ही-एफआर' कायद्यांतर्गत वाण नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**पहिल्याच दिवशी तीन लाख शेतकऱ्यांची उपस्थिती :** विदर्भासह राज्य व इतर राज्यांतून आलेल्या शेतकरी, युवक-युवती, कृषी पदवीधर, स्वयंसहायता गट आणि उद्योजकांनी प्रदर्शनीला मोठी गर्दी केली. पहिल्याच दिवशी तीन लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी उपस्थिती नोंदवली. रविवार, २८ डिसेंबर रोजी प्रदर्शनी सकाळी नऊ वाजेपासून सर्वांसाठी खुली राहणार आहे.

'शाश्वत शेती आणि समृद्ध शेतकरी' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी अधिकाधिक शेतकऱ्यांनी या प्रदर्शनीला भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# समाज प्रबोधनातून परिवर्तनाचा जागर



■ प्रतिनिधी | अकोट ■

**प्रबोधनकार कैलास महाराज खडसान यांचे उल्लेखनीय कार्य**

मुंडगाव येथील रहिवासी प्रबोधनकार कैलास महाराज खडसान गेल्या अनेक वर्षांपासून समाजप्रबोधनाचे भरीव आणि सातत्यपूर्ण कार्य करीत आहेत. राष्ट्रसंत गाडगे महाराज, वंदनीय तुकडोजी महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले या महामानवांच्या विचारांवर आधारित प्रबोधनाचा जागर ते विविध गावांतून घालत आहेत.

विशेष म्हणजे कैलास महाराज खडसान हे राष्ट्रसंत गाडगेबाबांची वेशभूषा परिधान करून समाजप्रबोधन करतात. त्यांच्या या अनोख्या आणि प्रभावी शैलीमुळे ग्रामीण भागात प्रबोधन अधिक परिणामकारक ठरत असून, सामाजिक संदेश सर्वसामान्यांपर्यंत सहज पोहोचत आहे.

स्त्री भ्रूणहत्या रोखा, वृक्षलागवड व पर्यावरण संवर्धन, पाणी अडवा–पाणी जिरवा, व्यसनमुक्त समाज निर्मिती आदी ज्वलंत सामाजिक विषयांवर त्यांच्या भाषणातून प्रभावी मांडणी केली जाते. ओघवत्या व स्पष्ट भाषाशैलीतून अंधश्रद्धा, व्यसनाधीनता आणि पर्यावरणावर होणारे अन्याय यावर ते नेमकेपणाने बोट ठेवतात.आजच्या बदलत्या काळात समाजाला योग्य दिशा देणारे असे प्रबोधन अत्यावश्यक असल्याचे जाणकारांचे मत असून, प्रबोधनकार कैलास महाराज खडसान यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या कार्यामुळे युवक, महिला तसेच सर्वसामान्य नागरिक सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून सकारात्मक बदलासाठी पुढे येत आहेत. अशा निस्वार्थ समाजप्रबोधन करणाऱ्या कार्यकर्त्यांना शासन, सामाजिक संस्था आणि लोकप्रतिनिधींनी अधिकाधिक पाठबळ द्यावे, ही काळाची गरज असल्याचे मत सुज्ञ नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## ३ जानेवारी रोजी महानगरात शाकंभरी प्राकट्य उत्सव



**अकोला :** स्थानिक शक्तिधाम सेवा समितीच्या वतीने पौष पौर्णिमा दि ३ जानेवारी २०२६ रोजी दु.३-३० वाजता स्थानीय गीता नगर परिसरातील शक्तीधामच्या प्रांगणात भव्य शाकंभरी प्रागट्य उत्सव होत असून याची तयारी पूर्ण झाली आहे.

या माता शाकंभरी प्राकट्य उत्सवात काशी येथील पुरोहित वर्गाच्या वतीने भव्य प्रसिद्ध गंगाआरती होणार असून यासाठी खास काशीवरून पुरोहित गंगा आरती उपकरण समवेत महानगरात पोहोचत आहेत.

या उत्सवात उत्तर प्रदेश मधील नान पारा धाम येथील प्रसिध्द मंगलपाठ गायक श्रीकुमार शानु हे मातेचा भव्य संगीतमय मंगलपाठ सादर करणार आहेत.या एक दिवसीय उत्सवात शाकंभरी मातेचा भव्य दरबार व झाकी निर्माण करण्यात येत आहे.

# नर्सिंग अभ्यासक्रमाच्या प्रवेश मुदतवाढीमुळे राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना संधी मिळणार

## डॉ. सुधीर ढोणे यांच्या पाठपुराव्यास यश

■ प्रतिनिधी | अकोला ■



आयुष अभ्यासक्रमास प्रवेश न मिळालेले हजारो विद्यार्थी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास इच्छुक असतांनाही प्रवेशाची अंतिम मुदत संपल्याने प्रवेशापासुन वंचित झाले होते. विद्यार्थ्यांची ही अडचण लक्षात घेऊन प्रायव्हेट नर्सिंग स्कुल ॲन्ड कॉलेज मॅनेजमेंट असोशिएशनचे अमरावती विभागीय अध्यक्ष डॉ.सुधीर ढोणे यांनी राजकीय व कायदेशीर पातळीवर केलेल्या प्रयत्नामुळे अखेर इंडियन नर्सिंग कौन्सील नवी दिल्ली यांनी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या प्रक्रियेस ३१ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे नर्सिंग क्षेत्रातील एएनएम, जीएनएम, बीएससी (नर्सिंग), पी.बी.बीएससी (नर्सिंग) या अभ्यासक्रमास प्रवेश इच्छुक राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळणार आहे.

आयुष म्हणजेच आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया २० डिसेंबर पर्यंत सुरू होती. या अभ्यासक्रमास प्रवेश न मिळालेले विद्यार्थी नर्सिंगच्या विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेत असतात. परंतु नर्सिंग अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया ३० नोव्हेंबर रोजी संपल्याने हे विद्यार्थी प्रवेशापासुन वंचित झाले होते. प्रायव्हेट नर्सिंग स्कुल ॲन्ड कॉलेज मॅनेजमेंट असोशिएशनचे अध्यक्ष बाळासाहेब पवार, सचिव शंकरराव अडसुळ, अमरावती विभागीय अध्यक्ष डॉ. सुधीर ढोणे, डॉ. तस्लीम शेख, कायदेविषयक सल्लागार ॲड. चंद्रकांत जाधव यांनी राज्याचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे अप्पर मुख्य सचिव धिरज कुमार व वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. अजय चंदनवाले यांना भेटुन नर्सिंग अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची अंतिम मुदत ३१ डिसेंबर पर्यंत वाढविण्यासाठी इंडियन नर्सिंग कौन्सील यांच्याशी पत्रव्यवहार करण्याची विनंती केली. या अधिकाऱ्यांनी तसे पत्रही पाठविले. परंतु १५ दिवसांचा कालावधी नंतरही इंडियन नर्सिंग कौन्सील यांनी प्रवेशाची अंतिम मुदत वाढविली नाही. त्यामुळे डॉ. सुधीर ढोणे यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री राज्यसभा सदस्य अशोक चव्हाण, अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, वाशिम-यवतमाळचे खासदार संजय देशमुख यांची भेट घेऊन इंडियन नर्सिंग कौन्सील, केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा, राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या नावाने पत्र घेऊन प्रवेशाची अंतिम मुदत वाढविण्याची विनंती केली. जनमताचा रेटा असल्याची वस्तुस्थिती इंडियन नर्सिंग कौन्सीलच्या निदर्शनास आणुन दिली.

त्यानंतर डॉ. सुधीर ढोणे यांनी प्रायव्हेट नर्सिंग स्कुल ॲन्ड कॉलेज मॅनेजमेंट असोशिएशन तर्फे दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल करून प्रवेशाची अंतिम मुदत ३१ डिसेंबर पर्यंत वाढविण्याची विनंती केली. २४ डिसेंबर रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने इंडियन नर्सिंग कौन्सीलला प्रवेशाची अंतिम मुदत वाढविण्याविषयी जनतेची व संबंधीत राज्यांची मागणी असतांनाही यावर कृती का करत नाही अशी विचारणा केली. यावर इंडियन नर्सिंग कौन्सीलने सकारात्मक निर्णय लवकरच घेण्याची हमी दिली व त्याच दिवशी रात्री प्रवेशाची अंतिम मुदत ३१ डिसेंबर पर्यंत वाढविण्याचे पत्र जारी केले. त्यामुळे राज्यात विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. नर्सिंग असोशिएशन तर्फे ॲड. अमोल कारंडे, ॲड.माणिक डोगरा, ॲड. संचित सिंग, ॲड. सार्थक गुप्ता, ॲड. उत्कर्ष कोकचा व ॲड. ध्रुव पांडे यांनी बाजु मांडली.

**अकोला महानगरपालिका, अकोला**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मनपा अकोला**

**निविदा सुचना क्र. २७ (२५-२६)**

आयुक्त, अकोला महानगरपालिका, मनपा निधी अंतर्गत ०८ काम, या कामांकरीता निविदा मागविण्यात येत आहे. करीता विस्तृत माहितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोलाच्या निविदा शाखेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर तसेच खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal: https://amcakola.in/

**कार्यकारी अभियंता**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/साबावि/११५०/२०२५,
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : २७/१२/२०२५

# पिंपळडोळी येथे हाप्पीच क्रिकेट स्पर्धेचे उत्साहात आयोजन

**माजी उपसभापती इमरान खान यांच्या हस्ते बक्षीस वितरण**



**खेट्री :** पातूर तालुक्यातील पिंपळडोळी येथे रॉयल क्रिकेट क्लबच्या वतीने हाप्पीच क्रिकेट स्पर्धेचे उत्साहात व यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत परिसरातील विविध गावांतील क्रिकेट संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित खेळाडूंनी आपली गुणवत्ता सादर केली.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात पातूर पंचायत समितीचे माजी उपसभापती इमरान खान (मुमताज खान) यांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. या स्पर्धेत पारखेड संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर कोळगाव संघाने द्वितीय, पिंपळडोळी संघाने तृतीय, चायगाव संघाने चतुर्थ आणि आवार संघाने पाचवा क्रमांक मिळविला.

बक्षिसांच्या स्वरूपात प्रथम क्रमांकासाठी २१,००१ रुपये, द्वितीय १०,००१ रुपये, तृतीय ५,००१ रुपये, चतुर्थ ३,००० रुपये आणि पाचव्या क्रमांकासाठी १,००० रुपये देण्यात आले. यासोबतच सलग तीन सिक्स व तीन विकेट्ससाठी विशेष बक्षिसेही देण्यात आली. मैदान उद्‌घाटन व कार्यक्रमास सरपंच दिलीप ताजने, निलेश करवते, अक्षय देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सामन्यांचे पंच म्हणून मोहसीन शेख यांनी जबाबदारी सांभाळली. ग्रामस्थ, खेळाडू व आयोजकांच्या सहकार्यामुळे ही स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली.

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३३४/२०२५ — प्रोसेस नं.२१०१८/२०२५
चौ.ता. ०५/०२/२०२६ — दिनांक : १४/१२/२०२५

**अर्जदार :** १. पद्मा रामदास गोखले २. सचिन रामदास गोखले ३. सुरज रामदास गोखले क. १ ते ३ रा. भारती प्लॉट, बाळापुर रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ४. सौ. रेखा खुसाल सोनकुसरे रा. बाजार चौक, वार्ड नं. १५, मोहंगाव, मोहगांव हवेली, छिन्दवाडा, मध्यप्रदेश ४८०१०५ ५. सौ. शुभांगी राजेश बारापात्रे रा. वार्ड नं. ८, लोधिखेडा, छिन्दवाडा, मध्यप्रदेश. ४८०१०८

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामदास गजानन गोखले
**पत्ता :-** रा. भारती प्लॉट, बाळापुर रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामदास गजानन गोखले यांचे दि. १८/०६/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/०२ / २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# चायनीज मांजा विक्री करणाऱ्या महिलेस अटक



■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

हिवरखेड येथे प्रतिबंधित नायलॉन चायनीज मांजा विक्री करणाऱ्या महिलेवर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

अकोला जिल्ह्यातील पोलीस स्टेशन हिवरखेड येथे दि. २५ डिसेंबर रोजी फिर्यादी पो.हे.कॉ. विजय बाबाराव सोळंके सोबत पोलीस स्टाफ असे पोलीस स्टेशन परिसरात पॅट्रोलींग करीत असतांना फिर्यादी यांना गुप्त बातमीदाराने दिलेल्या बातमीवरुन फिर्यादी यांनी पोलीस स्टाफ व दोन पंचाचे सह आरोपीच्या राहत्या घरी संभाजी नगर हिवरखेड येथे जावुन रेड कार्यवाही केली असता सदर गुन्हयातील महिला आरोपी हिने नागरीकांचा व पशु पक्षांचा जिव जाण्या इतपत गंभीर दुखापत व सदोष मनुष्यवध होईल याची जाणीत असतांना सुध्दा प्रतिबंधीत केलेला नायलॉन चायनीज मांजा विक्री करीता जवळ बाळगुन अवैध्यरित्या स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी विक्री करीत असतांना मिळुन आल्याने पोलीस विजय बाबाराव सोळंके यांनी दिलेल्या लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन हिवरखेड जि. अकोला येथे अपराध क्रमांक ३९५/२०२५ कलम ११०, २२३ भारतीय न्याय संहिता सहकलम ४,५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील महिला आरोपी आरोपीस अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गोपाल गिलबिले, पोलीस स्टेशन हिवरखेड जि. अकोला हे करीत आहेत.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांची आज गरज

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतीथी महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

भरकटलेली समाज व्यवस्था व युवा पिढींना सृजनशील ज्ञानाची गरज असून ही गरज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या वाङ्मयातून पूर्ण होऊ शकते ग्रामगीतेत संपूर्ण मानवी विकासाचे सूत्र समाविष्ट असून तरुणांनी या ग्राम गीतेचे नित्य पठाण करून निकोप समाजाची निर्मिती करण्याचे आवाहन गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरीचे प्रचार प्रमुख हभप प्रकाश महाराज वाघ

यांनी केले.अ. भा.श्री गुरुदेव सेवा मंडळ अंतर्गत वं.राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवा समितीच्या वतीने स्थानीय सिव्हिल लाईन परिसरातील जि.प. कर्मचारी भवनात ५७ व्या राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज पुण्यतिथी पुण्यस्मरण सोहळ्यास थाटात प्रारंभ झाला. या सोहळ्यात उद्‌घाटक म्हणून हभप प्रकाश महाराज वाघ हे मार्गदर्शन करीत होते. डॉ गजानन नारे यांच्या



अध्यक्षतेत संपन्न या सोहळ्यात स्वागताध्यक्ष अन्नपूर्णेश पाटील ,हभप शुकदास गाडेकर,गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्धन बोथे, हभप गुलाबराव महाराज, रवींद्र मुंडगावकर,माजी आ. बबनराव चौधरी, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अध्यक्ष संग्राम गावंडे, एड मोतिसिह मोहता,ज्ञानेश्वर सुलताने,कृष्ण अंधारे,प्रा डॉ संतोष हुशे, चित्रलेखा म्हैसने,शिवप्रकाश रुहाटीया, तुकड़ोजी महाराज सेवा समिति के अध्यक्ष शिवाजी म्हैसने, कार्याध्यक्ष एड. संतोष भोरे, त्र्यंबकराव आखरे, शेख गुरुजी, डॉ. गजानन काकड, गंगाधर पाटील, सहदेवराव खांबलकर, रवींद्र ढोरे, दिलीप कराळे, श्रीकृष्ण सावडे, सुरेश राऊत, गजानन जालनकर, चंद्रशेखर चतारे, बंडूभाऊ शेळके, डॉ. गोवर्धन आखरे आदी उपस्थित होते. दीप प्रज्वलन व राष्ट्रसंतांच्या प्रतिमा पूजनाने या सोहळ्याचा प्रारंभ करण्यात आला.

यावेळीजनार्दन बोधे यांनी आपले विचार व्यक्त करीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवन कार्याची माहिती दिली. तुकडोजी महाराज हे स्वातंत्र्यसेनानी होते. महाराजांनी आंदोलने केलीत. ते रायपूर तुरुंगात होते.स्वातंत्र्यासाठी ही लढणारी व्यक्ती म्हणून राष्ट्रसंतांच्या सेवा कार्याकडे बघितल्या गेले पाहिजे असे त्यांनी सांगितले. तर अध्यक्षीय मनोगतात डॉ गजानन नारे यांनी विद्यार्थी विश्वात राष्ट्रसंतांच्या वैचारिक वारसाचे मनन झाले पाहिजे असे मत व्यक्त केले. राष्ट्रसंतांचे साहित्य आज समाजात विपुल प्रमाणात आहे. त्यांचे साहित्य साधे सरळ सोपे व सामान्य जणांच्या आकलनाचे आहे. जनसामान्यांमध्ये जागृती झाली पाहिजे, यासाठी त्यांनी ग्रामगीतेची निर्मिती केली. ग्रामगीता ही जगण्याची प्रेरणा देते. आज समाजात युवा पिढीला बिघडविण्याचे कार्य जोमाने सुरू असून त्यावर राष्ट्रसंतांचे विचारच हा एकमेव अक्सीर इलाज असल्याचे डॉ नारे यांनी यावेळी सांगितले.या उद्घाटन सोहळ्यात अनेक मान्यवरांनी आपले विचार व्यक्त करीत राष्ट्रसंतांच्या विचारांची समाजाला खरी गरज असल्याचे सांगितले.या सोहळ्यात सोहळ्यात स्व कालूराम रुहाटिया चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने व्यसनमुक्ती सम्राट हभप मधुकर महाराज खोडे यांना कार्य गौरव पुरस्कार प्रदान करून त्याचा गौरव करण्यात आला.

जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# आर्वीत भाजपचा गृहयुद्धाचा भडका

## आपलेच आमदार, पण रस्त्यावर अपमान' : सत्ता, अहंकार आणि सूडाचा राजकीय सामना

**वर्धा/ रवींद्र लाखे**

आर्वी नगरपालिकेच्या निवडणुकीनंतर भाजपमध्ये उसळलेला अंतर्गत कलह आता उघड रस्त्यावर आला आहे. पराभवाचे राजकीय आत्मपरीक्षण करण्याऐवजी आपल्याच पक्षातील नेत्यांवर दोष ढकलण्याची, त्यांना शिवीगाळ करण्याची आणि जाहीर अपमान करण्याची परंपरा सुरू झाल्याने भाजपची शिस्त, संस्कार आणि नेतृत्वावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सत्ता आपली, पण वर्तन रस्त्यावरील असा प्रश्न आता आर्वीतील नागरिक विचारत आहेत.

आर्वी विधानसभा क्षेत्राचे आमदार सुमित वानखेडे आणि विधानपरिषदेचे आमदार दादाराव केचे हे दोघेही भाजपचेच नेते. मात्र विधानसभा निवडणुकीपासून सुरू झालेले मतभेद आजही जळजळीत स्वरूपात कायम असल्याचे कालच्या घटनेने सिद्ध केले. वरिष्ठ पातळीवर दोघेही समान आमदार असे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात कार्यकर्त्यांच्या माध्यमातून सुरू असलेली तू-तू, मै-मै ची लढाई थांबण्याचे नाव घेत नाही.नगरपालिका निवडणुकीत पराभूत झालेल्या काही उमेदवारांनी, जे सुमित वानखेडे गटाशी संबंधित असल्याची चर्चा आहे, त्यांनी थेट दादाराव केचे यांना रस्त्यात अडवून शिवीगाळ व अभद्र भाषा वापरल्याची धक्कादायक घटना घडली. सत्ताधारी पक्षातील आमदाराला सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारे अपमानित करणे ही केवळ



राजकीय असभ्यता नसून भाजपच्या प्रतिमेला काळिमा फासणारी बाब ठरली आहे. या घटनेचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले असून, भाजपमध्ये अंतर्गत शिस्त संपली का? असा प्रश्न आता सर्वसामान्य जनतेतून विचारला जात आहे.या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना दादाराव केचे यांनी थेट नाव न घेता यामागे कोणाचा हात आहे, हे सर्वांनाच माहीत आहे. असे सूचक विधान करून आगीत तेल ओतले आहे. दुसरीकडे, ही घटना सुमित वानखेडे यांना अजिबात शोभणारी नसल्याची भावना नागरिकांमध्ये तीव्रपणे उमटत आहे. आपल्याच पक्षातील ज्येष्ठ नेत्यांचा सन्मान राखणे ही किमान राजकीय नैतिकता आहे. तीही जर पाळली जात नसेल, तर भाजप इतरांना काय धडा देणार, असा प्रश्न आता खुलेआम होत आहे.आर्वीच्या राजकीय वर्तुळात आणखी एक खळबळजनक चर्चा रंगली आहे. देवेंद्र फडणवीस यांचे पाठबळ असल्याचा गैरसमज करून काही नेते बेफाम वागत असल्याची कुजबुज आहे. माझ्याजवळ फडणवीस आहेत, त्यामुळे माझे कोणी वाकडे करू शकत नाही. अशी धारणा निर्माण झाल्यामुळेच हा अहंकार, ही अरेरावी आणि ही बेफिकीर भाषा आर्वीत दिसत असल्याचा आरोप होत आहे.आज भाजप आर्वीत सत्तेत असली, तरी अशीच अंतर्गत भांडणे, अपमान आणि अहंकाराची राजकारणं सुरू राहिली, तर जनता दूर जाण्यास वेळ लागणार नाही. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने वेळीच हस्तक्षेप करून या 'गृहयुद्धाला' पूर्णविराम दिला नाही, तर आर्वीमध्ये भाजपची राजकीय माती होणे अटळ असल्याचा इशारा जाणकार देत आहेत. आता प्रश्देणार भाजप नेतृत्व कानपीचकणी करणार, की हे राजकीय रणकंदन अधिकच भडकू देणार.

# संक्षिप्त

## कुरिअर कार्यालय फोडून ९५ हजारांवर हातसफाई

**वर्धा -** हिंगणघाटच्या नांदगाव चौकातील नागपूरस्थित एन. टेक्स ट्रान्सपोर्ट कुरिअर कंपनीच्या कार्यालयावर चोरट्यांनी डल्ला मारत लॉकरमधील ९५ हजार ८४६ रुपये लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.सुपरवायझर निखिल डेंगळे यांनी कार्यालय बंद केल्यानंतर रात्री शटरचे कुलूप तोडून चोरट्यांनी प्रवेश केला. दुसऱ्या दिवशी कर्मचारी शौर्य उके यांच्या लक्षात चोरीचा प्रकार आला. राहुल मुंडले यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू आहे.

## ओव्हरलोड वाहतुकीने गावरस्त्यांची चाळण

**पुलगाव -** वर्धा नदी व नाल्यांमधून रात्रीच्या अंधारात सुरू असलेल्या अवैध रेती उपशामुळे व भरधाव ओव्हरलोड वाहतुकीमुळे ग्रामीण भागातील रस्त्यांची अक्षरशः वाट लागली आहे.कारवाई टाळण्यासाठी रात्री ट्रक, टिप्पर, ट्रॅक्टरद्वारे रेती वाहतूक होत असून ग्रामस्थांच्या तक्रारींकडे संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप होत आहे.

## थंडीचा कहर! जिल्ह्यात गारठा वाढला

**वर्धा-** जिल्ह्यात बोचऱ्या थंडीने चांगलाच जोर धरला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. रब्बी हंगामातील कामांसाठी पहाटे शेतात जाणाऱ्या शेतकरी व मजुरांना थंडीचा मोठा फटका बसत आहे.थंडीमुळे वृद्ध व बालकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णसंख्या वाढली आहे.

## उपचार सुरू असतानाच वृद्धाचा अंत

**आर्वी -** तालुक्यातील महाकाळी येथील अजाबराव मारोतराव इरपाचे (८०) यांचे सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले.

प्रकृती बिघडल्याने दाखल करण्यात आलेल्या इरपाचे यांच्या मृत्यूची नोंद सेवाग्राम पोलिसांनी आकस्मिक मृत्यू म्हणून केली असून पुढील तपास खरांगणा (मोरांगणा) पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

## पवनार येथे शेतकऱ्याची आत्महत्या

**वर्धा-** पवनार येथील शेतकरी प्रमोद विठोबाजी बुटले (४७) यांनी कर्जाच्या ओझ्याखाली आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. २१ डिसेंबर रोजी स्वतःच्या शेतात विष प्राशन केल्यानंतर उपचारादरम्यान सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात त्यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी सेवाग्राम पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## चोऱ्यांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा धडाका; संशयिताला अटक

**समुद्रपूर-** तालुक्यात चोऱ्यांचे प्रमाण वाढल्याने पोलिसांनी गस्त वाढवली असून हळदगाव येथे संशयास्पदरित्या वावरणाऱ्या सचिन ठाकरे (३२, रा. शिवणी) याला अटक करण्यात आली आहे.बसस्थानक परिसरात अंधारात वावरताना त्याची चौकशी करण्यात आली असता संशयास्पद उत्तरे मिळाल्याने कारवाई करण्यात आली.

# रस्त्यावर सांडपाण्याची 'नदी'

## हिंगणघाटच्या प्रभाग १७ मध्ये आरोग्याचा स्फोटक प्रश्न

## राधानंद अपार्टमेंट समोर घाणीचे साम्राज्य

**हिंगणघाट/जनमाध्यम**

शहरातील प्रभाग क्र. १७ अंतर्गत मारोती वॉर्ड क्र. २ येथील राधानंद अपार्टमेंट परिसरात सांडपाण्याचा प्रश्न अक्षरशः हाताबाहेर गेला असून नागरिकांच्या आरोग्यावर थेट घाव घातला जात आहे. अपार्टमेंटमधील चेंबरमधून निघणारे सांडपाणी योग्य पाईपलाईन न बसवता थेट रस्त्यावर सोडले जात असून, रस्ताच सांडपाण्याची वाहिनी बनला आहे. हे घाणेरडे पाणी पुढे गटारात मिसळते, मात्र तोपर्यंत संपूर्ण परिसर दुर्गंधी, डास आणि आजारांच्या विळख्यात अडकलेला आहे.



या सांडपाण्यामुळे रस्त्यावर कायमस्वरूपी घाण साचली असून पावसाळ्यात तर परिस्थिती अधिकच भयावह बनते. साचलेले पाणी, तीव्र दुर्गंधी आणि वाढलेला डासांचा प्रादुर्भाव यामुळे डेंग्यू, मलेरिया, टायफॉईड सारख्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे या मार्गावरून दररोज शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कामगारांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. पाय घसरून पडण्याच्या घटनाही घडत असून अपघाताचा धोका वाढला आहे.परिसरातील नागरिकांच्या मते, या प्रश्नाबाबत वारंवार तक्रारी करूनही नगर परिषदेच्या आरोग्य विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याने संताप उफाळून आला आहे. आमच्या जीवाची किंमत शून्य आहे का असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. लहान मुले व वृद्ध सर्वाधिक त्रस्त असून नागरिकांच्या संयमाचा बांध आता तुटण्याच्या मार्गावर आहे.नगर परिषदेने तातडीने या ठिकाणी पाहणी करून संबंधित अपार्टमेंट व्यवस्थापनावर कठोर कारवाई करावी, योग्य पाईपलाईन बसवून सांडपाणी थेट गटारात सोडण्याची व्यवस्था करावी, अन्यथा परिसरातील नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन करतील, असा इशारा दिला जात आहे.

शहर स्वच्छतेच्या घोषणा हवेतच राहणार की प्रत्यक्षात उतरतील, असा सवाल आता हिंगणघाटकर विचारत आहेत.

# गावकुसात सन्मानाची गर्जना



## ग्रामसभेत वयोवृद्धांचा सपत्नीक गौरव, दिव्यांगांना निधी, समृद्ध पंचायत राजचा ठसा

**मोझरी(शेकापूर)/ जनमाध्यम**

गावाच्या विकासाला दिशा देणारी आणि माणुसकीचा ठसा उमटवणारी विशेष ग्रामसभा स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयात पार पडली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे ग्रामसभेला वेगळीच धार मिळाली. या ग्रामसभेत वयोवृद्ध दोन जोडप्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला, तर दिव्यांग बांधवांना थेट आर्थिक मदत देऊन ग्रामपंचायतीने सामाजिक बांधिलकी अधोरेखित केली.

हिंगणघाट पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या मोझरी (शेकापूर) येथे दुपारी घेण्यात आलेल्या विशेष ग्रामसभेत 'विकसित भारत जी राम जी' या योजनेची सविस्तर माहिती नागरिकांना देण्यात आली. यावेळी वयोवृद्ध नागरिक लक्ष्मणराव जुमनाके व गिरजाबाई जुमनाके तसेच ज्ञानेश्वरराव कुमरे व दुर्गाबाई कुमरे या जोडप्यांचा शाल, श्रीफळ व वृक्ष देऊन सन्मान करण्यात आला. वृक्ष देऊन गौरव करण्यामागे पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला.ग्रामसेविका अलका ताल्हण यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची उद्दिष्टे, लाभ आणि भविष्यातील नियोजन याबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. गावाचा सर्वांगीण विकास, नागरिकांचे जीवनमान उंचावणे आणि समस्या मार्गी लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, अशी ठाम ग्वाही सरपंच मंदाताई धोबे यांनी दिली.या ग्रामसभेत सामाजिक न्यायालाही प्राधान्य देण्यात आले. ग्रामपंचायत निधीतील पाच टक्के तरतुदीअंतर्गत २८ दिव्यांग बांधवांना प्रत्येकी एक हजार रुपयांचे वितरण करण्यात आले. थेट मदतीमुळे दिव्यांग लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकले.ग्रामसभेला उपसरपंच शुभ्रबुद्ध कांबळे, ग्रामपंचायत सदस्य संगीता मून, दिपाली लंगडे, सोनाली शेवाळकर, अमोल पेंद्राम, संदीप होले यांच्यासह महिला व पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन संगीता मडावी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शरद मांडवकर, आकाश वणकर, युवराज मडावी व मधुकर काळे यांनी विशेष सहकार्य केले.

## हिरव्या स्वर्गाची घडण

# आष्टीतील सामाजिक वनीकरण रोपवाटिका बनली 'मिनी पर्यटन केंद्र'



## निसर्ग, रोजगार आणि पर्यावरण संवर्धनाचा त्रिवेणी संगम

**आष्टी(शहीद)/ जनमाध्यम**

आष्टी तालुक्यातील लहान आर्वी ग्रामपंचायत हद्दीतील विठ्ठलापूर मौजामधील सामाजिक वनीकरण विभागाची रोपवाटिका आज केवळ रोपे तयार करणारे ठिकाण न राहता संपूर्ण परिसरातील एक आकर्षक पर्यटन स्थळ म्हणून नावारूपास येत आहे. हिरवळीने नटलेली झाडे, विविध रंगांची फुलझाडे, स्वच्छ व सुशोभित पायवाटा आणि प्रसन्न वातावरण यामुळे ही रोपवाटिका नागरिक, विद्यार्थी व निसर्गप्रेमींचे खास आकर्षण ठरत आहे.

या रोपवाटिकेत देशी-विदेशी वृक्ष, औषधी वनस्पती तसेच विविध फुलझाडांची नियोजनबद्ध लागवड करण्यात आली आहे. सामाजिक वनीकरण विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे परिसराचे नैसर्गिक सौंदर्य खुलून आले असून, आष्टी ते मोर्शी मार्गावरून प्रवास करणारे अनेक नागरिक मुद्दाम रोपवाटिकेला भेट देत आहेत. शालेय विद्यार्थ्यांसाठी ही रोपवाटिका पर्यावरण शिक्षणाचे जिवंत व्यासपीठ ठरत आहे.या उपक्रमाच्या यशामागे सामाजिक वनीकरण विभागाचे वनरक्षक इंद्रपाल भगत यांचे विशेष योगदान असून, विभागीय वन अधिकारी एस. जी. बढेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व वनक्षेत्रपाल एस.पी. डोंगरे यांच्या प्रयत्नांमुळे रोपवाटिकेची निगा, संवर्धन व सौंदर्यीकरण प्रभावीपणे करण्यात येत आहे. वृक्षसंवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृतीही मोठ्या प्रमाणात होत आहे.या रोपवाटिकेमुळे परिसरातील पर्यावरणीय समतोल राखला जात असून तापमानात घट, शुद्ध हवामान आणि जैवविविधतेला चालना मिळत आहे. शिवाय भविष्यात स्थानिक नागरिकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सामाजिक वनीकरण विभागाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे ही रोपवाटिका येत्या काळात एक प्रमुख पर्यटन व पर्यावरण संवर्धन केंद्र म्हणून ओळखली जाईल, असा विश्वास लहान आर्वी ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच सुनील साबळे यांच्यासह परिसरातील नागरिकांनी व्यक्त केला आहे.

# कानगाव येथे पोकरा अंतर्गत हरभरा पिकाची शेतीशाळा



**कानगाव/ जनमाध्यम**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) टप्पा-२ अंतर्गत मौजा कानगाव येथे हरभरा पिकासाठी शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले. ही शेतीशाळा हिंगणघाट येथील उपविभागीय कृषी अधिकारी स्वप्नील तोरणे, तालुका कृषी अधिकारी सचिन सुतार व अल्लीपूर मंडळ कृषी अधिकारी विनोद पडवे यांच्या मार्गदर्शनाखाली गजानन पांडव यांच्या शेतात पार पडली.

या शेतीशाळेत उपस्थित शेतकऱ्यांनी हरभरा पिकाची प्रत्यक्ष पाहणी करत पिकाच्या वाढीव अवस्थेवर सखोल चर्चा केली.सहाय्यक कृषी अधिकारी मोहीन शेख यांनी हरभरा पिकाच्या सध्याच्या स्थितीबाबत मार्गदर्शन करत योग्य व्यवस्थापन पद्धती स्पष्ट केल्या. तंत्रज्ञान समन्वयक अमोल वाळके यांनी हरभरा पिकावरील किडी, रोग तसेच मररोग नियंत्रण व व्यवस्थापन याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच कृषी सेवक निखील चितोडे यांनी 'महाविस्तार एआय' ॲप शेतकऱ्यांसाठी काळाची गरज असल्याचे सांगत त्याच्या वापराचे महत्त्व अधोरेखित केले.या कार्यक्रमास कानगाव व नांदगाव परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतीशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी कृषिताई सुवर्णा देवडे व गजानन पांडव यांनी विशेष प्रयत्न केले. शेतीशाळेमुळे शेतकऱ्यांना हरभरा पिकाच्या सुधारित तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

# अखेर तहसीलदारांच्या कारवाईने पांदन रस्त्याला झाली सुरूवात

## अतिक्रमण तात्काळ हटवून रस्ता खुला

**समुद्रपुर/ जनमाध्यम**

वर्षानुवर्षे रखडलेल्या वडगाव-पाईकमारी पांदन रस्त्याच्या प्रश्नाला अखेर निर्णायक कलाटणी मिळाली असून, तहसीलदार कपिल हाटकर यांच्या तत्पर आणि ठोस भूमिकेमुळे या रस्त्याच्या कामाला जलदगतीने सुरुवात झाली आहे. दोन्ही गावांतील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला हा पांदन रस्ता पावसाळ्यात अक्षरशः बंद पडत असल्याने शेतकऱ्यांना शेतात जाणेही मुश्कील झाले होते.

अनेक वर्षांपासून या रस्त्याच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन आमदार समिर कुणावार यांनी या पांदन रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करून दिला. मात्र प्रत्यक्ष काम सुरू होताच रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणामुळे मोठा अडसर निर्माण झाला होता.या गंभीर विषयाकडे लक्ष वेधण्यासाठी सरपंच संघटनेचे जिल्हा प्रसिद्ध प्रमुख विलास नवघरे व तालुकाध्यक्ष राजू नौकरकर यांनी तहसीलदार कपिल हाटकर यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन दिले. शेतकऱ्यांची गैरसोय लक्षात घेऊन तहसीलदार हाटकर यांनी क्षणाचाही विलंब न करता भूमी अभिलेख विभागाला लेखी आदेश देत पांदन रस्त्याची तात्काळ मोजणी करून रस्ता खुला करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या.भूमी अभिलेख अधिकारी सती मेश्राम, मंडळ अधिकारी जाधव व तलाठी सोनू कुबडे यांनी प्रत्यक्ष स्थळावर जाऊन नकाशानुसार सविस्तर मोजणी केली. ज्या शेतकऱ्यांची शेती पांदन रस्त्यात येत होती, त्यांची समजूत काढून कोणताही वादविवाद न होता अतिक्रमण हटवण्यात आले. प्रशासनाच्या या संयमी पण ठाम भूमिकेमुळे रस्त्याचा मार्ग मोकळा झाला.तहसीलदार कपिल हाटकर यांच्या तत्परतेमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या पांदन रस्त्याच्या कामाला अखेर गती मिळाली असून, शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकले आहे. अतिक्रमण असणाऱ्या तसेच नसणाऱ्या दोन्ही गटांतील शेतकऱ्यांनी आमदार समिर कुणावार, तहसीलदार कपिल हाटकर, विलास नवघरे, राजू नौकरकर, साहेबराव पाऊणफासे यांचे आभार मानले.मोजणी व कारवाईदरम्यान पोलीस पाटील धनपाल मुन, सुधाकर राऊत, भोला राऊत, लोभा राऊत, चिंधू राऊत, भास्कर राऊत, शरद मुळे, मोहन मुळे, गुणवंत रोकडे, लिलाधर मुळे, महादेव लढी यांच्यासह दोन्ही गावांतील शेतकरी उपस्थित होते.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - ३३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

### अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५

# मतदान केंद्राध्यक्ष व कर्मचाऱ्यांचे व्यापक प्रशिक्षण अभियान



**अमरावती -** अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ पारदर्शक, निर्भय व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाच्या वतीने व्यापक तयारी करण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्राध्यक्ष १, २ व ३ या पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने शनिवार, दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी २.०० वाजेपर्यंत सांस्कृतिक भवन तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) येथे प्रशिक्षण यशस्वीरीत्या संपन्न झाले. या प्रशिक्षणात अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशिक्षणादरम्यान निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना, मतदान प्रक्रियेतील जबाबदाऱ्या, मतदान केंद्रावरील शिस्त, मतदारांना देण्यात येणाऱ्या सुविधा, आचारसंहिता, ईव्हीएम व व्हीव्हीपॅट संदर्भातील माहिती तसेच आकस्मिक परिस्थितीत घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तज्ज्ञ प्रशिक्षक व निवडणूक विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे प्रशिक्षण देत कर्मचाऱ्यांच्या शंकांचे निरसन केले. मतदानाच्या दिवशी कोणतीही चूक होऊ नये, मतदान प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक राहावी तसेच मतदारांचा विश्वास अधिक दृढ व्हावा, या दृष्टीने हे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी तहसिलदार विजय लोखंडे, रवि महाले यांनी पहिल्या सत्रात प्रशिक्षण दिले. अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमावेळी निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी प्रतिपादन केले की, 'अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक ही लोकशाही प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. ही निवडणूक पारदर्शक, मुक्त, निर्भय व निष्पक्ष पद्धतीने पार पाडणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. यामध्ये मतदान केंद्राध्यक्ष तसेच मतदान केंद्रावरील अधिकारी व कर्मचारी यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.' 'मतदानाच्या दिवशी मतदारांना कोणतीही अडचण येऊ नये, मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रत्येकाने आपल्या जबाबदाऱ्या नीट समजून घेऊन काम करावे. प्रशिक्षणादरम्यान दिलेल्या सूचना, नियम व कार्यपद्धती प्रत्यक्ष कामकाजात अचूकपणे अमलात आणल्या गेल्या तरच निवडणूक यशस्वी होईल,' असे त्यांनी नमूद केले.

'लोकशाहीचा उत्सव शांततेत आणि विश्वासार्हतेने पार पडावा, यासाठी प्रशासन पूर्णतः सज्ज आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळेच ही निवडणूक आदर्श पद्धतीने पार पाडता येईल,' असा विश्वास व्यक्त करत त्यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाचा पूर्ण लाभ घेऊन जबाबदारीने काम करण्याचे आवाहन केले. दरम्यान, प्रशिक्षणाचा पुढील टप्पा उद्या रविवार, दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सांस्कृतिक भवन व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे आयोजित करण्यात आला आहे. उर्वरित तसेच संबंधित सर्व नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळेत उपस्थित राहून प्रशिक्षण पूर्ण करावे, असे आवाहन निवडणूक प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. अमरावती महानगरपालिका निवडणूक शांततापूर्ण व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असून, या प्रशिक्षणामुळे निवडणूक यंत्रणा अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### भारत-तिबेट सांस्कृतिक संबंध मानवतावादी : ताशी देकी

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात भारत तिबेट यांचे ऐतिहासिक संबंध विषयावर कार्यशाळा संपन्न



**अमरावती -** 'भारत आणि तिबेट यांचे संबंध मानवतावादी असून बौद्ध धर्माचा प्रसार आणि प्रचारामुळे या दोन देशातील संबंध दृढ झालेले आहेत.' असे प्रतिपादन भारत व तिबेट समन्वय कार्यालय, नवी दिल्लीच्या समन्वयक मा. ताशी देकी यांनी केले. त्या श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती द्वारा संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती आणि रामकृष्ण शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भारत तिबेट यांचे ऐतिहासिक संबंध' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत बोलत होत्या. त्यांनी या कार्यशाळेच्या बीजभाषणातून तिबेट येथील सामाजिक आणि राजकीय परिस्थितीवर सादरीकरण केले, त्या पुढे म्हणाल्या की, 'भारत आणि तिबेट यांचे संबंध खूप जुने असून राजकीय आणि धार्मिकतेच्या पलीकडील आहेत.' या कार्यशाळेचे उद्घाटन सुप्रसिद्ध गजल नवाज माननीय भीमराव पांचाळे भीमराव पांचाळे यांनी केले, त्यांनी आपल्या उद्घाटकीय भाषणातून या कार्यशाळेच्या सुंदर आयोजनासाठी महाविद्यालयाचे अभिनंदन केले तसेच त्यांचे श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट,अमरावती सोबत असलेले संबंधाबद्दल सांगितले. याप्रसंगी विचार मंचावर श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावतीचे सचिव तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कमलाकर पायस होते. त्यांनी भारत आणि तिबेट यांच्या ऐतिहासिक संबंधाची पार्श्वभूमी आपल्या प्रस्तावनेतून विशद केली. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून कोअर ग्रुप फॉर तिबेट कॉजचे सह संयोजक मा.अरविंद निकोसे,संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा. डॉ. सचिन पंडित,रामकृष्ण शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कृष्णा माकोडे, प्रफुल धार्मिक, सुशांत युनाते, कु. भाग्यश्री वानखडे, सागर शिरसाट, रोशन वैद्य सह समस्त विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महाविद्यालय, अमरावती यांच्या सह रामकृष्ण शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**तिबेटच्या प्रश्नाबाबत लोकांना जाणीव व्हावी. - भीमराव पांचाळे**

या कार्यशाळेमुळे तिबेटच्या प्रश्नाबाबत लोकांना जाणीव व्हावी, जगात कुणालाही निर्वासित होण्याची वेळ येऊ नये. भारत आणि तिबेट संबंध जगातील सर्व देशासाठी आदर्श मैत्रीचे उदाहरण आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावतीने या प्रकारच्या महत्वाच्या विषयावर कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल हे महाविद्यालय अभिनंदनास पात्र आहे. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावतीच्या अध्यक्षा माननीय कीर्तीताई राजेश अर्जुन या होत्या, त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून भारत आणि तिबेट यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक संबंधावर प्रकाश टाकला.

**भारत आणि तिबेट समान संस्कृतीचे पाईक - कीर्तीताई अर्जुन**

या कार्यशाळेच्या अध्यक्षीय भाषणातून श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावतीच्या अध्यक्षा माननीय कीर्तीताई राजेश अर्जुन यांनी भारत आणि तिबेट यांच्या संबंधावर बोलताना सांगितले की, भारत आणि तिबेट हे एका समान सांस्कृतिक चळवळीचे पाईक असून बुद्ध धम्मामुळे दोन्ही देशात सामाजिक आणि सांस्कृतिक विचारांचे देवाण घेवाण होऊन, ऐतिहासिक संबंधाचा पाया रचला गेला. त्यानंतर झालेल्या वैचारिक देवाण घेवाण यातून दोनही देशातील नागरिकांना सामाजिक उत्थान होण्यासाठी मदत झाली. तिबेटच्या निर्वासितांचा प्रश्न निर्माण झाल्यावर भारताने त्यांना खंबीरपणे साथ दिली. आजही आम्ही सर्व तिबेटच्या नागरिकांसोबत उभे असून, त्यांच्या लढ्यात आमचा नैतिक पाठिंबा आहे.

# कुऱ्हा येथे संत गाडगे महाराज पुण्यतिथी ग्राम स्वच्छता अभियान उत्साहात संपन्न



**कुऱ्हा -** गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला या भजनाच्या माध्यमातून संपूर्ण गावागावात जाऊन ग्रामसफाईचे महत्त्वपूर्ण काम संत गाडगे महाराज यांनी केले सकाळी ग्राम स्वच्छता करायची आणि रात्री लोकांच्या डोक्यांमध्ये साचली घाण कीर्तनाच्या माध्यमातून साफ करणे करायची हा मंत्र गाडगे महाराजांनी आपल्या जीवनात घेतला होता. हाच संदेश लोकांपर्यंत पोहोचावा याच उद्देशाने २० डिसेंबर रोजी कुऱ्हा येथील कर्मयोगी फाउंडेशन व श्री गुरुदेव सेवा मंडळ अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामगीताचार्य हनुमंत ठाकरे उपस्थित होते. सोबतच गावातील ज्येष्ठ नागरिक म्हणून विजय डहाके उपस्थित होते. दुपारी संत गाडगे महाराज पुण्यतिथी निमित्ताने गावामध्ये ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले. कुऱ्हा पोलिस स्टेशन समोरील संपूर्ण परिसर गुरुदेव प्रेमींनी साफ करून कचरा जाळण्यात आला. यामध्ये सर्व गावकरी व कर्मयोगी फाउंडेशन व गुरुदेव सेवा मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. संध्याकाळी श्री हनुमानजी देवस्थान कुऱ्हा या ठिकाणी भव्य वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. यामध्ये संत गाडगे महाराज यांच्या जीवनातील विविध विषय विद्यार्थ्यांना दिले होते. त्यावर विद्यार्थ्यांनी सुंदर असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गावातील छोट्या मुलांनी श्री संत गाडगे महाराज यांची भूमिका साकारली होती. देवकीनंदन गोपाला देवकीनंदन गोपाला सांभाळी तुझी लेकरे पुण्य समजती बापाला या भजनाच्या तालावर त्यांनी सर्व आलेल्या पाहुण्यांचे व प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले होते.या कार्यक्रमासाठी मुख्य व्याख्या न ग्रामगीताचार्य हनुमंत ठाकरे यांनी संत गाडगे महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला ते म्हणाले संत गाडगे महाराज म्हणजे एक चालता बोलता विद्यापीठ एकही वर्ग नव शिकलेला माणूस परंतु आज त्या माणसाच्या नावाने अमरावती विद्यापीठ आहे गाडगे महाराज अंगावर चिंध्या पांघरलेला माणूस हातामध्ये फटका वाचा डोक्यामध्ये मडक्याचे खापर असा वेश अज्ञानाची तुला रे खंत डेबुजी झाला थोर संत गाडगे महाराज म्हणजे जिवंत विद्यापीठ कारण त्यांनी शिक्षणावर भर दिला ते म्हणूत एक वेळ उपाशी रहा पण मुलाले शिकवा घरचा टाट मोडा पण मुलाले शिकवा बायकोला लुगडं कमी भावाचे घ्या पण मुलाला शिकवा असा शिक्षणाविषयी कास धरणारे संत गाडगे महाराज यांनी वयाच्या ८० व्या वर्षापर्यंत गावागावात जाऊन समाज प्रबोधन केले. त्यामध्ये अंधश्रद्धा निर्मूलन ,पशुहत्या बंदी , ग्राम स्वच्छता व्यसनमुक्ती अशासारख्या अनेक गोष्टींना आळा घालण्यासाठी त्यांनी आपल्या जीवाची रान केले. शेवटी २० डिसेंबर रोजी पेढी नदीच्या तीरावर महानिर्वाण झाले .या भारतभूमी मधला संत मुकुटमणी श्री संत गाडगे महाराज यांची जीवन यात्रा संपली. तरीसुद्धा आज ६९ वर्षे झाली तरी त्यांच्या नावाने अनेक धर्मशाळा ,अनेक शाळा महाविद्यालय ,अनेक गोशाळा, आजही सुरू आहे ,जणू त्यांचे दर्शन घेतल्यावर गाडगे महाराज आहेत असा भास होतो. म्हणून आपण या महान संताला विनम्र अभिवादन करूया आणि त्यांचे कार्य सहभाग घेऊन संत गाडगे महाराजांनी सांगितली दशसूत्री आपल्या जीवनात अंगीकारून सांगितलेला मंत्र आपण घेऊन आपलं जीवन जगूया हा संदेश ग्रामगीताचार्य हनुमंत ठाकरे यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केला. या कार्यक्रमाला गावातील सर्व गुरुदेव प्रेमी गुरुदेव सेवा मंडळ कर्मयोगी फाउंडेशन ,मोक्षधाम समितीचे सर्व सदस्य यांचे विशेष सहकार्य लाभले.विशेष म्हणजे या कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन नागेश लुटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले .कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रवंदनेने केला.

# विश्वशांती एवं मानवकल्याण हेतू कान्यकुब्ज ब्राह्मण मंडल द्वारा १ जनवरी को नवचण्डी यज्ञ समारोह




**अमरावती -** मंडळाने जय परशुरामच्या घोषणेसह आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांच्या मालिकेत, कन्याकुब्ज ब्राह्मण मंडळ आणि महिला मंडळ अमरावती ३१-१२-२०२५ आणि ०१-०१- २०२६ रोजी आयोजित करतील. माँ अंबे-एकवीरा, भगवान परशुराम आणि महाकाली माता शक्तीपीठाच्या शक्तीपीठाधीश्वर शक्ती महाराज यांच्या आशीर्वादाने जागतिक शांतता आणि मानव कल्याणासाठी नवचंडी यज्ञ आयोजित करण्यात येत आहे. 'मंगल कलश यात्रा शनिवार, ३१ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ४:०० वाजता गांधी चौक, अमरावती येथील कन्याकुब्ज ब्राह्मण संकुल येथून निघेल आणि महाकाली माता शक्तीपीठ काली माता मंदिराकडे जाईल. कार्यक्रमात नवचंडी पूर्व पूजा आणि संरक्षकांकडून संकल्प समाविष्ट आहे. ०१-०१- २०२६ रोजी सकाळी ६ वाजता, शक्तिपीठाधिश्वर १००८ शक्ती महाराजांच्या आदेशानुसार आणि उपस्थितीत नवचंडी यज्ञ आणि शक्तिपाठ सुरू होईल. अर्पण आणि महाप्रसादानंतर यज्ञाची समाप्ती होईल. समितीने यज्ञ सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी मोठ्या संख्येने इच्छुक भाविकांना आणि समुदायातील सदस्यांना आमंत्रित केले आहे. अमरावतीचा ब्राह्मण समुदाय हा उपक्रम सुरू ठेवत आहे आणि चांगले काम करत आहे. त्यामुळे अमरावतीतील रहिवाशांकडून या कार्यक्रमाचे कौतुक केले जात आहे. हा नवचंडी यज्ञ जागतिक शांती आणि मानवी कल्याणासाठी करण्यात आला आहे. महिला पुढाकार घेत असल्याने, ब्राह्मण समाजाबाहेरील मान्यवरांनाही यात सामील केले जात आहे. मंडळाने अमरावती भागातील सर्व ब्राह्मण बंधू आणि भगिनींना दान, अन्नदान, श्रमदान, बौद्धिक आणि तार्किक मार्गदर्शन करण्याचे आवाहन केले आहे. या कार्यक्रमात सर्व कार्यकारिणी सदस्य, समाजातील ज्येष्ठ आणि माजी पदाधिकारी आणि तरुण पुरुष आणि महिला मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहेत. विशेष संपर्कासाठी, मंडळ अध्यक्षांचा संपर्क क्रमांक ९४२२१५७७९७ आहे. कन्याकुब्ज ब्राह्मणांसह सनातनी समुदायाच्या सर्व सदस्यांचे या पवित्र कार्यक्रमात मनापासून स्वागत आहे. नवचंडी यज्ञ विधीचा मूळ उद्देश मानवी कल्याणाद्वारे जागतिक शांती आहे, कृपया प्रत्येक सनातनी महान व्यक्तीला सहभागी करून घ्या, ही एक विशेष प्रार्थना आहे.

# उन्हाळी २०२५ गुणवत्ता यादीत गो. से. महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्या विद्यार्थिनींचे उज्ज्वल यश



**खामगाव -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या उन्हाळी २०२५ परीक्षेची अलीकडेच जाहीर झालेली गुणवत्ता (मेरिट) यादीत गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथील वाणिज्य व व्यवस्थापन विभागातील एम.कॉम.च्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या गुणवत्ता यादीत सुजाता दुरडे हिने ७ वा क्रमांक, तर संजना सिसोदिया हिने ९ वा क्रमांक प्राप्त करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेत मानाचा तुरा खोवला आहे. या यशाबद्दल महाविद्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात दोन्ही विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. सुभाषजी बोबडे, सचिव डॉ. प्रशांतजी बोबडे, प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर तसेच वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे विभागप्रमुख डॉ. डी. एन. व्यास यांच्या हस्ते विद्यार्थिनींना गौरविण्यात आले. या प्रसंगी प्राध्यापकवृंदाने विद्यार्थिनींच्या मेहनतीचे व शिस्तबद्ध अभ्यासाचे कौतुक केले. महाविद्यालयाने विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत सातत्याने स्थान मिळविण्याची परंपरा कायम ठेवली असून ही बाब संस्थेसाठी अभिमानास्पद असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमास वाणिज्य व व्यवस्थापन विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम वाणिज्य अध्ययन मंडळ (कॉमर्स स्टडी सर्कल) च्या विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे आयोजित केला होता. या यशाचे श्रेय विद्यार्थिनींनी महाविद्यालय, मार्गदर्शक प्राध्यापकवृंद आणि पालकांना दिले असून, भविष्यातही अशीच यशस्वी कामगिरी करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रा. डॉ. मोहम्मद रागीब देशमुख यांनी दिली आहे.

# मनपात शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जयंती साजरी



**अमरावती -** शनिवार दिनांक २७ डिसेंबर,२०२५ रोजी शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जयंती निमित्य शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर यांचे हस्ते डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे प्रतिमेस हारार्पण महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे करण्यात आले.

जनमाध्यम न्यूज अॅण्ड पब्लिकेशन प्रा.लि. च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वे पुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ११०
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2017-2020

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@ymail.com

**तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय**

क्र. रामाक्र/१९/MRC-81/पिंपळखुटा मोठा/२०२५-२०२६

**जाहीरनामा**

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **हारुन युसूफ शेख**, रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायतला करण्यास आदेश मिळण्याबाबत याकार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.पिंपळखुटा मोठा येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व ईतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय पिंपळखुटा मोठा येथे स्वतःचे जन्म दि.**२६.११.१९५५** रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**दि.२६.१२.२०२५** शिक्का **स्वाक्षरी/-**
**तहसीलदार, मोर्शी**

**जाहीर नोटीस**

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.७८८/२०२५ ने.ता.२२.०१.२०२६

**अर्जदार -** १. श्रीमती अलका राजेंद्रपंत देशमुख,
वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.शिरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार-** **निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे पती नामे **राजेंद्र नागोराव देशमुख** हे दि.**१९.०७.२०२३** रोजी **शिरखेड**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदाराचा मुलगा नामे **मुकेश राजेंद्र देशमुख** हा अविवाहीत असतांना दिनांक **१६.११.२०२१** रोजी डिस्ट्रीक्ट सिव्हील हॉस्पीटल, अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झालेला आहे. तसेच अर्जदराचा दुसरा मुलगा नामे **निलेश राजेंद्रपंत देशमुख** हा सुध्दा अविवाहीत असतांना दिनांक **२४.०५.२०१९ रोजी शिरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती** येथे मयत झालेला आहे. वरील अर्जदाराशिवाय त्याला ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक /१२/२०२५

आदेशानुसार,
शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय**

क्र. रामाक्र/२८/MRC-81/रिध्दपूर/२०२५-२०२६

**जाहीरनामा**

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **जावेद बेग ईस्माईल बेग**, रा.**रिध्दपूर**, ता.मोर्शी यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायतला करण्यास आदेश मिळण्याबाबत याकार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.**रिध्दपूर** येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व ईतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय **रिध्दपूर** येथे स्वतःचे जन्म दि.**२१.०६.१९८२** रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसांचे** आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**दि.** शिक्का **स्वाक्षरी/-**
**तहसीलदार, मोर्शी**

## संक्षिप्त



### मनपाची प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणीची मोहिम

**अमरावती**-महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव व सहाय्यक आयुक्त मनोज शहाळे (झोन क्र. ५) यांच्या निर्देशानुसार झोन क्र. ५ अंतर्गत येणाऱ्या भाजीबाजारातील जवाहर गेट परिसर व चित्रा चौक परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणीची विशेष मोहिम राबविण्यात आली.या मोहिमेदरम्यान एकूण १२ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान अनेक आस्थापनांमध्ये ५१ मायक्रोनपेक्षा जास्त जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले. तसेच एका आस्थापनामध्ये प्रतिबंधित प्लास्टिक आढळून आल्याने संबंधित आस्थापनावर नियमानुसार कारवाई करण्यात आली.या कारवाईअंतर्गत एकूण ५,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला.सदर मोहिमेमध्ये प्लास्टिक निर्मूलन नोडल अधिकारी विनोद टांक, स्वच्छता निरीक्षक सचिन सैनी, दर्शन देशमुख, मिथून चावरे व अजिंक्य जवंजाळ हे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### कस्तुराबाई जैन विद्यालयात गाडगेबाबा पुण्यतिथी

**शिराळा**-महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा व्दारा संचालित कस्तुराबाई जैन विद्यालय शिराळा येथे कर्मयोगी संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी करण्यात आली. सर्व प्रथम संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले.तदनंतर वर्ग व परिसर स्वच्छता करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी फलकाव्दारे स्वच्छतेचा संदेश देवुन गावातुन रॅली काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा यांच्या जिवन चरित्र्यावर भाषणे दिली.यावेळी कस्तुराबाई जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन देशमुख, शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### विकास विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन

**अंजनगाव बारी**-नजीकच्या पार्डी देवी येथील विकास विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. २२ डिसेंबर रोजी स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी न्यू ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. मधुकरराव पिसे होते. उद्घाटन शिक्षणाधिकारी (निरंतर) सुरेश वाघमारे यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष सुरेश भेंडे, सचिव पांडुरंग बांडाबुचे, सदस्य मधुकरराव ढेंबरे, संतोष ठाकरे, तसेच प्राचार्य संतोष परांजपे उपस्थित होते. संचालन मंगेश धरमखेले आणि आभार प्रदर्शन विजय कुलसंगे यांनी केले. याप्रसंगी गीतगायन स्पर्धा झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अक्षय मेश्राम होते. प्रमुख अतिथी म्हणून सुनील पाटील, माजी सरपंच रक्षणा सरदार, सुमन मेश्राम उपस्थित होत्या. २३ डिसेंबर रोजी सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध नृत्य, नाटक सादर केले. अध्यक्षस्थानी सुधीर जगताप होते. प्रेमनाथ लाहाबर आणि सविता भस्मे या उपस्थित होत्या. २४ डिसेंबर रोजी 'शेतकरी सुखी व्हावा' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा पोलिस पाटील नितीन बेंडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. २५ डिसेंबर रोजी समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश भेंडे होत. अनिता गवई, डॉ.जीवन सवाई, गजानन ठाकरे, प्रा. सतीश राऊत, प्राचार्य संतोष परांजपे, अनिता राऊत, संघपाल सरदार, शिक्षक प्रवीण शेलोकर, गोपाळ डांबरे, मंगेश धरमखेले, विजय कुलसंगे, किरण मानकर, मेघाली सावळे, संगीता शेलोकर, पल्लवी तसरे, मोहन धोटे, गौरी पिंगळे आदी उपस्थित होते.

### सावंगा गुरव शेत शिवारातून दुचाकी लंपास

**नांदगाव खंडेश्वर**-पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सावंगा गुरव येथून शेतशिवारात उभी असलेली दुचाकी कुणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार सावंगा गुरव येथील विजय दामोदर चव्हाण यांनी नांदगाव खंडेश्वर पोलीस स्टेशनला दाखल केली आहे. दाखल तक्रारीवरून नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून प्रकरण तपासात घेतले आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

### शिवीगाळ करून काठीने मारहाण

**चांदूर रेल्वे**-देवगाव येथे अतुल रामगुडे यांनी प्रणय नेहारे व भरत कुयटे यांच्या विरोधात पोलिसात तक्रार दिली आहे. अतुल हा वाढदिवसाचा कार्यक्रम आटपून घरी जात असताना प्रणय व गणेशाने अतुल याला कसल्या धांदलयाचालू आहे,चल निघ इथून असे म्हणून शिवीगाळ केले. घरी जाऊन अतुलने गणेशला फोन करून विचारले दादा काय झाले तर गणेश ने पुन्हा शिवीगाळ केली व काठयाघेऊन अतुलच्या घराबाहेर आल्यावर आईला अतुलला व लहान भावाला मारहाण केली अशी तक्रार तळेगाव दशासर पोलिसात दिला.

### जुन्या वादातून मारहाण

**मोशी**-शिरखेड पोलीस स्टेशन हद्दीत येत असलेल्या नेर पिंगळाई येथे, जुन्या वादातून झालेल्या भांडणात शिवीगाळ करीत लाथा भुक्क्यांनी मारून लाकडी काठीने जखमी केल्याची घटना घडली आहे. याबाबतीत नेरपिंगळाई येथील प्रकाश नथुजी श्रीखंडे यांनी शिरखेड पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली आहे. शिरखेड पोलिसांनी विलास चतुर्भुज यांचेवर गुन्हा दाखल करून तपासात घेतला आहे.

# रोडग्यांचा नैवेद्य, हंडीतील वांग्याच्या भाजीचा दरवळ

**अमरावती/का.प्र.**

श्री क्षेत्र बहिरम येथे पारंपरिक विधी, भक्तीभाव आणि उत्साहाच्या वातावरणात श्री बहिरम बुवांच्या यात्रेला भव्य सुरुवात झाली. पहाटे श्री बहिरम बुवांच्या मूर्तीला शेंदूर, दूध, दही, मध व लोण्याचा विधीवत अभिषेक करण्यात आला. त्यानंतर होमपूजा, अर्चना, यज्ञातील पूर्णाहुती व महाआरती झाली. रोडग्यांचा नैवेद्य अर्पण करून संस्थान अध्यक्षांच्या शंखनाद व नारळफोडीने यात्रोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्र व मध्यप्रदेशातून हजारो भाविक बहिरम बुवांच्या दर्शनासाठी येथे दाखल होत आहेत. विदर्भातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेली ही यात्रा



बहिरम यात्रेला सुरुवात

सलग सव्वा महिना चालते. या काळात दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळतात. बहिरम यात्रेचे खास आकर्षण म्हणजे हंडीतील वांग्याची भाजी आणि गरमागरम रोडगे. दर्शनानंतर या महाप्रसादाचा आस्वाद घेण्यासाठी भाविकांची विशेष गर्दी असते. मांसाहारी भाविकांसाठी मातीच्या हंडीत पारंपरिक पद्धतीने शिजवलेले मटणही उपलब्ध असते. मुरमुरे, रेवडी व फुटाणे हा बहिरम बुवांचा प्रसाद असून यात्रेदरम्यान किमान चार लाखांहून अधिक नारळ फोडले जातात.

यात्रेदरम्यान नागरिक लिलावातून जागा घेऊन राहुट्या उभारतात. यंदा दहा लाखांहून अधिक भाविक येण्याचा अंदाज असून मंदिर प्रशासनाने व्यापक तयारी केली आहे.

महिला व पुरुष भाविकांसाठी दर्शन रांगा स्वतंत्र ठेवण्यात आल्या आहेत. यात्रोत्सव शांततेत पार पडावा यासाठी जिल्हा ग्रामीण पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी चोख बंदोबस्त ठेवून आहेत.सुमारे ३५० वर्षांची परंपरा लाभलेली बहिरम यात्रा ही सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या लोकदैवताची श्रद्धास्थळी आहे. सुमारे १२५ फूट उंचीवर असलेले बहिरम बुवांचे मंदिर, शेजारी गणेशाची भव्य मूर्ती व बाहेर असलेला दगडी नंदी परिसराचे सौंदर्य वाढवतात. दोन-अडीच एकरात पसरलेला मंदिर परिसर आणि खालील १०० एकरांतील यात्रास्थळ भाविकांनी फुलून गेले आहे. काळानुरूप बदल स्वीकारत ही यात्रा आजही श्रद्धा, परंपरा आणि भक्तीचा अनोखा संगम ठरते.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून चांदूर रेल्वे तालुक्यातील ग्रामपंचायत घुईखेड येथे विविध लोकहिताच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या अभियानाअंतर्गत ग्राम स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले असून, नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली.

याच कालावधीत संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महिलांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करून त्यांना विविध प्रशिक्षण योजनांची माहिती देण्यात आली.

शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली, तर पशुधनाच्या आरोग्यासाठी पशुवैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. तसेच आयुष्यमान भारत आरोग्य कार्ड



काढण्याची प्रक्रिया राबविण्यात आली आणि महिलांची स्वतंत्र आरोग्य तपासणीही करण्यात आली.

या सर्व उपक्रमांची पाहणी करण्यासाठी चांदूर रेल्वे पंचायत समितीचे नोडल अधिकारी मल्ला तोडकर (कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती), गजानन गिरे (कृषी अधिकारी, पंचायत समिती चांदूर रेल्वे), नरेंद्र मेहरे (विस्तार अधिकारी कृषी), रमेश मेश्राम (विस्तार अधिकारी) तसेच राहुल गवई यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी यांनी ग्रामपंचायत घुईखेडला भेट देऊन कामांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या नवीन व सुधारित योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या पाहणीप्रसंगी सरपंच वर्षलता हेमंत जाधव, अर्चना शिलनकर (ग्राम सदस्य), संगीता गिरूळकर (ग्राम सदस्य) तसेच ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे गावाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# श्री.साईबाबा विद्यालयात कला उत्सव २०२५ उदघाट्न

**अमरावती/का.प्र.**

श्री साईबाबा विद्यालय व श्रीमती इंदिराबाई पालेकर प्राथमिक शाळा साईनगर यांच्या संयुक्त विद्यमाने कला उत्सव २०२५ चे उदघाट्न मोठ्या उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती अनुभा कुंटे, उद्घाटक राजेश हेडा सचिव, शाळा समिती, प्रमुख अतिथी दिपाली ब्राह्मणे, विद्यार्थी सुरक्षा भरोसा सेल, उद्धवराव किटकुले सेवानिवृत्त मुख्याध्यापक, मुख्याध्यापक राजेश टावरी, श्रीमती झंवर सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्री नारायणदास लड्डा हायस्कूल, पर्यवेक्षक आशिष पसारकर, अजय सांगळुदकर मुख्याध्यापक श्रीमती इंदिराबाई पालेकर मराठी प्राथमिक शाळा, यांच्या हस्ते शाळेचे आराध्य दैवत श्री साईबाबा व सरस्वती माता यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. यानंतर



उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक राजेश टावरी यांनी केले यानंतर कार्यक्रमाचे उदघाटक राजेश हेडा यांनी मार्गदर्शन केले व कला उत्सव २०२५ उदघाटन झाल्याचे घोषणा केली व विद्यालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले यानंतर प्रमुख अतिथी दिपाली ब्राह्मणे यांनी विद्यार्थ्यांनी सुरक्षाविषयक कोणती काळजी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष अनुभा कुंटे व इतर मान्यवरांनी आपल्या भाषणातून शाळेच्या उत्तरोत्तर होणाऱ्या प्रगतीबद्दल अभिनंदन केले व कला उत्सवाकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. कार्यक्रमाचे संचालन श्रीमती रेणुका देऊळकर यांनी तर आभार प्रदर्शन आरती मंत्री यांनी केले. यानंतर विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उद्धवराव किटकुले सेवानिवृत्त मुख्याध्यापक यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून राजेश हेडा सचिव शाळा समिती, सुरेश साबू नवनिर्वाचित माहेश्वरी पंचायत समिती सरपंच व सचिव अशोक जाजू, केंद्रप्रमुख विनय वानखडे, पर्यवेक्षक आशिष पसारकर उपस्थित होते. याप्रसंगी नवनिर्वाचित सुरेशजी साबू व अशोक जाजू यांचा शाल श्रीफळ व पुष्प देऊन विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. कला उत्सव दरम्यान आयोजित विविध स्पर्धेतील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षीस देऊन गौरविण्यात आले. मान्यवरांनी आपल्या भाषणातून शाळेत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाबद्दल प्रशंसा केली व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन ज्ञानेश्वर टाले यांनी तर आभार प्रदर्शन विजय मानकर यांनी केले. कला उत्सवाचा शेवट विद्यार्थ्यांच्या स्नेहभोजनाने झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

### यादव देशमूख महाविद्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख जयंती



**तिवसा**-श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारा संचालित यादव देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,तिवसा येथे शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंती निमित्त महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना देण्यासाठी व विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी विविध क्रीडा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विज्ञान प्रदर्शनी, ग्रंथ प्रदर्शनी, तसेच गीतगायन, प्रश्नमंजुषा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाला उदघाट्क म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद रमेश बोके उपस्थित होते, तर अध्यक्ष म्हणून यादव देशमूख, प्राचार्य डॉ. हेमंत देशमूख होते. प्रमुख अतिथी म्हणून नगर पंचायत चे विरोधी पक्ष नेते अनिल थुल, नगरसेवक आशिष ढोले, नगरसेवक नरेश लांडगे, श्रीराम नागरी पथ संस्थेचे अध्यक्ष विक्रम जोशी,जगदीश माहोरे, पत्रकार हेमंत निखाडे, पत्रकार संदीप दाहाट, इंग्रजी विभाग प्रमुख श्याम गेडाम व इंदापवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन संगीत विभाग प्रमुख विनोद खडसे यांनी केले तर आभार सुमित सोनोने यांनी मानले. महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका, तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### विद्यापीठात शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची जयंती



**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था व नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, डॉ. भगवान फाळके, उद्यान अधीक्षक अनिल घोम, मुंबई विद्यापीठातील भाषा अभ्यासक व संशोधक डॉ. दिपक पवार तसेच विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारा मोठया संख्येने उपस्थित होते. संचालन व शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्याबद्दल माहिती केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे यांनी दिली.

# मासोद अंगणवाडी केंद्रात 'नवचेतना बाल मेळावा'

**अमरावती/का.प्र.**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प अमरावती ग्रामीण आणि प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती जिल्ह्यातील अमरावती तालुक्यातील पिंपळखुटा बीट मधील मासोद येथील अंगणवाडी केंद्रात 'नवचेतना बाल मेळावा' उत्साहात पार पडला. शून्य ते तीन वयोगटातील बालकांना त्यांच्या वयानुसार आनंददायी वातावरणात शिकण्याची संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे हा या मेळाव्याच्या मुख्य उद्देश होता. आपल्या मुलांचा सर्वांगीण विकास कसा करायचा यावेळी पालकांना घरी



उपलब्ध साहित्यातून बुद्धीला चालना देणाऱ्या क्रियाकृती कशा करून घ्यावे याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या शुभारंभ जिल्हा परिषद अमरावती जिल्हा कार्यक्रम अधिकारी विलास मरसाळे (डेप्युटी महिला बाल कल्याण,) यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी, राजेंद्र खंडारे सरपंच, अण्णा ऊर्फ गिरीश चौधरी (संस्थापक - जाणता युवा संघटना) बाल विकास प्रकल्प अधिकारी भीमराव वानखेडे, विस्तार अधिकारी गाडेकर, प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनच्या अमरावती विभागीय प्रमुख विद्या कांचनवाडकर, मनीष इंगोले ग्रामसेवक, यांच्यासह, सर्व ग्रामपंचायत सदस्य विविध विभागाचे अधिकारी मोठ्या संख्येने अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होत्या. बीट पर्यवेक्षिका पुष्पा चिखलकर यांच्या मार्गदर्शनात या उपक्रमाची सुरुवात ही बाब मेळाव्याच्या यशापर्यंत पोहोचली.यावेळी ग्रामपंचायत सदस्य चंचर्ल मोकलकर, ग्रामपंचायत सचिव मनिष इंगोले,हरीश चौधरी, तुळशीदास लाड, महिला मंडळी मोठ्या प्रमाणात होत्या तसेच मासोद येथील माता पालक राखी मोकलकर, निर्की कोसरे यांनी मेळाव्याबदल मनोगत व्यक्त केले याप्रसंगी रेखा धर्माळे, रेखा वाघ, पिवळखूटा सर्कल मधील सर्व अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, महिला माता, मुले मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# श्री शिवाजी कृषी महाविद्यालय व अमरावती गार्डन क्लबतर्फे पुष्प प्रदर्शनी

**अमरावती/क्रा.प्र.**

शिक्षणमहर्षी व कृषिरत्न डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांच्या वतीने आयोजित तसेच अमरावती गार्डन क्लब यांच्या सहकार्याने पुष्प प्रदर्शनी–२०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. ही प्रदर्शनी बॅडमिंटन हॉल, शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे भरविण्यात आली आहे.

पुष्प प्रदर्शनीचे उद्घाटन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. उद्घाटक म्हणून निर्मलाताई देशमुख, कार्यकारी सदस्या, इंडियन रोज फेडरेशन तसेच माजी अध्यक्षा व सल्लागार, अमरावती गार्डन क्लब उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून हेमंत काळमेघ, कार्यकारिणी सदस्य, शिक्षण संस्था अमरावती व समिती अध्यक्ष, पुष्प प्रदर्शनी–२०२५ यांनी उपस्थिती दर्शविली. सामाजिक कार्यकर्त्या प्रेरणाताई इंगोले यांचीही प्रमुख उपस्थिती



होती. उद्घाटन सोहळ्याला चंद्रशेखर देशमुख, प्राचार्य, शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय व अध्यक्ष, अमरावती गार्डन क्लब, डॉ. नंदकिशोर चिखले, प्राचार्य, शिवाजी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, अभय ढोबळे, प्राचार्य, रूरल इन्स्टिट्यूट, राजेश खाडे, प्राचार्य, जनता कृषी महाविद्यालय तसेच डॉ. समीर लांडे, प्राचार्य, शिवाजी कृषी महाविद्यालय व सचिव, आयोजन समिती, पुष्प प्रदर्शनी–२०२५ यांची उपस्थिती होती.ही पुष्प प्रदर्शनी एकूण १४ विविध गटांमध्ये विभागण्यात आली असून यामध्ये विविध फुलझाडे, कॅक्टस, बोन्साय, कोलीयस, हँगिंग बास्केट यांसह आकर्षक व माहितीपूर्ण मांडणी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसह नागरिकांसाठी ही प्रदर्शनी ज्ञानवर्धक ठरत आहे.पुष्प प्रदर्शनी यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शक मानवेंद्र देशमुख, प्रभारी पुष्प प्रदर्शनी केशव ठाकूर, विभागप्रमुख उद्यानविद्या विभाग, डॉ. प्रकाश साबळे, सचिव पुष्प प्रदर्शनी तसेच डॉ. सुनील इंगळे, डॉ. मीना कोचे, मनोज नवरे, संजय वानखडे व प्रमोद वानखडे यांनी विशेष परिश्रम घेतले.ही पुष्प प्रदर्शनी २७ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ९ वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुली राहणार असून अमरावती शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन प्राचार्य डॉ. समीर लांडे यांनी केले आहे.

# भाऊसाहेब राष्ट्रानिमिर्तीत योगदान देणारे एक 'नेशन बिल्डर' -ना. देवेंद्र फडणवीस

## शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव देशमुख जयंती उत्सव साजरा



**अमरावती/प्रतिनिधीः** – स्वातंत्र्यानंतर राष्ट्रानिमिर्तीत सातत्याने योगदान देणाऱ्यापैकी शिक्षण महर्षी कृषिरत्न डॉ.पंजाबराव देशमुख हे एक 'नेशन बिल्डर' असून 'फूड फॉर ऑल' ची मुहूर्तमेढ भाऊसाहेबांनी रोवली आहे त्यामुळे भाऊसाहेबांनी दाखविलेल्या शाश्वत मार्गाने चालण्याचाच आमचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी केले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या भव्य परिसरात आयोजित शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त आयोजित मुख्य समारंभात ते बोलत होते.संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर पद्मभूषण डॉ.विजय भटकर हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते.केंद्रीय आयुष मंत्री ना.प्रतापराव जाधव हे प्रमुख अतिथी म्हणून, महाराष्ट्राचे आदिवासी विकास मंत्री ना.डॉ.अशोक उईके, शालेय शिक्षण राज्यमंत्री ना.पंकज भोयर, राज्यसभा सदस्य खा.डॉ.अनिल बोंडे, अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, आमदार सौ.सुलभाताई खोडके, आ.परिणय फुके, आ.संजय कुटे, आ.राजेश वानखडे, आ.प्रवीण तायडे, आ.उमेश यावलकर, माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे, आ.आ.प्रताप अडसड यावेळी अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे दिला जाणारा 'डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार' ना.देवेंद्र फडणवीस यांना पद्मभूषण डॉ.विजय भटकर यांच्या हस्ते देण्यात आला.आजपर्यंत मिळालेल्या देशविदेशातील पुरस्कारापेक्षा हा पुरस्कार अधिक महत्त्वाचा असल्याचे फडणवीस सटकला उत्तर देताना म्हणाले.आपल्या भाषणातून भाऊसाहेबांच्या कार्याचा समग्र आढावा घेऊन मुख्यमंत्री म्हणाले की, मानवतेला नाकारणाऱ्या लोकांना नाकारण्याचे काम डॉ.पंजाबराव देशमुख यांनी केले आणि आपल्या कृतीतून व व्यक्तिगत जीवनात त्या विरुद्ध बंड पुकारले. कर्जलवाद बिल आणून शेतकऱ्यांना सावकारी पाशातून बाहेर काढण्याचे काम सर्वप्रथम भाऊसाहेबांनी केले. पहिल्या जागतिक कृषी प्रदर्शनीच्या माध्यमातून देश विदेशातील ☞(पान २ वर)





■ शेतकऱ्यांचा आत्मसन्मान वाढविण्याचे कार्य भाऊसाहेबांनी केले, या संस्थेला समाज घडविण्याचे एक प्रभावी माध्यम बनविले असून संस्थेने भाऊसाहेबांच्या विचारांना सातत्याने कृतीत उतरविण्याचे काम केले आहे व सामाजिक बांधिलकी जपली आहे, असे केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव म्हणाले. पद्मभूषण डॉ.विजय भटकर यांनी आपल्या भाषणातून संस्थेच्या कार्याचा गौरव करून आपल्या उपक्रमाची माहिती दिली व पुरस्कारासाठी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले.शालेय शिक्षण राज्यमंत्री ना.पंकज भोयर यांचेही यावेळी भाषण झाले.

**ना.प्रतापराव जाधव**

■ शिक्षण आणि कृषी या दोन्ही विषयात भाऊसाहेबांच्या विचारांशी बांधिलकी ठेवून संस्था विविध उपक्रम राबवीत आहे असे सांगून कार्यक्रमाचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविक व अध्यक्षीय भाषणातून संस्थेच्या कार्याची माहिती दिली.. - **संस्थाध्यक्ष हर्षवर्धन देशमुख**

### ■ विविध पुरस्कार

या कार्यक्रमात मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना 'डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.पाच लक्ष रुपये, मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप असून मुख्यमंत्र्यांनी या पुरस्काराची रक्कम संस्थेला भेट दिली. मानपत्राचे वाचन संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ यांनी केले. या कार्यक्रमात अकोला जिल्ह्यातील शेलू येथील श्रीमती सुवर्णा अरविंद गावंडे यांना शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्काराने, अकोला जिल्ह्यातील दानापूर येथील गोपाल किसनराव येऊल यांना शेतकरी नेते शरद जोशी उत्कृष्ट पुरुष शेतकरी पुरस्काराने, वाशिम जिल्ह्यातील खरोळा येथील दीपक सुभाष वारकड यांना डॉ.पंजाबराव देशमुख शेतीनिष्ठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.प्राचार्य डॉ.हनुमंत लुंगे यांनी दिलेल्या दाननिधीतून कस्तुरबा शाळेतील कु.भक्ती गजानन चौधरी हिला 'डॉ.पंजाबराव देशमुख क्रीडारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# भाजपा-शिंदे युती नक्कीच

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**अमरावती/प्रतिनिधी:-** राज्यात महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने भाजप-शिंदेसेनेत जागा वाटपावर सकारात्मक चर्चा झाली आहे. युती नक्कीच होईल, कोणतीही अडचण नाही, अशी स्पष्टोक्ती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २७ डिसेंबर रोजी शहरातील प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्यावतीने मुख्यमंत्री फडणवीस यांना डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दरम्यान त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीतील जागावाटपाबाबत अत्यंत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. जागा वाटपासंदर्भात अतिशय सकारात्मक चर्चा सुरू आहे. मला अपेक्षा आहे की लवकरच हा तिढा सुटेल. युती नक्की होईल आणि कोणतीही अडचण होणार नाही, असे फडणवीस म्हणाले. पुढे ते ☞(पान २ वर)

### ■ आज पालकमंत्रीच्या उपस्थितीत बैठक

भाजपा सेना युती संदर्भात आज २८ डिसेंबर रोजी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत दोन्ही पक्षांची महत्त्वपूर्ण बैठक बोलावली आहे. या बैठकीमध्ये युती संदर्भात अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. यासंदर्भात माजी खासदार आनंदराव अडसूळ यांच्याशी चर्चा केली जाणार आहे. त्यानंतर युती आणि जागा वाटपावर अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. या बैठकीनंतर फुलं फायनल होणार की युती होणार की नाही होणार. रविवारी झालेल्या बैठकीनंतर युतीबद्दल होणाऱ्या चर्चेला विराम लागणार. त्यामुळे या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

# ट्रकाखाली दबल्याने तरुणाचा मृत्यू , एक गंभीर

## बहिरम मार्गावरील पालाजवळ अपघात



**परतवाडा** - चांदूर बाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा पोलीस ठाणे हद्दीत रेती तस्करीच्या घटना वाढलेल्या आहे. अशाच मुरूम घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टर खाली आल्याने एका तरुणाचा मृत्यू झाला तर दुसरा जखमी आहे. दिनेश नारायण पानसे (३२,खुमाई जि. बैतूल, मध्य प्रदेश ) मृत तरुणाचे नाव आहे. माहिती नुसार शनिवारच्या सकाळी बिना रॉयल्टी ट्रॅक्टर एम एच २७ एमएल ८१२१ हा शिरजगाव कसबा ठाणा क्षेत्रातील बहिरम जवळ मुरूम घेऊन जात होता. पाला ते शिरजगाव मार्गावर दगडामुळे ट्रॅक्टर पलटला आणि त्याखाली दबून चालक दिनेश पानसे याचा मृत्यू झाला ☞(पान २ वर)

# ज्या शहरांमध्ये चांगल्या आर्थिक संस्था असतात या शहरांचा चांगला विकास होतो - देवेंद्र फडणवीस

## महात्मा फुले बँकेच्या रौप्य महोत्सव व नवीन प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा संपन्न





**अमरावती** - महात्मा फुले अर्बन को-ऑपरेटिव बँक लिमिटेड अमरावती या बँकेच्या रौप्य महोत्सव सांगता समारंभ, नवीन प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा व स्मृतिगंध स्मरणिकेचे विमोचनाचा समारंभ दिनांक २७/१२/२०२५ रोजी सिल्वर स्टार सेलिब्रेशन हॉल रहाटगाव, अमरावती येथे संपन्न झाला. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माननीय नामदार देवेंद्रजी फडणवीस उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे अध्यक्ष माननीय श्री. दिलीपराव लोखंडे यांनी केले. या कार्यक्रमांमध्ये बँकेने मुख्यमंत्री सहायता निधीकरिता रुपये ५,००,०००/- (अक्षरी - पाच लक्ष रुपये फक्त) देणगी माननीय मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केली व सामाजिक कामांमध्ये बँकेचा सहभाग नोंदवाला. या कार्यक्रमांमध्ये ☞(पान २ वर)

# मार्डीकर, हरणे, मेश्राम, पांडे दंपतीने भरले नामांकन

## तिसऱ्या दिवशी उचलले ३१६ अर्ज - महानगरपालिका निवडणूक



**अमरावती/प्रतिनिधी:-** महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीची नामांकन प्रक्रिया सुरू झालेली आहे.नामांकनाच्या चौथ्या दिवशी आज शनिवार २७ डिसेंबर रोजी ३१६ इच्छुकांनी अर्ज उचलले. सहा पेक्षा अधिक उमेदवारांनी नामांकन दाखल केले. शनिवारी माजी नगरसेवक अविनाश मार्डीकर, माजी उपमहापौर प्रमोद पांडे , मेघा हरणे, अंजली पांडे, साहेबराव दादू मेश्राम, लक्ष्मण गौर आदिने नामांकन दाखल केला. मंगळवार पासून नामांकन प्रक्रिया सुरू झालेली आहे. दोन दिवस आता नामांकनासाठी उरलेले आहे. चार दिवसात २७०४ इच्छुकांनी अर्ज उचलले आहे. महानगरपालिका च्या वतीने ७ ठिकाणी नामांकन उचलण्याची आणि दाखल करण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सुरुवाती पासूनच अर्ज उचलण्याला इच्छुकांचा ☞(पान २ वर)

**नामांकनाची स्थिती**

उत्तर झोन १ रामपुरी कॅम्प-४३
नया तहसील कार्यालय-४१
मध्य झोन २ राजापेठ-५१
पूर्व झोन ३ दस्तूर नगर-३०
शिक्षा विभाग अंबापेठ-६८
जुना तहसील कार्यालय-३२
दक्षिण झोन चार बडनेरा-५१
एकूण -३१६

# रुग्णालयाच्या प्रसाधन गृहात आढळला मृत अर्भक

## परिसरात उडाली खळबळ



**वर्धा/प्रतिनिधीः** - स्थानिक जिल्हा सामान्य रुग्णालयात आज शनिवार २७ डिसेंबरच्या सकाळी महिला प्रसाधनगृहात मृत अर्भक आढळून आल्याने खळबळ माजलीय. हा अर्भक पुरुष जातीचा आहे की महिला जातीचा हे अद्याप कळू शकले नसून त्याला डीएनए साठी पाठविण्यात आले आहे. अहवालनंतर नेमके कारण समजू शकणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास स्त्री रोग विभागाच्या बाजूला असलेल्या महिला प्रसाधन गृहात सफाई कर्मचारी गेले असता, तेथे मोठ्या प्रमाणात रक्त सांडलेले पाहायला मिळाले. पाहणी केली असता तेथीलच निळ्या रंगाच्या डस्ट बिनमध्ये एक मृत अवस्थेत अर्भक आढळून आले. घटनेची माहिती ☞(पान २ वर)

# तडीपार सराईत गुन्हेगाराकडून देशी कट्टा जप्त, दोन जिवंत काडतूस जप्त

## नवसारी रिंग रोडवर गुन्हे शाखेची धडक कारवाई



**अमरावती/प्रतिनिधी:-** शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अमरावती शहर पोलिसांनी अवैध शस्त्र बाळगणाऱ्या व तडीपार गुन्हेगारांविरोधात कारवाई तीव्र केली असून, शहर गुन्हे शाखेने तडीपार असलेल्या एका सराईत गुन्हेगाराला देशी कट्टा व दोन जिवंत काडतूसांसह ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे गुन्हेगारी वर्तुळात खळबळ उडाली आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशानुसार शहरात अवैध अंमली पदार्थ विक्री, तडीपार इसम व घातक शस्त्रे बाळगणाऱ्यांविरोधात प्रभावी मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पथकाने गुप्त बातमीदाराच्या माहितीवरून ही कारवाई केली. २६ डिसेंबर २०२५ रोजी गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा येथून दोन वर्षांसाठी तडीपार असलेला शेख सुफीयान शेख इलीयास हा इसम पोलीस स्टेशन गाडगेनगर हद्दीतील नवसारी रिंग रोडवरील लकी जिनिंग फॅक्टरी परिसरात कंबरेला अग्नीशस्त्र लावून संशयास्पद अवस्थेत उभा आहे. या माहितीवर तातडीने हालचाल करत गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी जाऊन मोठ्या शिताफीने त्याला ताब्यात घेतले. ☞(पान २ वर)

# अनैतिक संशयातून भाजी विक्रेत्याचा गळा आवळून अंत

## दगड बांधून विहिरीत लपवला मृतदेह



**धारणी /प्रतिनिधी:-** - अनैतिक संबंधांच्या संशयाने माणूस किती क्रूर होऊ शकतो, याचे धक्कादायक उदाहरण धारणी तालुक्यात उघडकीस आले आहे. बेपत्ता भाजी विक्रेत्याचा गळा आवळून खून करण्यात आला आणि खुनानंतर मृतदेहाला दगड बांधून विहिरीत फेकून देत पुरावे नष्ट करण्याचा सुनियोजित प्रयत्न करण्यात आला. पोलिस तपासात या थरारक हत्याकांडाचा उलगडा झाला असून, आरोपी सध्या पोलिस कोठडीत आहे. धारणीतील वार्ड क्रमांक १३ येथील रहिवासी चिंटू ऊर्फ मोहम्मद जुबेर अब्दुल जहूर (वय ३९) हा १९ डिसेंबर रोजी मोटारसायकलवरून घराबाहेर पडला होता. मात्र तो परतलाच नाही. दोन दिवसांच्या शोधानंतर कुटुंबीयांनी धारणी पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. दरम्यान, २४ डिसेंबर रोजी धारणी–हरिसाल मार्गावरील उतावली शिवारातील एका शेतातील विहिरीत कुजलेल्या ☞(पान २ वर)

# राकंपा अजित पवार गटाचा स्वबळा चा नारा

## आमदार संजय खोडके यांची स्पष्टोक्ती



**अमरावती /प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीसाठी राजकीय पक्ष सज्ज आहे. अजून पर्यंत युती आणि आघाडी संदर्भात कोणतीही घोषणा नाही झाली आहे. अशात राकंपा अजित पवार गटाने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. आमदार संजय खोडके यांनी सांगितले की, राकंपा ही निवडणूक स्वबळावर लढणार आहे. पूर्वी पार्टी युती साठी सज्ज होती पण पदाधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेनंतर आता स्वबलावर लढण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. पार्टी ७० ते ७५ जागेवर निवडणूक लढणार आहे. संजय खोडके यांनी सांगितले की, शिंदे सेना सह कोणत्याही पक्षासोबत आम्ही युती नाही करणार आहे. बुधवारी दिवसभर झालेल्या चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आलेला आहे.शिवसेना शिंदे सेना कडून युतीसाठी फोन आला होता. आम्ही पूर्वी यासाठी सज्ज होतो,पण पदाधिकाऱ्यांची झालेल्या चर्चा नंतर स्वबलाचा निर्णय घेण्यात आला. ७० चे ७५ जागेवर आम्ही निवडणूक लढणार आहे. आता पार्टी कोणासोबतही युती नाही करणार. या संदर्भात आम्ही माजी खासदार संजय खोडके यांना आपली ☞(पान २ वर)

# श्री हव्याप्र मंडळाच्या चार विद्यार्थिनींची ऑल इंडिया युनिव्हर्सिटी योगासन स्पर्धेसाठी निवड

## पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांनी दिल्या शुभेच्छा : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची संघ जाहीर



कु. जागृती पटले कु. आयुषी पांडे कु. प्रणाली जगताप कु. दीपाली राऊत

**अमरावती /प्रतिनिधीः-** दि. ५ ते ९ जानेवारी २०२६ दरम्यान स्वामी विवेकानंद योग अनुसंधान संस्था, बेंगळुरू येथे होणाऱ्या ऑल इंडिया युनिव्हर्सिटी योगासन चॅम्पियनशिपसाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची संघनिवड नुकताच जाहीर करण्यात आला. या सहा सदस्यीय महिला संघामध्ये श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचलित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथील चार विद्यार्थिनींची निवड झाल्याने ही निवड संस्थेसाठी आनंदाची बाब ठरली आहे. निवड झालेल्या विद्यार्थिनींमध्ये जागृती पटले (एम.ए. योगशास्त्र – प्रथम वर्ष), प्रणाली जगताप (बी.पी.एड. – प्रथम वर्ष), आयुसी ☞(पान २ वर)



# सारांश

जनमाध्यम — एक प्रतिष्ठित सवय

❑ रविवार, २८ डिसेंबर २०२५ ❑ E-paper - www.janmadhyam.com







# तिकीट दलालांना 'तत्काळ' दणका

**भारतीय रेल्वेने तत्काळ श्रेणीतील तिकिटाच्या बुकिंग व्यवस्थेत मोठा बदल केला आहे. आता काऊंटरवर तत्काळ तिकीट काढायचे असेल तर मोबाईलवरचा ओटीपी महत्त्वाचा ठरणार आहे. यामुळे तत्काळ श्रेणीतील तिकिटाचा होणारा काळाबाजार रोखला जाईल, शिवाय पारदर्शकता वाढेल आणि गरजू प्रवाशांना त्याचा लाभ मिळेल.**

**सूर्यकांत पाठक**

अनेक एजंट एकाच वेळी अनेक तिकीट काढण्यासाठी बनावट नंबर आणि ओळखपत्राचा आधार घेतात. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना तत्काळ श्रेणीतील तिकीट मिळणे कठीण जाते. आता तिकीट बुक करण्यासाठी प्रवासी स्वत: हजर असणे आणि मोबाईल नंबरची पडताळणी अनिवार्य आहे. या बदलामुळे गरजू प्रवाशांना लाभ मिळेल.

भारतीय रेल्वेने तत्काळ श्रेणीतील तिकिटाच्या बुकिंग व्यवस्थेत मोठा बदल केला आहे. आता काऊंटरवर तत्काळ तिकीट काढायचे असेल तर मोबाईलवरचा ओटीपी महत्त्वाचा आहे. या ओटीपीद्वारे प्रवाशाची पडताळणी केली जाणार आहे. ओटीपी नमूद केल्यानंतरच तिकीट निश्चित होईल. रेल्वेच्या मते ओटीपीचे बंधन घातल्याने तत्काळ श्रेणीतील तिकिटाचा होणारा काळाबाजार रोखला जाईल, शिवाय पारदर्शकता वाढेल आणि गरजू प्रवाशांना त्याचा लाभ मिळेल. नवीन प्रणाली प्रायोगिक पातळीवर राबविण्यात आली आणि ती यशस्वीही ठरली आहे.

रेल्वेच्या मते, गेल्या काही वर्षांत तत्काळ तिकिटाचा काळाबाजार वाढला होता. तसेच बनावट बुकिंगच्या पारीदेखील वाढल्या आहेत. अनेक एजंट एकाच वेळी अनेक तिकीट काढण्यासाठी बनावट नंबर आणि ओळखपत्राचा आधार घेतात.

त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना तत्काळ श्रेणीतील तिकीट मिळणे कठीण जाते. आता ओटीपीतून पडताळणी होत असल्याने प्रत्येक तिकीट बुक करण्यासाठी प्रवासी स्वत: हजर असणे आणि मोबाईल नंबरची पडताळणी अनिवार्य झाली आहे. अर्थात ही व्यवस्था ऑनलाईन तिकिटाच्या आरक्षणात लागू केलेली आहे आणि त्यात आता तत्काळ श्रेणीची भर पडली आहे.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या बदलाला मान्यता देताना रेल्वेची आरक्षण व्यवस्था आणि तिकीट प्रणाली संपूर्णपणे पारदर्शक, सुरक्षित व प्रवासीपुरक करण्याचा यामागचा उद्देश असल्याचे म्हटले आहे. जुलै २०२५ मध्ये ऑनलाइन तत्काळ तिकिटासाठी आधारआधारित ऑथेंटिकेशन लागू करण्यात आले आणि त्यामुळे बनावट आयडीचा वापर बऱ्यापैकी कमी झाला.

त्यानंतर ऑक्टोबर २०२५ मध्ये जनरल रिझर्व्हेशन सिस्टममध्ये ओटीपी व्हेरिफिकेशनला जोडले.

**प्रायोगिक तत्त्वावर चाचणी यशस्वी**

रेल्वेकडून मिळालेल्या माहितीनुसार, १७ नोव्हेंबर २०२५ रोजी त्याची प्रायोगिक चाचणी घेण्यात आली. त्यानुसार देशभरातील ५२ रेल्वेगाडयांत ओटीपीआधारित तत्काळ तिकीट प्रणाली लागू केली. या चाचणीचे परिणाम सकारात्मक आले. रेल्वे कर्मचाऱ्याच्या मते, प्रायोगिक चाचणीच्या वेळी बनावट बुकिंगच्या प्रमाणात सुमारे ४० टक्के घट झाली आणि गरजू प्रवाशांना तिकीट मिळण्याच्या प्रमाणात वाढ झाली.



**नवी व्यवस्था कशी असेल**

नव्या व्यवस्थेनुसार, एखादा प्रवासी तत्काळ तिकिटासाठी काऊंटरवर दाखल होईल तेव्हा तिकीट पी करणारा कर्मचारी प्रवाशाचा मोबाईल क्रमांक घेईल. त्यानंतर प्रवाशाच्या मोबाईल नंबरवर सहा अंकी ओटीपी क्रमांक पाठवेल. ओटीपीची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर तिकीट जारी केले जाईल. प्रवाशाने चुकीचा मोबाईल क्रमांक दिल्यास, ओटीपी येत नसेल तर तिकीट दिले जाणार नाही.


**तिकीट प्रणाली सुरक्षित करणे**

रेल्वेने म्हटल्यानुसार, ओटीपी पडताळणी प्रणाली लागू करण्याचा उद्देश हा प्रवाशांच्या कटकटीत वाढ करण्याचा नाही. उलट तिकीट व्यवस्था सुरक्षित करण्याचा आहे. डिजिटल प्राढियेचा स्वीकार केल्याने आगामी काळात तिकीट बुकिंग आणि प्रवाशाची खातरजमा या दोन्ही गोष्टी सहज होतील. रेल्वेच्या दाव्यानुसार या बदलामुळे गरजू प्रवाशांना लाभ मिळेल. कारण या व्यवस्थेत तिकीट खरेदीत पारदर्शकता राहणार असून बुकिंगमध्ये कोणतीही फसवाफसवी नसेल. प्रवाशांनी मोबाईल ाढमांक अपडेट ठेवण्याचे आवाहन रेल्वे मंत्रालयाकडून करण्यात आले आहे. तसेच तिकीट बुकिंगच्या काळात मोबाईल जवळ बाळगण्याचाही सल्ला दिला आहे. जर मोबाईल नंबर चुकीचा किंवा जुना असेल तर ओटीपी मिळणार नाही. परिणामी तिकीट मिळणार नाही. तसेच ज्येष्ठ किंवा विशेष प्रवाशांसाठी रेल्वे कर्मचाऱ्यांकडून मदत केली जाईल. कोणताही गरजू प्रवासी तिकिटापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल. या सुधारणांमुळे रेल्वेने या वर्षाच्या अखेरीस संपूर्ण देशात तिकिटिंग सिस्टमचे डिजिटायजेशन करण्याचे ध्येय आहे.प्रवाशांना सुविधा देण्यासाठी रेल्वेने आरक्षण तक्ता तयार करण्याच्या कालावधीतदेखील बदल केला आहे. आतापर्यंत बहुतांश रेल्वेचा चार्ट त्यांच्या त्यांच्या निर्धारित प्रस्थान वेळेच्या चार तास अगोदर जारी केला जात असे. या कारणामुळे प्रतीक्षा यादीत अडकलेले प्रवाशांना शेवटच्या क्षणापर्यंत तिकीट कन्फर्म झाले आहे की नाही, हे कळत नसायचे. प्रवास काही तासांवर आलेला असताना तिकिटाची स्थिती कळत असे आणि अशा वेळी त्यांची प्रवासाची योजना बारगळत असे. त्यामुळे रेल्वेने आता चार्ट जारी करण्याची वेळ चार तासांवरून आठ तासांवर नेली आहे. त्यामुळे प्रतीक्षा यादीत असलेल्या प्रवाशांना तिकिटाची शेवटची स्थिती समजल्यानंतर प्रवासात बदल करण्यास पुरेसा वेळ मिळेल. जर एखाद्याचे तिकीट कन्फर्म झाले नाही तर तो अन्य रेल्वेचे तिकीट काढू शकेल किंवा बस किंवा विमानातून प्रवास करू शकेल.

# गणित केवळ तर्कशुद्ध गणना नव्हे

गणित म्हणजे नक्की काय? संख्या म्हणजे काय? आणि अनुभवाशिवाय गणित कसे उभे राहते? हे प्रश्न प्रथमदर्शनी कठीण वाटतात, पण थोडा विचार केला तर ते प्रश्न कठीण नसतात हे आपल्या लक्षात येईल. गणित म्हणजे केवळ आकड्यांच्या बेरीज-वजाबाकीचे शास्त्र नाही; तर ते त्याहून खूप व्यापक आहे. आपण म्हणतो ते 'तीन', 'दहा', 'शंभर' हे आकडे स्वतः वस्तू नसतात. 'तीन' हा आकडा दिसत नाही; दिसतात त्या तीन वस्तू. उदा. तीन सफरचंद, सात दगड आपण त्या वस्तूंच्या मोजणीतून 'तीन' म्हणजे किती, 'सात' म्हणजे किती, ही कल्पना तयार करतो. म्हणजे संख्या ही प्रत्यक्ष जगात दिसणारी वस्तू नाही, पण मनाने बनवलेली एक समजूत, एक अमूर्त कल्पना आहे.

गणित अशाच अनेक अमूर्त कल्पनांचा वापर करून उभे राहते. गणिताविषयी विचार करताना सर्वप्रथम समोर येतो तो त्याच्या स्वरूपाचा प्रश्न. गणित हे केवळ संख्यांविषयीचे शास्त्र आहे अशी सोपी व्याख्या अपुरी ठरते, कारण संख्या हा गणिताचा एक भाग असून संपूर्ण गणिताची व्याप्ती त्यापेक्षा फार मोठी आहे. संख्या स्वतः इंद्रियगोचर वस्तू नसतात; आपल्याला त्यांचे प्रत्यक्ष संवेदन होत नाही. म्हणून गणित हे मूलत: अशा अमूर्त संकल्पनांचे, त्यांच्यातील संबंधांचे आणि त्या संबंधांतील सुसंगततेचे शास्त्र आहे असे म्हणावे लागते. या अमूर्तपणामुळेच गणित अनुभवावर अवलंबून नसते, तर ते



'निगमी' म्हणजेच न्यायनिष्ठ, कडक तर्काच्या आधारावर उभे राहते.

गणितातील निगमनपद्धतीची सुरुवात मूलविधाने म्हणजे गृहीतके यांच्यापासून होते. ही मूलविधाने आपण थेट इंद्रियानुभवावर आधारून घेत नाही. ती आपण 'मान्य' करतो, कारण त्यांत विरोधाभास नाही, त्यांच्यापासून निघणारी तर्कसंगत बांधणी शक्य आहे आणि ती संपूर्ण प्रणाली एकसंध ठेवतात. याचा अर्थ ती 'प्रमाण' आहेत म्हणून स्वीकारलेली नसतात, तर ती गृहितके असून त्यांचा योग्य तर्काने विस्तार करता येतो हेच त्यांचे प्रामाण्य. मूलविधानांचे प्रामाण्य समजण्याचा निकष म्हणजे अंतर्गत सुसंगती, विरोधाभासाचा अभाव आणि तर्कशुद्ध सुसंगती असतात.

मूलविधानांपासून एखादा सिद्धान्त 'अनिवार्यपणे' निष्पन्न होतो का हे आपल्याला शुद्ध तर्कविचाराने कळते; अनुभवापेक्षा विचारशक्ती इथे निर्णायक ठरते. म्हणजे गणिताची पद्धत अनुभवावर आधारित नसते. गणितातील सिद्धान्त हे 'मी पाहिले त्यामुळे खरे' असे नसून 'मी तर्काने सिद्ध केले त्यामुळे खरे' असे असते. यासाठी गणित काही मूलविधाने ठरवते.

# पुण्याची सायकल संस्कृती लोप पावतेय

कधीकाळी 'सायकलींचे शहर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्याची आजची परिस्थिती फार वेगळी आहे. आज बदलती जीवनशैली आणि वाढत्या वाहनव्यवहारामुळे वेगळी दिशा घेताना दिसते. सायकल आणि पुणे ही जणू एकमेकांची ओळख होती. गरिबापासून श्रीमंतापर्यंत, विद्यार्थी ते नोकरदार, सर्वांसाठी सायकल हा दैनंदिन वाहतुकीचा अविभाज्य भाग होता. फर्ग्युसन कॉलेज रोड, लक्ष्मी रोड, कर्वे रोड, शिवाजीनगरच्या गल्लीबोळांतून सायकलींचा संचार हे पुण्याचे वैशिष्ट्य मानले जायचे. मात्र गेल्या दशकभरात ही ओळख कमी होत चालली आहे. सायकली आता फक्त व्यायाम किंवा स्पर्धेपुरत्याच उरल्या आहेत. त्यामुळे आपण पॅडेलकडून पेट्रोलकडे चाललो आहोत.

सायकल संस्कृतीचा इतिहास एक सुवर्णकाळ होता. पुण्यातील शिक्षणसंस्था, कमी अंतरांची शहरी रचना आणि हवामान या तीन घटकांनी सायकल वापर वाढवण्यास मोठा हातभार लावला होता. १९७० ते १९९० या काळात पुण्यातील विद्यार्थी आणि कामगार वर्गासाठी सायकल हे मुख्य वाहन होते. खर्च कमी, देखभाल कमी आणि वाहतुकीतील सहजता यामुळे सायकलींना मोठी मागणी होती. एक काळ असा होता की, पुण्यातील मुख्य रस्त्यांवर मोटार वाहनांपेक्षा सायकली जास्त दिसत. 'सायकलस्टँड फुल्ल' हे शिक्षणसंस्थांचे सामान्य दृश्य होते. सुमारे २००० नंतर पुण्याची ओळख आयटी हब म्हणून निर्माण झाली. शहराचा विस्तार वेगाने झाला आणि त्यानुसार प्रवासाचे अंतरही वाढले. यातून मोटारसायकली आणि कार यांचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला. आज पुण्यातील रस्त्यावर उतरणाऱ्या वाहनांची संख्या एवढी वाढली आहे की, सायकलप्रेमींना जागाच उरलेली नाही असे भासू लागते. मोटारसायकलची कर्जव्यवस्था सोपी, पेट्रोल दरातील चढ-उतार असूनही वाढलेली क्षमता आणि वेळेची बचत या कारणांमुळे सायकलचा वापर कमी होत गेला.

# मानसिक स्वास्थ्याशिवाय समाजाचा विकास अशक्यच !

**डॉ. बाळ राक्षसे**



एकविसाव्या शतकात 'शाश्वत विकास' ही परवलीची संज्ञा झाली आहे. संयुक्त राष्ट्र संघाने २०१५ मध्ये जगातील सर्व देशांसाठी १७ शाश्वत विकास उद्दिष्टे निर्धारित केली आहेत जी २०३० पर्यंत सर्व देशांना गाठायची आहेत. ही सर्व उद्दिष्टे अत्यंत सर्वसमावेशक आहेत. गरिबी, भूक यापासून मुक्तता, आरोग्य आणि खुशाली, गुणवत्तापूर्ण शिक्षण, सर्वप्रकारच्या विषमतेचे उच्चाटन, शाश्वत आणि शुद्ध ऊर्जा, पाणी आणि जमिनीवरील जीवनमान, इ. आपण आणि जभरातील सर्व देश जर असा शाश्वत विकास साधू शकलो तर खरोखर सर्व प्राणिमात्रांचे सुख आणि समाधान साध्य करता येईल. यासाठी मानसशास्त्राचे नेमके काय योगदान आसावे जेणेकरून देशातील लोकांचे मानसिक आरोग्य चांगले आणि शाश्वत राहील हे पाहणे महत्वाचे आहे.

या अनुषंगाने भारतातील मानसिक आरोग्य स्थितीचा वस्तुनिष्ठ आढावा घेतल्यास आपण नेमके कुठे आहोत, संशोधनाची दिशा काय असावी, कोणत्या प्रकारची धोरणे राबवावी लागतील, यासाठी कुठल्या पायाभूत सुविधा निर्माण कराव्या लागतील, शैक्षणिक संस्थांचा आणि समुदायाचा सहभाग कसा असावा या बाबी स्पष्ट होतील.

भारताच्या लोकसंख्येचा विचार केल्यास जगाच्या लोकसंख्येच्या १८ टक्के लोकसंख्या भारतात राहते. लोकसंख्याशास्त्राच्या दृष्टीने पाहिल्यास भारत हा तरुणांचा देश आहे असे म्हटले जाते. म्हणजे उत्पादन करू शकणाऱ्या लोकांची संख्या ही सर्वाधिक आहे. पण याची दुसरी काळी बाजू म्हणजे केवळ मानसिक आरोग्याच्या समस्येमुळे २०१२ ते २०३० या कालावधीत १.३ ट्रिलियन डॉलस इतके प्रचंड आर्थिक नुकसान देशाचे होत आहे, होणार आहे. निमहांस या बंगलोरस्थित संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात देशातील १०.६ टक्के वयस्क कुठल्या ना कुठल्या मानसिक आजाराने त्रस्त आहेत. यात शहरी लोकांचे प्रमाण ग्रामीण भागांतील लोकांपेक्षा जास्त आहे. १३.७ टक्के लोकांना आयुष्यात कुठल्यातरी टप्प्यावर मानसिक विकार जडतो. मनोविकार झालेल्यांपैकी ७० ते ९२ टक्के लोकांना कधी उपचारच मिळत नाहीत. जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषाप्रमाणे एक लाख लोकसंख्येसाठी तीन मानोविकार तज्ज्ञांची आवश्यकता असताना आपल्याकडे केवळ ०.७५ मनोविकार तज्ज्ञ आहेत.

मानसिक आरोग्य धोरणतील मैलाचे दगड

देशात पहिल्यांदा १९८२ मध्ये राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमाची सुरुवात झाली. तज्ज्ञ मनुष्यबळाची कमतरता भरून काढण्यासाठी मानसिक आरोग्याला सर्वसाधारण आरोग्य आस्थापनाशी जोडून सर्वसामान्यांना सुलभ उपचार कसे मिळतील हे पाहण्यात आले. त्यानंतर १९८४ मध्ये राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम सुरू करण्यात आला. यात मानसिक आरोग्यसेवेचे विकेंद्रीकरण करून, समुदाय आधारित सेवा उपलब्ध करून देणे, मानसिक आजाराचे वेळेत निदान होणे आणि उपचार सुनिश्चित करणे यावर भर देण्यात आला. त्यानंतर निमहांस अ?ॅक्ट २०१२, राईट्स ऑफ पर्सन विथ डिसॅबिलिटी अ?ॅक्ट २०१६, हे देखील महत्वाचे टप्पे आहेत. आणि शेवटी २०१७ मध्ये 'नॅशनल मेंटल हेल्थकेअर अ?ॅक्ट' आणि 'नॅशनल मेंटल हेल्थ पोलिसी' लागू झाली. याच बरोबर 'टेलिमानस' सारखे उपक्रम राबवून शासनाने काही साकारात्म पावले उचलून मानसिक आरोग्याचे महत्व अधोरेखित केले. मानसशास्त्रातील तरुण संशोधकांनी हे मुळातून आणि जाणीवपूर्वक अभ्यासले पाहिजे.

**आरोग्य व्यवस्थेपुढील आव्हाने आणि त्रुटी**

**१. आरोग्य सेवा पुरविणाऱ्या ज्या संस्था आहेत-** उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालय यांच्यात बऱ्याचदा समन्वयाचा अभाव दिसून येतो. तसेच संदर्भ सेवा अपुरे मनुष्यबळ, तज्ज्ञ डॉक्टर्सचा अभाव, मानसोपचारातील तज्ज्ञ नर्सेस आणि समुपदेशकांचा अभाव हेदेखील खूप मोठे आव्हान आहे.

२. उपकेंद्रांवरील आधिकाऱ्यांचे प्रशिक्षण होणे गरजेचे आहे.

३. आजही आपल्याकडे मनोविकारांकडे सामान्य आजार म्हणून पहिले जात नाही. या बाबत प्रचंड अज्ञान, लोकलज्जा आणि नकारात्मक दृष्टी दिसून येते.

४. संशोधकांनी धोरणातील त्रुटी शोधून ते निदर्शनास आणून द्यावयास हवेत.

**शिक्षण क्षेत्राची भूमिका**

महाविद्यालय, विद्यापीठातील प्राध्यापक आणि संशोधक हे सर्व या मानसिक आरोग्याच्या अभियानात परिवर्तनाचे अग्रदूत म्हणून पुढील प्रकारची कामे करू शकतात.

**१. ज्ञान निर्मिती:** भारत हा एक मोठा खंडप्राय देश आहे. प्रत्येक भौगोलिक क्षेत्रातील रूढी, प्रथा, परंपरा, सामाजिक चालीरीती या भिन्न स्वरूपाच्या आहेत. त्याला अनुसरून संशोधनाच्या दिशा निश्चित करणे गरजेचे आहे. उदा. कोकणातील शेतकरी हा विदर्भातील शेतकऱ्यांच्या तुलनेने गरीब आहे. पण विदर्भात आणि मराठवाड्यातच शेतकरी आत्महत्या जास्त का होतात हा सामाजिक मानसशात्राचा विषय ठरावा.

**२. समाजात काम करणारे** मानसशात्रज्ञांचे आणि सामाजिक कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण घेऊन एक सशक्त मानव संसाधनाची निर्मिती करणे.

**३. समुदायाचा सहभाग वाढविणे.** विद्यार्थी, प्राध्यापक आणि संशोधकांनी महाविद्यालयाच्या भिंती ओलांडून समुदायामध्ये क्षेत्र अभ्यास करून यात समुदायाला सहभागी करून घ्यायला हवे.

**४. पदवी आणि पदव्युत्तर** अभ्यासक्रम तयार करताना पारंपरिक मानसशास्त्रीय दृष्टिकोनांचे निर्वसाहतीकरण करणे गरजेचे आहे. बऱ्याचदा मानसशास्त्रातील सिद्धांत आणि संकल्पना जशाच्या तशा उचलल्या जातात. पण त्याचे भारतीयकरण करणे गरजेचे आहे. तसेच केवळ मानसशास्त्रीय संकल्पनांवर भर न देता इतर सामाजिक शास्त्रे, पब्लिक हेल्थ आणि शिक्षण शास्त्रातील संकल्पना वापरून आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनातून सामाजिक समस्यांकडे पाहावे लागेल.


५. मानसिक आरोग्य अभियानाची व्याप्ती समुदाय आधिरीत असली पाहिजे. महाविद्यालयांनी आणि विद्यापीठांनी गाव आणि शहर पातळीवर सातत्यपूर्ण भेटी द्याव्यात, शाळेत, बचत गटांच्या माध्यमातून, ग्रामसभेत छोटे छोटे उपक्रम राबवावेत. त्यांना माहिती देऊन छोटे संशोधन प्रकल्प, गटचर्चा या सारखे उपक्रम राबवावेत. केस स्टडीज कराव्यात. मानसशात्र विभागात मानसिक आरोग्यासंबंधी असणारे गैरसमज छोट्या नाटिका बसवून गावात त्या सादर कराव्यात. आपल्या महाविद्यालयात आणि विद्यापीठाच्या विभागात एखादी टेलिकौन्सेलिंग सेवा सुरू करता येते का ते पाहावे. हे केवळ उदाहरणादाखल आहे. असे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम शैक्षणिक संस्थांमध्ये राबवता येऊ शकतील.

गाव पातळीवर आणि शहरात असणाऱ्या आशा सेविका, अंगणवाडी ताई यांच्या माध्यमातून देखील राबवता येऊ शकतात.

# ७ तासांची झोप, व्यायाम ,योग्य डाएट असे अनिल कपूर यांचे रुटीन

अनिल कपूर बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेते आहेत. ते त्यांच्या कामासह त्यांच्या फिटनेसमुळेही चर्चेत असतात. अनेकदा त्यांना मुलाखतींमध्येही याबद्दल विचारलं जातं. सोशल मीडियावरही ते खूप सक्रिय असून, त्यामार्फत ते व्यायाम करतानाचे फोटो व व्हिडीओ पोस्ट करीत असतात.

आज अनिल कपूर यांच्या वाढदिवसानिमित्त आपण त्यांच्या फिटनेसबद्दलची माहिती जाणून घेणार आहोत. त्यांच्या फिटनेसचं रहस्य काय आहे, त्याचं वेळापत्रक कसं असतं, ते काय खातात याबद्दल जाणून घेऊष्ठ अनिल कपूर यांच्या वर्कआउट रुटीनमध्ये कार्डिओ, वेट ट्रेनिंग व फंक्शनल ट्रेनिंगचा समावेश आहे. ते अनेकदा धावतानाचे, सायकल चालवितानाचे व्हिडीओ शेअर करीत असतात.



अनिल कपूर त्यांच्या वर्कआउटची सुरुवात कार्डिओपासून करतात. त्यामध्ये ते धावतात, सायकल चालवतात. अनिल कपूर एकही दिवस व्यायाम करणं टाळत नाहीत. 'पिंकव्हिला'च्या वृत्तानुसार अनिल कपूर यांनी एकदा फिटनेस रुटीन शेअर करताना सांगितलेलं की, ते पूर्ण ७ तासांची झोप घेतात. त्यानंतर ते डार्ट खेळतात. त्यामुळे त्यांना लक्ष केंद्रित करण्यात मदत होते. डार्ट खेळल्यामुळे दिवसाची सुरुवात चांगली होते, ऊर्जा मिळते, असे त्यांना वाटते.

अनिल कपूर यांच्यासाठी फिटनेसला खूप महत्त्व!

'जनसत्ता'च्या वृत्तानुसार अनिल कपूर म्हणाले, 'माझ्यासाठी फिटनेस म्हणजे स्वत:बद्दल छान वाटायला हवं. कॅमेऱ्यासमोर काम करण्यासाठी फिट राहणं गरजेचं आहे. माझे ट्रेनर माझ्यासाठी जो प्लॅन बनवतात, त्यानुसार मी गोष्टी करतो. मला असं वाटतं की, बऱ्याचदा वर्कआउटपेक्षा डाएट जास्त महत्त्वाचा असतो. जेवण चवीसाठी नाही, तर आरोग्य आणि स्टॅमिना वाढवण्यासाठी असलं पाहिजे.' अनिल कपूर सकाळी ६ वाजता उठतात आणि वॉर्मअपसाठी १० मिनिटं कार्डिओ करतात. त्यासह आठवड्यातील तीन दिवस जिममध्ये जाऊन वर्कआउट करतात. बाकी दिवशी आऊटडोअर ठिकाणी व्यायाम करतात. त्यांना कायम स्लिम राहायचं आहे. कारण- अशी शरीरयष्टी असलेली व्यक्ती कोणतीही भूमिका साकारू शकते. असं त्यांना वाटतं.

उल्लेख केलेल्या माध्यमाच्या वृत्तानुसार सोनम कपूर अनिल यांच्याबद्दल एकदा म्हणालेली की, तिचे बाबा खूप कडक शिस्तीचे आहेत आणि ते दारूला हातही लावत नाहीत आणि धूम्रपानही करत नाहीत. ती म्हणालेली, 'खरं सांगायचं तर माझ्या आईनं मुंबईत ट्रेनिंग जिम सुरू केलं होतं. ही खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. म्हणूनच माझी आई आधीपासूनच खूप स्वस्थ आहे आणि त्याबद्दल ती खूप शिस्तप्रिय आहे. माझे बाबासुद्धा असेच आहेत; पण कधीतरी ते मजा-मस्ती करणं पसंत करतात.



# आलिया भट्ट व अनन्या पांडेपेक्षाही जास्त मानधन घेते श्रद्धा कपूर

श्रद्धा कपूर बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. सोशल मीडियावरही अभिनेत्रीचा चाहता वर्ग खूप मोठा आहे. सध्या ती 'इठा' या तिच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. अशातच तिचे वडील अभिनेते शक्ती कपूर यांनी तिच्याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे.

श्रद्धा कपूर अनेकदा शक्ती कपूर यांच्याबरोबरचे फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावरून शेअर करीत असते. अशातच आता त्यांनी श्रद्धा कपूर बॉलीवूडमधील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक आहे, असं म्हटलं आहे. श्रद्धा कपूरच्या 'स्त्री २' या चित्रपटाने जगभरात ८५० कोटींहून अधिक कमाई केली. इतकी कमाई करणारा तो पहिला महिलाभिमुख चित्रपट ठरला. गेल्या वर्षी श्रद्धा कपूरचा बॉक्स ऑफिसवर दबदबा असल्याचं पाहायला मिळालं. पण, असं असतानाही अभिनेत्री फार कमी चित्रपटांत काम करते, अशीही चर्चा होऊ लागली अशातच याबद्दल शक्ती कपूर यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

श्रद्धा कपूरने २०१० साली अमिताभ बच्चन यांच्या 'तीन पत्ती' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. त्यानंतर तिने फार कमी कालावधीत 'एक विलन', 'आशिकी २' यांसारख्या चित्रपटातून प्रेक्षकांची मन जिंकली. पण इंडस्ट्रीत १५ वर्षं झालेली असतानाही श्रद्धानं फक्त १८ चित्रपटांमध्ये काम केलं आहे. तर तिच्यानंतर दोन-तीन वर्षांनी डेब्यू केलेल्या आलिया भट्टनं २० चित्रपटांमध्ये काम केलं आहे. तर २०१९ मध्ये बॉलीवूडमध्ये पदार्पण केलेल्या अनन्या पांडेनं १२हून अधिक चित्रपटांत काम केलं आहे. त्या मानानं श्रद्धा फार कमी चित्रपटांमधून झळकली. पण अनेक जण तिचे वडील शक्ती कपूर यांच्या इमेजमुळे श्रद्धाला फार काम मिळत नसल्याचं म्हणताना दिसतात. आता शक्ती कपूर यांनी स्वतः याबद्दल सांगितलं आहे.

'द पावरफुल ह्युमन्स'ला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी श्रद्धाबद्दल सांगितलं आहे. लेकीबद्दल शक्ती कपूर म्हणाले, 'ती फार मोजक्या चित्रपटांत काम करते. चांगल्या कथांची निवड करून, ती त्यासाठी तिच्या पिढीतल्या अभिनेत्रींपेक्षाही जास्त मानधन घेते.'

यावेळी त्यांनी आलिया भट्ट व अनन्या पांडे यांचा उल्लेख केला. शक्ती कपूर पुढे हसत हसत श्रद्धा कपूरला काम मिळत नाही या अफवांबद्दल प्रतिक्रिया देत म्हणाले, 'ती वर्षाला एक ते दोनच चित्रपटांमध्ये काम करते.'

श्रद्धा कपूरच्या स्वभावाबद्दल शक्ती कपूर पुढे म्हणाले, 'ती खूप हट्टी आहे आणि तिला जे मनापासून वाटतं, तेच ती करते. तिची काही तत्त्वं आहेत आणि ती सगळी तत्त्वं पाळते'. लेकीबरोबरच्या नात्याबद्दल शक्ती कपूर पुढे म्हणाले, 'आमचं नातं खूप छान आहे.

आम्ही अनेकदा गप्पा मारतो, भांडतो, चित्रपट पाहतो आणि बाहेर फिरायलाही जातो. मला तिचा खूप अभिमान आहे. ती उत्तम अभिनेत्री आहे. ती खूप छान काम करते.'

श्रद्धा कपूर एका चित्रपटासाठी १५ कोटी रुपये इतकं मानधन आकारते. तर, 'स्त्री २'साठी तिने १७ कोटी इतके मानधन घेतले होतं. तर चित्रपटाला होणाऱ्या नफ्यातही तिचा हिस्सा असल्याचं म्हटलं गेले.

# 'पुष्पा 2' नंतर अल्लू अर्जुन साकारणार ही भूमिका

अल्लू अर्जुन पुष्पा २ या चित्रपटानंतर काय करणार हा त्याच्या चाहत्यांना प्रश्न पडला होता. या प्रश्नाचे उत्तर आता मिळाले आहे. मिळालेल्या बातमीनुसार अल्लू अर्जुन आगामी बिग बजेट चित्रपटामध्ये काम करणार असल्याचे आता समोर आले आहे. अल्लू अर्जुन आणि प्रसिद्ध चित्रपट निर्माते त्रिविक्रम श्रीनिवास पुन्हा एकदा एकत्र येत आहेत. हा त्यांचा चौथा चित्रपट एका पौराणिक कथेवर आधारीत असणार आहे. या चित्रपटामध्ये



अल्लू अर्जुन कार्तिकेय स्वामींची भूमिका साकारणार असल्याचे म्हटले जात आहे.

अल्लू अर्जुन आणि त्रिविक्रम यांच्या जोडीचा एक प्रभावी ट्रॅक रेकॉर्ड आहे.

त्यांनी एकत्रितपणे अनेक सुपरहिट आणि ब्लॉकबस्टर चित्रपट दिले आहेत. त्यांचा शेवटचा चित्रपट, अला वैकुंठपुरमुलू, दक्षिण भारतातील बॉक्स ऑफिसवर अनेक रेकॉर्ड तोडला आणि त्या काळातील सर्वात चर्चेत असलेल्या चित्रपटांपैकी एक बनला होता. सूत्रांनुसार आगामी चित्रपटाचे बजेट हे १ हजार कोटींपेक्षा अधिक असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळेच हा चित्रपट भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात महागडा आणि महत्त्वाकांक्षी पौराणिक चित्रपट म्हणून ओळखला जाईल.

या मेगा प्रोजेक्टची अधिकृत घोषणा येत्या आठवड्यात अपेक्षित आहे. या चित्रपटाचे

# 'तो अशा मुलीला डेट करतोय, जिला फक्त त्याचे पैसे हवे आहेत' -सुनीता आहुजा

गोविंदा आणि त्याची पत्नी सुनीता आहुजा वर्षभरापासून घटस्फोटाच्या अफवांमुळे चर्चेत आहेत. गोविंदाचे एका मराठी अभिनेत्रीबरोबर विवाहबाह्य संबंध आहेत, अशीसुद्धा चर्चा होती. सुनीता यांनी आता त्यांच्या पतीच्या विवाहबाह्य संबंधाबद्दल स्वत: सांगितलं आहे.



साधताना सुनीता यांनी २०२५ हे वर्ष त्यांच्यासाठी कसं गेलं याबद्दल सांगितलं आहे. सुनीता म्हणाल्या, '२०२५ माझ्यासाठी फार वाईट वर्ष होतं.' यावेळी त्यांनी गोविंदाच्या विवाहबाह्य संबंधाचा उल्लेखही केला. त्यांनी गोविंदा ज्या महिलेला डेट करीत आहे, ती अभिनेत्री नसल्याचं स्पष्ट केलं.

गोविंदाच्या विवाहबाह्य संबंधाबद्दल सुनीता आहुजांचं वक्तव्य

सुनीता याबद्दल म्हणाल्या, 'तिचं त्याच्यावर प्रेम नाहीये, तर तिला फक्त त्याचे पैसे हवे आहेत.' सुनीता यांना पुढे २०२६ मध्ये तुम्हाला कोणत्या गोष्टी बदलायच्या आहेत. असं विचारल्यानंतर त्या म्हणाल्या, 'मला गोविंदानं या सगळ्या अफवा, गोष्टींचा शेवट करावा, असं वाटतं. मला २०२६ मध्ये माझं सुखी, आनंदी कुटुंब हवं आहे.'

सुनीता यांनी पुढे सांगितलं की, गोविंदाला समजलं आहे की, त्याच्या आयुष्यात फक्त तीनच स्त्रिया महत्त्वाच्या आहेत. एक त्याची आई, दुसरी पत्नी व तिसरी त्याची मुलगी. यावेळी त्या म्हणाल्या, 'कोणालाही याव्यतिरिक्त चौथ्या स्त्रीला त्यांच्या आयुष्यात स्थान देण्याचा अधिकार नाही.' सुनीता पुढे म्हणाल्या, 'गोविंदानं त्याच्याबरोबर फक्त पैशांसाठी असणाऱ्या माणसांपासून दूर राहिलं पाहिजे.'

गोविंदाच्या पत्नी सुनीता सोशल मीडियावरही खूप सक्रिय असतात आणि त्यांचं स्वत:चं यूट्यूब चॅनेलही आहे. यावेळी त्यांनी २०२५ मध्ये नवीन चॅनेल सुरू केल्याचा आनंदही व्यक्त केला आहे.

दरम्यान, या वर्षी गणेश चतुर्थीच्या निमित्तानं गोविंदा व सुनीता एकत्र मीडियासमोर आले होते. त्यावेळी सुनीता व गोविंदा यांच्या घटस्फोटाच्या अफवा मोठ्या प्रमाणात पसरल्या होत्या. पण, त्यावेळी सुनीता, 'आम्हाला कोणीही वेगळं करू शकत नाही. गोविंदा फक्त माझा आहे आणि तो दुसऱ्या कोणाचाही नाहीये. आमच्यामध्ये काही झालं असतं, तर आज आम्ही एकत्र दिसलो असतो का?' असं म्हणाल्या होत्या.

# धुरंधरच्या यशानंतर अक्षय खन्नाचा भाव वधारला

सध्याच्या घडीला 'धुरंधर' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. चित्रपटातील अक्षय खन्नाचा स्वॅग इतका प्रभावी आहे की लोकांना त्याच्यावरून नजर हटवणे कठीण आहे. नृत्य असो किंवा दमदार संवाद असो. अक्षय खन्ना प्रत्येक फ्रेममध्ये प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. धुरंधर चित्रपटानंतर आता अक्षयचा भाव चांगलाच वधारला आहे. या चित्रपटाच्या यशामुळे चित्रपट निर्मात्यांमध्ये अक्षय चित्रपटात असायला हवा असा प्रयत्न सुरु झालेला आहे. त्यामुळे काही दिवसांपासून अक्षय खन्ना आता दृश्यम ३ या चित्रपटात दिसणार असल्याचे म्हटले जात होते. परंतु आता मात्र मिळालेल्या माहितीनुसार अक्षय खन्नाने त्याचे मानधन वाढवल्यामुळे दृश्यम ३ च्या निर्मात्यांशी त्याचे मतभेद झाले आहेत.हाती आलेल्या बातमीनुसार, अक्षय खन्नाने दृश्यम ३ या चित्रपटामधून




स्वतः माघार घेतल्याचे म्हटले जात आहे. बॉलीवूड मशीनने दिलेल्या वृत्तानुसार, धुरंधरच्या जबरदस्त यशानंतर अक्षय खन्नाने त्याच्या मानधनात लक्षणीय वाढ करण्याची मागणी केल्याचा दावा या बातमीमध्ये करण्यात आलेला आहे.

तसेच मानधना व्यतिरिक्त त्याने दृश्यम ३ मधील त्याच्या ऑनस्क्रीन लूकमध्येही महत्त्वाचे बदल करण्याची मागणी केली आहे. या मागण्यांमुळेच सध्याच्या घडीला अक्षय खन्नाचे निर्मात्यांशी मतभेद झाले आहेत. त्यामुळे त्याने चित्रपटाकडे पाठ वळवली आहे असे म्हटले जात आहे. याबाबत कोणतेही खात्रीशीर वृत्त अजून निर्मात्यांकडून आलेले नाही.

## २०२५ मध्ये प्रदर्शित झालेल्या

# 'या' वुमन सेंट्रीक सीरिज व चित्रपट




सध्या वुमन सेंट्रीक चित्रपटांचा आणि सीरिजचा ट्रेंड सुरू आहे. ओटीटीवर, चित्रपटगृहांत अशा धाटणीच्या अनेक कलाकृती प्रेक्षकांच्या भेटीला येत असतात. अशातच आता या वर्षी ओटीटीवर कोणते वुमन सेंट्रीक चित्रपट व सीरिज प्रदर्शित झाले जाणून घेऊयात.

ओटीटीवर अनेक सीरिजमध्ये महिला मध्यवर्ती भूमिकेत असल्याचं पाहायला मिळालं. यामध्ये माधुरी दीक्षितची 'मिसेस देशपांडे' ते 'डब्बा कार्टल' या सीरिजचा समावेश आहे. या यादीतील पहिलं नाव आहे 'मंडला मर्डर्स'. क्राइम-थ्रिलर या जॉनरची आवड असणाऱ्या लोकांमध्ये या सीरिजबद्दल खूप चर्चा झाली. ही एक थ्रिलर सस्पेन्स सीरिज आहे.

डब्बा कार्टेल – या सीरिजमध्ये त्या महिलांची गोष्ट दाखवण्यात आली आहे, ज्यांना कायम कमजोर समजलं जातं. पण, त्या त्यांची वेगळी ओळख तयार करतात. या सीरिजमधून सत्ता, शांती आणि राजनीतीमधूनही मिळवली जाऊ शकते.

'मिसेस' – 'मिसेस' हा चित्रपट वैवाहिक आयुष्यात आणि घरेलू जीवनात अडकलेल्या महिलेवर आधारित आहे. यावेळी तिला करावा लागणारा संघर्ष पाहायला मिळतो. या सीरिजमधून काही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

'मिसेस देशपांडे' – २०२५ मधील सर्वाधिक चर्चेत राहणाऱ्या सीरिजपैकी ही एक सीरिज आहे. यामध्ये माधुरी दीक्षित पहिल्यांदाच एका आगळ्या वेगळ्या भूमिकेत पाहायला मिळते.

यामध्ये तिने एका सीरियल किलरची भूमिका साकारली आहे. या सीरिजमध्ये अभिनेता सिद्धार्थ चांदेकरही महत्त्वपूर्ण भूमिकेत आहे. १९ डिसेंबरलाच ही सीरिज प्रदर्शित झाली. 'मिसेस अंडरकव्हर' – ही एक मेजदार सीरिज आहे. यामध्ये राधिका आपटेने एका गुप्तहेराची भूमिका साकारली आहे, पण ती एका सामान्य गृहिणीप्रमाणे समाजात वावरत असते.

# 'मला दारू', सलमान खान आणि शक्ती कपूर यांच्यात झालेला वाद

सलमान खान आणि शक्ती कपूर यांच्यात उत्तम मैत्री होती. त्यांनी 'जुडवा', 'चल मेरे भाई', 'हम साथ साथ हैं', 'हॅलो ब्रदर' अशा अनेक चित्रपटांत काम केले आहे. मात्र, असा एक काळ आला जेव्हा त्यांच्या मैत्रीत फूट पडली.



एका अंडरकव्हर पत्रकाराने स्टिंग ऑपरेशन केले होते. महिला पत्रकाराने अभिनेत्री असल्याचे सांगत बॉलीवूडमध्ये काम करण्याची इच्छा असल्याचे सांगितले होते. त्यावेळी शक्ती कपूर यांनी चित्रपटात काम देण्याच्या बदल्यात लैंगिक सुखाची मागणी केली होती, असे स्टिंग ऑपरेशनमध्ये समोर आले होते. जेव्हा ही घटना समोर आली त्यावेळी सलमान खानने शक्ती कपूर यांच्याबरोबर काम करणे बंद केले.

**सलमान खान आणि शक्ती कपूर यांच्यातील वाद**

या घटनेनंतर अनेक वर्षांनी २०११ मध्ये बिग बॉसच्या पाचव्या पर्वात शक्ती कपूर स्पर्धक म्हणून सहभागी झाले. त्यावेळी बिग बॉसचे सूत्रसंचालन संजय दत्त आणि सलमान खान दोघे मिळून करत असत. त्यावेळी असे म्हटले जात होते की, सलमान इतर स्पर्धकांना उत्तम वागणूक देत असे. मात्र, शक्ती कपूरशी बोलणे टाळत असे. हे प्रकरण तेव्हा वाढले, जेव्हा सलमानने शक्ती कपूर यांच्या वागण्यावर सार्वजनिकरित्या प्रश्न उपस्थित केले; तर सलमान खान महिलांना मारहाण करतो असे वक्तव्य शक्ती कपूर यांनी केले आणि परिस्थिती आणखी बिघडली.

जवळजवळ या वादाला १५ वर्षे झाली आहेत. आता नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत सलमान आणि माझ्यात गोष्टी चांगल्या झाल्या आहेत, असे वक्तव्य शक्ती कपूरने केले आहे.

शक्ती कपूर म्हणालेष्ठ

'द पॉवरफुल ह्युमन्स' या पॉडकास्टमध्ये बोलताना शक्ती कपूर म्हणाले, 'आता आमच्यात चांगले संबंध आहेत, माझे कोणाशीही कोणतेही मतभेद नाहीत.'

शक्ती कपूर पुढे खुलासा करत असेही म्हणाले, 'मला दारू सोडून पाच वर्षे झाले आहेत. सध्या इंडस्ट्रीमध्ये बरेचजण मद्यपान करत नाही. त्यातील अनेकजण असे आहेत जे आरोग्याकडे लक्ष देतात. ते सगळे बॉडीबिल्डर आहेत. कधीकधी पार्टी आणि इतर कार्यक्रमांवेळी ते दारू पितात. पूर्वी अनेक अभिनेते दारूच्या नशेत सेटवर येत असत.'

सलमान खान आणि शक्ती कपूर यांच्यामध्ये नेमकं काय घडलं होतं?

ज्यावेळी शक्ती कपूर बिग बॉसमध्ये सहभागी झाले होते, त्यावेळी सलमान खानने चांगली वागणूक दिली नसल्याचे म्हटले गेले, त्यामुळे शक्ती कपूर यांना अपमान झाल्यासारखे वाटले.

जेव्हा शक्ती कपूर शोमधून बाहेर पडले, त्यावेळी द टाइम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत शक्ती कपूर म्हणालेले, 'सलमानने माझी माफी मागावी, त्याने आणि संजय दत्तने मला चांगले वागवले नाही. ते इतर स्पर्धकांना चांगली वागणूक देत असत. त्यानंतर सलमान म्हणालेला की, बिग बॉसने शक्ती कपूरसारख्या लोकांना त्याच्या घरात बोलावले, पण आम्हाला कधी बोलावले नाही. मी त्याला हे सांगू इच्छितो की, जरी सलमानने कधी मला त्याच्या घरी बोलावले तरी मी त्याच्या घरी जाणार नाही. मी त्याच्याविरुद्ध काहीही बोललो नव्हतो, तरीही त्याने अशा प्रकारचे सार्वजनिकरित्या विधान केले, त्यामुळे त्याने माफी मागावी.'

शक्ती कपूर सलमान खानबद्दल म्हणालेले असं काहीष्ठ

बिग बॉसमधून बाहेर पडल्यानंतर शक्ती कपूर यांनी ट्विटरवर लिहिले होते, 'बिग बॉस नावाच्या सर्वात मोठ्या फसवणुकीला सलमानही वाचवू शकला नाही. जो माणूस महिलांना मारतो, दारू पिऊन लोकांवर गाडी चालवतो, हरणांची शिकार करतो, त्याची लाज वाटते.'

शक्ती कपूर यांनी बिग बॉसमध्ये सहभागी होण्याबद्दल रेडिफला दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते, 'मी जिंकण्यासाठी नाही तर मी एक महिना दारूपासून दूर राहू शकतो, हे माझ्या मुलांना सिद्ध करण्यासाठी आलो होतो. मला अभिमान आहे की मी ते सिद्ध करू शकलो. आता माझी मुलगी श्रद्धा म्हणते की, तिला पुढच्या आयुष्यातही माझी मुलगी म्हणून जन्म घ्यायचा आहे.'

सलमान आणि शक्ती कपूर यांच्यात जरी वाद असले, तरी सलमानचे शक्ती कपूरच्या मुलीशी श्रद्धाशी उत्तम संबंध आहेत. श्रद्धा अनेकदा बिग बॉसच्या सेटवर तिच्या चित्रपटांचे प्रमोशन करण्यासाठी येते.

# हिवाळ्यातील 'ही' एक भाजी देते आरोग्याला भन्नाट फायदे

हिवाळ्यात बाजारात विविध प्रकारच्या हिरव्यागार हंगामी भाज्या उपलब्ध असतात. पालेभाजी, फळभाजी या दिवसांत प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात खाल्ल्या जातात. ब्रोकोली ही या भाज्यांपैकी एक आहे. मात्र याच्या सेवनाचे फायदे अद्याप तेवढे प्रचलित नसल्याने क्वचितच याचे सेवन केले जाते. ब्रोकोलीचा कोणताही पदार्थ बनवताना ती अनेकदा जास्त शिजवली जाते. त्यामुळे त्याची चव कडू होते. असं असले तरी हिवाळ्यात ब्रोकोली एका वेगळ्या कारणामुळे खाल्ली जाते.

योग्य पद्धतीने शिजवल्यावर ब्रोकोलीमध्ये गोड, किंचित दाण्यासारखी क्रंची चव आणि क्रिमी टेक्स्चर असते. हिवाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी आणि महत्त्वाच्या अवयवांचे योग्य कार्य सुरळीत राखण्यासाठी शरीराला अतिरिक्त पोषण आवश्यक आसते.



या अवयवांमध्ये लिव्हर महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. कारण ते शरीरातील अशुद्धता आणि विषारी पदार्थ काढून टाकते आणि संतुलित पचन प्रक्रिया राखते. आयुर्वेद आणि आधुनिक वैद्यकीय शास्त्र दोन्हीनुसार हिवाळ्यात ब्रोकोली खाणे लिव्हरचे संरक्षण करण्यासाठी आणि त्याचे कार्य वाढवण्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे.

**रोगप्रतिकारक शक्तीसाठी फायदेशीर**

ब्रोकोलीमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. मात्र, लिंबूवर्गीय फळांप्रमाणे त्याचा पोटावर जास्त किंवा आम्लयुक्त परिणाम होत नाही. ब्रोकोलीचा एक वाटी भाग तुमच्या दैनंदिन व्हिटॅमिन सीच्या गरजा पूर्ण करतो. त्यात अशी संयुगेदेखील असतात जी तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात.

**पचनक्रिया सुरळीत ठेवते**

हिवाळ्यात अन्न थोडे जड पडते. ब्रोकोलीमध्ये फायबर पोटातील जडपणाला संतुलित करतो. हे फायबर आतडे स्वच्छ करण्यास मदत करते आणि बद्धकोष्ठता तसंच आळस यासारख्या समस्या टाळते. कच्च्या सॅलडपेक्षा थोड्या प्रमाणात शिजवलेली ब्रोकोली हिवाळ्यात जास्त गरम आणि पचण्यास सोपी असते.

**लिव्हरसाठी फायदेशीर**

लिव्हरचे आरोग्य राखण्यात ब्रोकोली महत्त्वाची भूमिका बजावते. लिव्हरचे प्राथमिक कार्य शरीरातील हानिकारक पदार्थ आणि विषारी पदार्थ काढून टाकणे हे आहे. मात्र, जेव्हा हे विषारी पदार्थ जास्त प्रमाणात जमा होतात तेव्हा ते लिव्हरवर अतिरिक्त ताण आणतात. ब्रोकोलीमधील सल्फोराफेन शरीरातील डिटॉक्सिफिकेशन एन्झाइम्स सक्रिय करते. त्यामुळे लिव्हर विषारी पदार्थ ब्रेक करण्यास आणि शरीरातून काढून टाकण्यास मदत करते.

**त्वचेसाठी फायदेशीर**

थंड हवा, हीटर आणि गरम पाण्याने आंघोळ केल्याने हिवाळ्यात त्वचा कोरडी आणि निर्जीव होऊ शकते.

ब्रोकोलीमधील अँटीऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन ए आणि सल्फोराफेन त्वचेला आतून दुरूस्त करतात. ब्रोकोलीचे नियमित सेवन केल्याने त्वचेचा ओलावा, लवचिकता कायम राहते आणि त्वचा निरोगी राहण्यास मदत होते.

**वजन नियंत्रित करण्यास उपयुक्त**

ब्रोकोलीमध्ये कॅलरीज कमी आणि फायबर जास्त असते, जे तुम्हाला पोट भरल्यासारखे वाटते आणि नाश्त्याची इच्छा कमी करते. ब्रोकोलीचा समावेश रात्रीच्या जेवणात आवर्जून करावा.

**हार्मोनल असंतुलन**

हिवाळ्यात हार्मोनल असंतुलनामुळे थकवा, मूड स्विंग आणि पचनाच्या समस्या वाढू शकतात. ब्रोकोली शरीरातील संतुलन हळूहळू पुन्हा साधारण करण्यास मदत करते.

# विमानात मिळणारे पाणी पिण्यासाठी सुरक्षित का?



विमानात हायड्रेशन आवश्यक आहे. कारण जेट लॅग, डोकेदुखी, चक्कर येणे आणि थकवा टाळण्यास मदत होते. त्यामुळे बहुतेक प्रवासी विमानात एक किंवा दोन ग्लास पाणी पितात. पण विमानात जे पाणी मिळतं त्याचा स्त्रोत काय असतो? जागतिक आरोग्य संघटनेच्या विमान वाहतूक स्वच्छता आणि स्वच्छता मार्गदर्शकानुसार, विमान आणि विमानतळ ऑपरेशन्समध्ये नियमित स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण हे आवश्यक पैलू असतात. विमानातील पाण्याचे व्यवस्थापन करण्याची संपूर्ण जबाबदारी एअरलाइनची आहे. विमानातील सर्व पिण्याचे पाणी सुरक्षित आहे याची खात्री करण्यासाठी योग्य पाणी प्रणाली ऑपरेशन आणि देखभाल प्रक्रिया आवश्यक आहेत. विमानातील पाण्याच्या टाक्यांची ठराविक कालावधीने स्वच्छता करणे हा देखील प्रक्रियेचा एक भाग आहे, असे त्यात म्हटले आहे.

जनरल प्रॅक्टिशनर आणि कॉस्मेटोलॉजिस्ट डॉ. हुमा शेख यांनी याबाबत इंस्टाग्रामवर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितले की, विमानाच्या टाक्या निर्जंतुक करणे सोपे नसते आणि एकदा पाईप्समध्ये बायोफिल्म तयार झाली की, पाण्याची गुणवत्ता नैसर्गिकरित्या कमी होते. ते तांत्रिकदृष्ट्या सुरक्षित असले तरीही ते सुरक्षित नसते.'

शेख यांनी सांगितले की, 'याचा अर्थ असा नाही की तुम्हाला गंभीर आजार होण्याचा धोका आहे. पिण्यासाठी आणि ब्रश करण्यासाठी बाटलीबंद पाणी, धुण्यासाठी नळ असा नियम बहुतेक वारंवार प्रवास करणारे शांतपणे पाळतात.

डॉ. शेख यांच्या या इंस्टाग्राम पोस्टला एका युजरने प्रतिक्रिया दिली की, 'तुम्ही इथे उल्लेख केलेल्या पोर्टेबल पाण्याच्या टाक्या नियमितपणे विशिष्ट द्रवपदार्थांनी स्वच्छ केल्या जातात आणि नंतर त्यांच्यातील पाण्याची कोणत्याही बॅक्टेरिया वगैरेसाठी चाणी केली जाते. म्हणून इंटरनेटवर ऐकलेल्या प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवू नका.'

विमानात पाणी पिणे सुरक्षित आहे की नाही हे समजून घेण्यासाठी मुंबईतील परळ इथल्या ग्लेनिएगल्स हॉस्पिटलमधील अंतर्गत औषधांच्या वरिष्ठ सल्लागार डॉ. मंजुषा अग्रवाल यांनी बोलताना सांगितले .

# फ्लॉवरमधील अळ्यांमुळे खाणे टाळता का?

हिवाळ्यामध्ये अनेक हंगामी भाज्या बाजारात उपलब्ध असतात. फळं, भाज्या या हंगामात आवडीने खाल्ल्या जातात. फ्लॉवर ही भाजी बाराही महिने उपलब्ध असते. पावसाळ्यात प्रामुख्याने फ्लॉवर खाणे टाळले जाते. कारण त्यामध्ये फ्लॉवरच्याच रंगाच्या डोळ्यांनाही न दिसणाऱ्या अळ्या सापडतात. मात्र ही समस्या फक्त पावसाळ्यापुरती नाही तर इतरही ऋतूंमध्ये उद्भवते. फ्लॉवरचा वापर केवळ भाजी म्हणून केला जात नाही, तर पराठे किंवा मंच्युरियन साठीदेखील याचा वापर केला जातो.

अनेकदा असे घडते की, काळजीपूर्वक बघूनही फ्लॉवरमध्ये अळ्या आढळतात. कधीकधी बाहेरून अगदी स्वच्छ दिसणाऱ्या फ्लॉवरमध्ये कीटक आणि सुरवंट असू शकतात, जे फक्त पाण्याने धुवून काढता येत नाहीत. तर मग जाणून घेऊ अळ्याविरहीत फ्लॉवर कसा घ्यावा आणि खाण्याआधी तो योग्य पद्धतीने कसा स्वच्छ करावा याबाबत जाणून घेऊ.

नेहमी दुधासारखा पांढरा फ्लॉवर खरेदी करा. जर फ्लॉवर तुम्हाला काळे किंवा गडद तपकिरी डाग दिसले तर त्यावर बुरशी किंवा कीटकांचा प्रादुर्भाव असू शकतो.

फ्लॉवरच्या फुलांना घट्ट जोडलेले असताना कीटकांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता कमी असते. जर फुलणे विखुरलेले असतील किंवा त्यांच्यामध्ये जास्त अंतर असेल तर कीटक सहजपणे आत प्रवेश करू शकतात आणि अंडी घालू शकतात.

ताजी, जंतमुक्त कोबीची पाने नेहमीच चमकदार हिरवी असतात आणि त्याच्या दांडीला चिकटलेली असतात. जर पाने वाळलेली, पिवळी दिसली किंवा त्यांना छिद्रे दिसली तर कीटकांनी त्यांना आधीच खाऊन टाकले आहे.

जर तुम्हाला फ्लॉवरच्या दांड्याला छिद्रे दिसली किंवा ती आतून पोकळ दिसत असेल तर त्यावर सुरवंट किंवा कीटकांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता जवळजवळ निश्चित आहे.



चांगला फ्लॉवर हातात जड वाटला पाहिजे, त्याच्या आकाराच्या सापेक्ष. कमकुवत कोबी बहुतेकदा आतून कोरडी असते किंवा कीटकांनी खाल्लेली असते. ताज्या फ्लॉवरला विशिष्ट वास नसतो. जर त्याचा वास थोडासाही वेगळा असेल तर तो खरेदी करू नका.

फ्लॉवर स्वच्छ करण्याची योग्य पद्धत

फ्लॉवर घरी आणल्यानंतर कापण्यापूर्वी तो मीठ टाकलेल्या कोमट पाण्यात किंवा हळदीच्या पाण्यात १० ते १५ मिनिटे भिजवा. यामुळे आत लपलेले लहान अळ्या किंवा जंतू काढून टाकण्यास मदत होईल.

# सकाळी उठल्यावर 'या' भांड्यातील पाणी प्या

दररोज आपण पाणी पितो, पण ते कशातून पितो याकडे किती जण लक्ष देतात? काचेचा ग्लास, स्टीलचा कप की आजीच्या काळात वापरले जाणारे तांबे-पितळ? भारतीय घरांमध्ये शतकानुशतके धातूच्या भांड्यांतून पाणी पिण्याची परंपरा आहे. आयुर्वेदात तर असे मानले जाते की, धातू केवळ पाणी साठवत नाहीत तर त्याला एक विशिष्ट ऊर्जा देतात. आधुनिक विज्ञानही आता काही अंशी याला दुजोरा देत आहे. मग प्रश्न असा उरतो, दररोजच्या वापरासाठी कोणता धातू योग्य?

**तांब्याचा ग्लास**


तांब्याला पाणी शुद्ध करण्याचा नैसर्गिक गुणधर्म आहे, असे आयुर्वेदात सांगितले जाते. काही तास तांब्याच्या भांड्यात ठेवलेल्या पाण्यात तांब्याचे अतिशय सूक्ष्म कण मिसळतात. या प्रक्रियेमुळे पाण्यातील हानिकारक जंतू नष्ट होण्यास मदत होते. संशोधनानुसार याला ऑलिगोडायनॅमिक प्रभाव असे म्हणतात.

तांब्याच्या पाण्यामुळे पचन सुधारते, यकृत शुद्ध राहण्यास मदत होते आणि थायरॉइड संतुलन राखण्यासही हातभार लागू शकतो. त्वचेचा रंग सुधारण्यास व केस अकाली पांढरे होण्याचा धोका कमी करण्यासही तांबे उपयुक्त ठरू शकतो.

मात्र, अति वापर टाळावा. जास्त प्रमाणात तांबे शरीरात गेल्यास मळमळ किंवा थकवा जाणवू शकतो, त्यामुळे दिवसातून एकदाच, तेही सकाळी तांब्याच्या ग्लासमधील पाणी पिणे अधिक सुरक्षित मानले जाते.

**चांदीचा ग्लास**

चांदी हा थंडावा देणारा आणि जंतुनाशक गुणधर्म असलेला धातू म्हणून ओळखला जातो. प्राचीन काळी पाणी व औषधे साठवण्यासाठी चांदीचा वापर केला जात असे. चांदीतील सूक्ष्म घटक जंतूंची वाढ रोखण्यास मदत करतात आणि रोगप्रतिकारशक्तीला आधार देतात. चांदीच्या ग्लासमधील पाण्याने किंचित थंड व ताजेतवाने वाटते, त्यामुळे उष्ण हवामानात ते अधिक उपयोगी ठरते. पारंपरिक घरांमध्ये लहान बाळ किंवा आजारी व्यक्तींना चांदीच्या भांड्यातील पाणी दिले जात असे. किंमत जास्त असली तरी अधूनमधून वापरासाठी चांदी हा चांगला पर्याय ठरू शकतो.



**पितळ्याचा ग्लास**

पितळ म्हणजे तांबे आणि जस्त यांचे मिश्रधातू. जस्त पेशींच्या दुरुस्तीस मदत करतो, चयापचय सुधारतो आणि त्वचा-केसांच्या आरोग्यास पूरक ठरतो. पितळ्यातून पाण्यात मिसळणारे सूक्ष्म घटक शरीरासाठी उपयुक्त ठरू शकतात.ज्यांचा चयापचय मंद आहे किंवा त्वचा निस्तेज वाटते, त्यांच्यासाठी पितळ उपयोगी मानले जाते.

मात्र, पितळ्याची योग्य स्वच्छता अत्यंत महत्त्वाची आहे. आम्लयुक्त पेये किंवा लिंबूपाणी पितळ्यात ठेवू नये, कारण त्याची धातूशी अपायकारक अभिक्रिया होऊ शकते.

**मातीचा ग्लास**

धातू नसला तरी मातीचा ग्लास उल्लेखनीय आहे.

माती पाणी नैसर्गिकरीत्या थंड ठेवते .

# पोट आणि आतडे निरोगी ठेवण्यासाठी 'या' गोष्ट करा

वर्षाच्या शेवटी लोक ख्रिसमस तसंच नवीन वर्षाच्या स्वागताची तयारी करत असताना लोक पार्टीच्या मूडमध्ये असतात. पार्टीचा हंगाम ख्रिसमसपासून सुरू होते आणि नवीन वर्षापर्यंत चालू राहतो. परिणामी विविध पदार्थ तयार केले जातात, पेये घेतली जातात, रात्री उशिरापर्यंत पा ट्या केल्या जातात आणि मिठाई तसंच जंक फूड खाल्ले जाते. या सर्व गोष्टी एकत्रितपणे पोट खराब होण्यास कारणीभूत ठरतात. काही लोकांना पोटफुगी, गॅस आणि पित्त या समस्या उद्भवतात. मात्र तुम्ही काय खाता आणि पित्त याबाबत थोडी काळजी आणि सावधगिरी बाळगलीत तर तुमच्या पोटाची काळजी न करता पार्टीचा आनंद घेऊ शकता.

**आतडे निरोगी ठेवण्यासाठी काय करावे?**

**१. चिया सीड्सचे पाणी**- निरोगी आतड्यांसाठी दिवसाची सुरूवात चिया सीड्सच्या पाण्याने करा. रात्रभर एक ग्लास पाण्यात १ चमचा चिया सीड्स भिजवा. सकाळी या पाण्यात एक चमचा लिंबाचा रस घाला, ते थोडेसे गरम करा आणि प्या. चिया सीड्स तुमच्या पचनसंस्थेला हळूवारपणे सक्रिय करण्यासाठी पुरेसे आहेत.

**२. आहारात प्रोटीन आणि फायबरचा समावेश-** पार्ट्यांमध्ये सुरूवातीपासून ते गोडापर्यंत सर्व काही असते. मात्र तुम्ही तुमच्या ताटात फायबर आणि प्रोटीनयुक्त पदार्थांचा समावेश केला पाहिजे. यासाठी अंडी आणि चिकनसारखे प्रोटीनयुक्त पदार्थ खा, तसंच सॅलड, भाज्या, चिया सीड्स आणि अळशीसारखे फायबरयुक्त पदार्थ खा. यामुळे अचानक भूक लागणे कमी होण्यास आणि जास्त खाणे टाळण्यास मदत होऊ शकते. गोड पदार्थ, तळलेले पदार्थ, पराठे, बिरयानी आणि कचोरी असे पदार्थ टाळा.




**३. जेवणानंतर वॉक घ्या-** जेवल्यानंतर लगेच झोपायला जाणे तुमच्या आरोग्यासाठी चांगले नाही. जेवणानंतर काही पावलं चालणं खूप महत्त्वाचं आहे. प्रामुख्याने सणांच्या वेळी जेवणानंतर १० ते १५ मिनिटे चालल्याने आतड्यांचे कार्य चांगले सुधारते. यामुळे ग्लुकोज स्नायूंपर्यंत पोहोचण्यास मदत होते आणि गॅस, पित्त कमी होते. यामुळे खाल्ल्यानंतर पोटफुगी टाळण्यास मदत होते.

**४. निरोगी फॅट खा-** तुमच्या आहारात निरोगी फॅटचा समावेश करा. निरोगी फॅट आतडे निरोगी ठेवण्यास मदत करतात. ँ२ तूप, नारळाचे तेल, काजू, बिया, बाहेरील कोंबड्यांची अंडी आणि फॅट असलेले मासे पचनासाठी चांगले असतात. निरोगी फॅट आतड्याच्या अस्तरांना आधार देतात. त्यावर अनेकदा जास्त साखर, मसालेदार पदार्थ किंवा अल्कोहोल सारख्या घटकांचा परिणाम होतो.

**५. झोप आवश्यक-** सणासुदीच्या काळात पार्ट्या रात्री उशिरापर्यंत चालतात. त्यामुळे झोप लागणे कठीण होते. असं असलं तरी रात्री उशिरा होणाऱ्या पार्ट्या आणि अनियमित झोपेमुळे कॉर्टिसोलची पातळी वाढते, पचन मंदावते आणि भूक लागण्याची शक्यता वाढते. म्हणून रात्रीचे जेवण लवकर करा. झोप येणे सोपे करण्यासाठी स्क्रीनपासून दूर रहा.

# पपईची साल 'या' पद्धतीने वापरा

पपई हे एक अतिशय गुणकारी फळ आहे हे आपल्याला माहितीच आहे. त्यामुळे पपई आपण आवर्जून आणून खातो. पण पपईचा गर खाऊन त्याची सालं मात्र टाकून देतो. पण पपई आपल्या आरोग्यासाठी जेवढी उपयुक्त ठरते, तेवढेच पपईचे सालं देखील आपल्या त्वचेसाठी फायद्याचे ठरतात. चेहऱ्यावरचे पिगमेंटेशन, डार्क स्पॉट्स कमी करण्यासाठी पपईच्या सालींचा उपयोग होतो तसेच चेहऱ्यावर कमी वयात येणाऱ्या सुरकुत्या कमी करून त्वचेचा टाईटनेस टिकवून ठेवण्यासाठीही पपईची सालं मदत करतात.

जेव्हा पपई कापतो तेव्हा तिची सालंही काढून टाकतो. ही काढून घेतलेली सालं एका ठिकाणी जमा करा आणि हलकीशी धुवून घ्या.

महागड्या फळांपेक्षा कित्येक पटीने जास्त पौष्टिक आहे पेरू! 'हे' फायदे वाचाल तर रोज आठवणीने खाल..त्यानंतर ती उन्हामध्ये २ ते ३ दिवस वाळू द्या. सालं पुर्णपणे वाळल्यानंतर ती मिक्सरमधून फिरवा आणि त्यांची अगदी बारीक पावडर तयार करा.ही पावडर नंतर गाळणीने गाळून घ्या. आता गाळून घेतलेली जी बारीक



पिठासारखी पावडर असेल ती एका वाटीमध्ये काढा. त्यामध्ये चिमूटभर हळद, कच्चं दूध आणि थोडासा मध घाला. रेस्टॉरंटसारखी चमचमीत मटार मेथी करण्याची सोपी ट्रिक-महागडे काजू, बटर, क्रिम घालण्याचीही गरज नाहीआता सगळे पदार्थ हलवून एकजीव करा आणि नंतर हा लेप चेहऱ्याला लावा. १० ते १५ मिनिटांनी हलक्या हाताने मालिश करून चेहरा धुवून टाका.

# सर्दीने नाकात साचलेल्या घाणीमुळे सारखा हात नाकाकडे जातो?

सर्दी झाली की नाकातून सतत पाणी येणे, नाक बंद होणे आणि नाकात चिकट घाण साचणे असा त्रास अनेकांना होतो. ही साचलेली घाण कोरडी झाली की नाकाच्या आत हुळहुळते, जळजळ होते आणि कधी कधी श्वास घेणेसुद्धा त्रासदायक होते.तशीच चिकटून राहिली की हळूहळू सुकते आणि ओढून काढण्याच्या प्रयत्नात कधी रक्तही येते. हा त्रास लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सगळ्यांनाच जाणवतो. वेळेवर योग्य काळजी घेतली नाही तर हा साधा वाटणारा त्रास पुढे सायनस, डोकेदुखी किंवा घशाच्या तक्रारी वाढवू शकतात.

सर्दी झाल्यावर शरीर अधिक प्रमाणात कफ तयार करते. नाकाच्या आतल्या बाजूला सूज येते आणि स्राव घट्ट होऊ लागतो. थंड हवा, धूळ, प्रदूषण किंवा सतत एसीमध्ये राहिल्यामुळे ही घाण अधिक घट्ट होते. पाणी कमी पिणे, शरीर कोरडे पडणे यामुळेही नाकातील स्राव लवकर कोरडा होतो आणि हुळहुळण्याचा त्रास वाढतो.

हा त्रास कमी करण्यासाठी सर्वात सोपा आणि प्रभावी उपाय म्हणजे नाक ओलसर ठेवणे. कोमट पाण्याची वाफ घेतल्याने नाकातील साचलेली घाण मऊ होते आणि सहज बाहेर पडते. दिवसातून एक-दोन वेळा वाफ घेतल्यास नाक मोकळे होते आणि दाहही कमी होतो. नाकाच्या आत



कोरडेपणा जास्त जाणवत असेल तर रात्री झोपण्यापूर्वी नाकाच्या कडेला किंवा आत थोडेसे तूप किंवा तीळतेल लावणे उपयुक्त ठरते. यामुळे नाकातील त्वचा मऊ राहते आणि हुळहुळणे कमी होते. सर्दी असताना फार जोरात नाक शिंकरणे टाळावे. कारण त्यामुळे नाकाच्या आतली नाजूक त्वचा दुखावली जाऊ शकते.

सर्दीमुळे नाकात घाण साचू नये यासाठी रोजच्या सवयींमध्ये थोडे बदल करणे गरजेचे आहे. पुरेसे पाणी पिणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शरीर हायड्रेटेड असेल तर नाकातील घाण घट्ट न होता सहज बाहेर पडते. आहारात कोमट आणि हलके पदार्थ ठेवावेत. गरम सूप, काढे, आले, तुळस यांसारख्या पदार्थांचा उपयोग केल्यास कफ पातळ होतो.

थंड हवा, धूळ आणि प्रदूषण यापासून शक्यतो स्वतःचे संरक्षण करावे. बाहेर जाताना नाकावर रुमाल किंवा मास्क वापरणे फायदेशीर ठरते. एसी किंवा हीटर असलेल्या खोलीत हवा खूप कोरडी असल्यास खोलीत ओलावा राखण्याचा प्रयत्न करावा. सर्दी झाल्यावरही पूर्ण विश्रांती घेणे आणि अंग गरम ठेवणे याकडे दुर्लक्ष करु नये. एकूणच सर्दीमुळे नाकात साचणारी घाण ही सामान्य समस्या असली तरी योग्य काळजी आणि सोपे घरगुती उपाय केल्यास हा त्रास सहज कमी करता येतो.

# चक्रव्यूह भेदण्यासाठी...

**बदलत्या भू-राजकीय परिस्थितीत भारत आणि ओमान यांच्यात झालेल्या मुक्त व्यापार कराराकडे दूरगामी आर्थिक परिणामांसह विविधांगाने पाहिले जाऊ शकते. गेल्या काही वर्षांपासून अनेक देश स्वतःभोवती एकसंध वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे तिसऱ्या जगातील देश त्यांच्यावर अवलंबून राहात असून प्रगत देश त्यांच्यावर स्वतःच्या सोयीच्या अटी लादत आहेत. असे असताना भारत मात्र स्वतंत्र वाट चोखाळत आहे.**

भारताने पूर्वीपासूनच पारंपरिक सहयोगी असणाऱ्या किंवा नव्याने संबंध विकसित करण्यास इच्छुक असणाऱ्या देशांबद्दल परिपक्व आणि उदारमतवादी दृष्टिकोन राखला आहे. अलीकडेच ओमानशी केलेला व्यापक आर्थिक भागीदारी करार याचे निदर्शक असून यामार्गे भविष्यात दोन्ही देशांमधील आर्थिक संबंधांमध्ये नवीन आयाम निर्माण करणारा ठरण्याची शक्यता आहे. खेरीज तो बहुध्रुवीय जगात निवडीच्या नवीन वाटादेखील उघडू शकेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडच्या विदेश दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात ओमानला दिलेली भेट केवळ एक औपचारिक राजनैतिक थांबा नाही, तर भारताच्या विस्तारित शेजारी धोरणातील सातत्य आणि परिपक्वतेचे लक्षण म्हणता येईल. ओमान हा ऐतिहासिकदृष्ट्या भारताचा विश्वासू भागीदार राहिला आहे. म्हणूनच पश्चिम आशियाला भू-राजकीय अस्थिरता, ऊर्जा बाजारपेठेतील अनिश्चितता आणि सागरी मार्गांची सुरक्षितता यांसारख्या आव्हानांचा सामना करावा लागत असताना ही भेट आणखी महत्त्वाची मानली जाते. भारत ओमानमधील तेलाचा चौथा सर्वात मोठा खरेदीदार आहे. दुसरीकडे, ओमानची विशिष्टता त्याच्या संतुलित परराष्ट्र धोरणात आहे. आखातातील ध्रुवीकरण झालेल्या राजकारणात ओमानने मध्यस्थी आणि संवादाचा मार्ग निवडला असल्यामुळे भारतासाठी मौल्यवान आहे, कारण भारत नेहमीच धोरणात्मक स्वायत्तता, संवाद आणि बहुपक्षीयतेवर भर देतो. ओमानच्या दौऱ्यात मोदी यांना 'ऑर्डर ऑफ ओमान'ने सन्मानित करण्यात आले आणि दोन्ही देशांनी २०२३ पासून वाटाघाटी सुरू असलेल्या व्यापार करारावरही शिक्कामोर्तब केले. मोदी यांनी याचे वर्णन 'दोन्ही देशांमधील सामायिक भविष्यासाठी एक ब्लूप्रिंट'

असे केले. यातून दोन्ही अर्थव्यवस्थांना अनेक क्षेत्रांमध्ये फायदा होण्याची अपेक्षा आहे.

भारताचे ओमानशी आर्थिकच नाहीत तर धोरणात्मक आणि सांस्कृतिक संबंधही आहेत. तेथे जवळजवळ सात लाख भारतीय राहतात. अर्थातच ते दोन्ही देशांमध्ये सेतू म्हणून काम करतात. त्याअगोदर मोदींनी जॉर्डन आणि इथिओपियाला भेट दिली होती. इथिओपिया ही आफ्रिकेतील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असून आफ्रिकन युनियनचे मुख्यालयदेखील आहे. पहलगाम हल्ल्याचा निषेध करणाऱ्या आणि भारताशी एकता व्यक्त करणाऱ्या पहिल्या काही देशांमध्ये इथिओपिया होता, हेदेखील विसरता कामा नये. म्हणूनच मोदी यांच्या भेटीचा उद्देश आफ्रिका आणि पश्चिम आशियातील भारताचे संबंध आणि स्थान मजबूत करणे हे होते. हीच त्यांची विश्वास, सातत्य आणि सामायिक हितसंबंधांसंबंधीची राजनैतिक नीतीही आहे. म्हणूनच हा दौरा महत्त्वपूर्ण म्हटला गेला. जग बहुध्रुवीय होत असताना या देशांसोबतचे मजबूत संबंध पश्चिम आशिया आणि आफ्रिकेतील भारताची राजनैतिक उपस्थिती आता अधिक मजबूत करेल. अमेरिकेच्या टॅरिफ युद्धामुळे आणि युरोपीय महासंघाच्या कार्बन करामुळे वाढत्या व्यापार निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर भारताने पश्चिम आशियातील निर्यात वाढवण्यासाठी ओमानसोबत हा व्यापार करार केल्याची नोंद घ्यायला हवी. अमेरिकेसोबतच्या व्यापार करारातील तणावादरम्यान नवीन बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्यासाठी मुक्त व्यापार करारांना (एफटीए) वेगाने प्रोत्साहन देण्याच्या मोदी

सरकारच्या धोरणाचाही हा एक भाग आहे. युरोपीय महासंघाच्या तुलनेत अरब देशांमध्ये कमी कठोर मानके असल्याने आता भारतीय निर्यातदारांसाठी नवा मार्ग मोकळा होत आहे. यामुळे निर्यातदारांसाठी अनुपालन खर्च वाचेलच, शिवाय हा करार 'नॉन-टेरिफ बॅरियर' (एनटीबी) म्हणूनही काम करेल. ओमानसोबतचा हा करार 'गल्फ को ऑपरेशन कौन्सिल' (जीसीसी) सोबतच्या व्यापार कराराच्या वाटाघाटी अयशस्वी झाल्या असताना झाला आहे, हेदेखील विसरता कामा नये. 'जीसीसी'मध्ये बहरीन, कुवेत, ओमान, कतार, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती यांचा समावेश आहे. असे असताना ताज्या घटनेमुळे भारताचा आता दोन 'जीसीसी' सदस्यांशी करार झाला आहे. त्यात ओमान आणि संयुक्त अरब अमिरातीचा समावेश आहे.

ओमान ही संयुक्त अरब अमिरातीपेक्षा लहान बाजारपेठ असली तरी तिचे धोरणात्मक स्थान भारतीय उत्पादनांना आखाती आणि आफ्रिकेतील इतर बाजारपेठांपर्यंत पोहोचण्याची परवानगी देते. ओमानची एकूण वार्षिक आयात अंदाजे ४० अब्ज डॉलर आहे, परंतु ते त्याच्या यंत्रसामग्रीपैकी फक्त दोन तृतीयांश आयात करतात. ओमान प्रामुख्याने इंधन निर्यातदार आहे. खेरीज हेदेखील लक्षात घ्यायला हवे की, २००९ पासून ओमानचा अमेरिकेसोबत मुक्त व्यापार



करार आहे. या कराराअंतर्गत अमेरिकेला ओमानमधून मोठ्या प्रमाणात करमुक्त वस्तू पाठवल्या जातात. ओमानच्या अमेरिकेतील प्रमुख निर्यातदारांमध्ये औद्योगिक पुरवठा, ?ल्युमिनियम, खते, दागिने, तेल आणि प्लास्टिक उत्पादने यांचा समावेश आहे. भारत सरकार सध्या करमुक्त

असणाऱ्या रत्ने आणि दागिन्यांच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. पाच


वर्षांमध्ये भारतीय निर्यात तीन अब्ज डॉलरवरून सहा अब्ज डॉलर झाली आहे. यामध्ये प्रामुख्याने यंत्रसामग्री आणि सुट्या भागांचा समावेश आहे. नॅफ्था आणि पेट्रोल व्यतिरिक्त भारताच्या प्रमुख निर्यातीमध्ये यंत्रसामग्री, विमाने, तांदूळ, लोखंड आणि स्टील वस्तू, सौंदर्य आणि वैयक्तिक काळजी उत्पादने आणि सिरेमिक उत्पादने यांचा समावेश आहे. त्यामुळेच ओमानशी झालेल्या कराराद्वारे निर्यातवाढीचे उद्दिष्ट साधता येईल, असे वाटते, कारण भारत-ओमान यांच्यातील मुक्त व्यापार करारामुळे भारतातून ओमानमध्ये जाणाऱ्या वस्तू जवळजवळ करमुक्त असतील. म्हणूनच या करारामुळे भारतीय औद्योगिक निर्यातीची स्पर्धात्मकता सुधारण्याची अपेक्षा आहे.

## नात्यातला खोटारडेपणा संपवतो विश्वास

पती-पत्नीमधील दुरावा मोठ्या गोष्टींमुळे नाही तर लहान लहान चुकीच्या सवयींमुळे, अहंकारामुळे आणि संवादाच्या अभावामुळे निर्माण होतो.

सध्याच्या धकाधकीच्या काळात जोडप्यांना नात्यात एकमेकांना हवा तसा वेळ देता येत नाही.ज्यामुळे गैरसमज, दुरावा मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. नातं टिकवणं हे प्रेमापेक्षा अधिक महत्त्वाचं असतं नात्याला समजून घेणे, जपणं आणि रोज टिकवण्यासाठी नव्याने प्रयत्न करावा लागतो. यासाठी प्रयत्न, संयम आणि मनाची परिपक्वता देखील लागते.घर, नोकरी, जबाबदाऱ्या आणि सोशल मीडियाच्या नादात आपण आपल्या जोडीदाराकडे दुर्लक्ष करतो.बरेचदा आपण समोरच्याला गृहित देखील धरतो, ज्यामुळे संवादाची कमतरता जाणवते आणि नात्यात दुरावा येऊ लागतो.

हा नात्यातील दुरावा अनेकदा छळतो, त्रास देतो.. यामुळे आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर देखील परिणाम होतो. पण अशावेळी संवाद साधण, नात्याबद्दल सकारात्मक राहणं आणि जीवनाला नव्याने



दृष्टीकोन या गोष्टी नात्याला स्थिरता देतात. या जीवनमूल्यांवर भर देताना प्रेमानंद महाराजांनी अलीकडेच कपल्ससाठी अतिशय उपयुक्त सल्ला दिला आहे. त्यांच्यामते पती-पत्नीमधील दुरावा मोठ्या गोष्टींमुळे नाही तर लहान लहान

पाहण्याचा

चुकीच्या सवयींमुळे, अहंकारामुळे आणि संवादाच्या अभावामुळे निर्माण होतो. नातं तुटत नाही ते हळूहळू, नकळत, दिवसेंदिवस कमकुवत होत जातं. अशावेळी काय करायला हवं, पाहूया.

प्रेमानंद महाराज म्हणतात विश्वास हा प्रत्येक नात्याचा पाया असतो.

लग्नासारखं पवित्र नातं हे विश्वासाच्या जोरावर टिकून राहाते. जोपर्यंत जोडीदार एकमेकांवर विश्वास ठेवतात तोपर्यंत हे नातं मजबूत आणि निरोगी राहते. कोणत्याही नात्याचा पाया विश्वासावर अवलंबून असते. त्यासाठी लग्नापूर्वी किंवा कोणत्याही नात्यात जाणण्यापूर्वी जोडीदारासोबत मनमोकळेपणाने आणि खरेपणाने संवाद साधा. ज्यामुळे तुमचे नातं सत्याच्या आधारावर सुरु होईल.

सध्याच्या जोडप्यांची समस्या ही आहे की ते एकमेकांचे ऐकत नाहीत. त्यांना वाटतं की ते बरोबर आहे. या गैरसमजामुळे अनेक वेळा नात्यात दुरावा येतो. अनेकदा नाते तुटते देखील. सोशल मीडियामुळे जितक्या गोष्टी चांगल्या वाटतात तितकेच ते वाईट आहे. त्यासाठी कोणता निर्णय घेताना आपल्या जोडीदाराची संमती घ्या. गैरसमज करुन घेण्याऐवजी एकमेकांशी चर्चा करा. भारतात लग्नपद्धतीला पूर्वीपासूनच महत्त्वाचे मानले गेले आहे. हे नाते दोन व्यक्तींमधील नसून दोन कुटुंबांना जोडणारे आहे. मुलगी सासरी आल्यानंतर ती घराची, नवऱ्याची आणि सासू- सासऱ्यांची जबाबदारी योग्य पद्धतीने घेते. पण तिची काळजी घेणे हे नवऱ्याचे कर्तव्य असते.

## अतिश्रीमंतांचा 'आक्रमक' गुंतवणुकीवर भर!

अतिश्रीमंत लोकांची संपत्ती वेगाने वाढण्याचं कारण आता समोर आलं आहे. देशातील अनेक श्रीमंतांच्या मुलाखतीतून हे निष्कर्ष काढण्यात आले आहेत.श्रीमंत लोकांची संपत्ती वेगाने का वाढत आहे? असा प्रश्न तुमच्याही मनात कधीतरी आलाच असेल. याचं उत्तर आता एका अहवालातून समोर आलं आहे.

दोन लाख कोटी रुपयांहून अधिक संपत्ती असलेल्या देशातील बड्या गुंतवणूक दारांच्या मुलाखतींनंतर हा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

आपल्या पोर्टफोलिओमधील ७० टक्क्यांहून अधिक हिस्सा हे गुंतवणूकदार आता इक्विटी, खाजगी मार्केट आणि पर्यायी गुंतवणुकीसारख्या 'हाय-ग्रोथ' मालमत्तांमध्ये गुंतवत आहेत.

अहवालानुसार, ६७ टक्के अतिश्रीमंत गुंतवणूकदारांनी त्यांच्या एकूण गुंतवणुकीपैकी १० टक्क्यांहून अधिक वाटा थेट

शेअर बाजारात गुंतवला आहे.



विशेष म्हणजे, पारंपारिक आणि सुरक्षित समजल्या जाणाऱ्या सोन्यातील गुंतवणूक या गटात कमी होताना दिसत आहे. साधारण ४४ टक्के गुंतवणूकदारांनी वर्षाला १३ ते १५ टक्के इतक्या भरघोस परताव्याची अपेक्षा व्यक्त

केली आहे.गुंतवणुकीच्या बाबतीत सर्वात मोठी क्रांती तरुण पिढीमध्ये पाहायला मिळत आहे. अतिश्रीमंत कुटुंबांतील ९५ टक्के तरुण वारसदार त्यांच्या पोर्टफोलिओमधील ५० ते ९० टक्के हिस्सा अत्यंत आक्रमक पद्धतीने 'ग्रोथ ॲसेट्स'मध्ये

गुंतवत आहेत. संपत्ती केवळ टिकवून ठेवण्यापेक्षा ती गुणाकाराच्या पटीत वाढवण्याकडे या तरुणांचा ओढा अधिक आहे.

केवळ नफाच नाही, सामाजिक कार्यावरही भर

अतिश्रीमंत लोक केवळ स्वतःच्या संपत्तीचा विचार करत नसून, सामाजिक उत्तरदायित्व म्हणून मोठे योगदान देत आहेत. अहवालानुसार, ६७ टक्के श्रीमंत आरोग्य क्षेत्रात सक्रियपणे कार्य करत आहेत, तर ४९ टक्के श्रीमंतांनी शिक्षण क्षेत्रातील सामाजिक उपक्रमांमध्ये गुंतवणूक केली आहे.

अतिश्रीमंत कुठे आणि कशी गुंतवणूक करतात?

हाय-ग्रोथ मालमत्ता(७०% पेक्षा जास्त गुंतवणूक) : ६८% गुंतवणूकदार. वार्षिक १३-१५% परताव्याची अपेक्षा : ४४%गुंतवणूकदार. थेट शेअर बाजारात (१०%पेक्षा जास्त गुंतवणूक) : ६७%

करत असते.

## अंतराळाचे अंतरंग- मंगळाचा गुरुत्वीय व्यत्यय आणि पृथ्वीचे हवामान

मंगळ आणि पृथ्वी यांच्या कक्षा एकमेकांच्या तुलनेत ठरावीक प्रमाणात सुसंगत हालचाल करतात. या सुसंगततेमुळे निर्माण होणारा गुरुत्वीय व्यत्यय पृथ्वीच्या कक्षेतील सूक्ष्म बदलांना चालना देतो. हे बदल इतके संथ असतात की, मानवी आयुष्यात त्यांची जाणीव होत नाही, पण भूवैज्ञानिक काळात ते निर्णायक ठरतात.

पृथ्वीचे हवामान हे केवळ वातावरणातील वायू, ढग, महासागरांचे प्रवाह किंवा मानवी हस्तक्षेप याचा परिपाक नाही. अंतराळाची दीर्घकालीन, संथ पण प्रभावी अशी खगोलीय यंत्रणादेखील त्यावर कार्य करत असते. पृथ्वी सूर्याभोवती फिरत असताना तिच्या हालचाली पूर्णपणे स्थिर नसतात. त्या हालचालींवर सौरमालेतील इतर ग्रहांचे गुरुत्वाकर्षण सतत परिणाम

अलीकडील संशोधनाने या प्राढियेत मंगळ ग्रहाची भूमिका समोर आणली आहे. पृथ्वीची सूर्याभोवतीची कक्षा पूर्णपणे गोल नसून किंचित लंबगोलाकार आहे. ही लंबगोलाकार कक्षा काळानुसार बदलत राहते. त्याचप्रमाणे पृथ्वीचा अक्ष साधारणपणे २३ अंशांनी झुकलेला आहे, पण हा झुकावही कायम समान राहत नाही. कधी तो वाढतो, कधी कमी होतो. या दोन बदलांमुळे पृथ्वीवर किती सूर्य ऊर्जा पोहोचते, ती कुठल्या अक्षांशांवर अधिक केंद्रित होते आणि ऋतू किती तीव्र असतात हे ठरते. या दीर्घकालीन बदलांमुळेच पृथ्वीवर हिमयुगे येतात आणि नंतर उष्ण काळ निर्माण होतो.

या पांना वैज्ञानिक भाषेत 'दीर्घकालीन खगोलीय हवामान पा' असे म्हणतात. ज्यावर सौरमालेतील ग्रहांचे गुरुत्वाकर्षण प्रभाव करते. आतापर्यंत प्रामुख्याने गुरू ग्रहाच्या भूमिकेवर भर दिला जात होता. कारण त्याचे वस्तुमान प्रचंड आहे. मात्र अलीकडील अभ्यासातून असे दिसून आले आहे की, मंगळ ग्रह जरी

आकाराने लहान असला तरी त्याचा परिणाम दुर्लक्षित करता येण्यासारखा नाही. मंगळ ग्रहाचे वस्तुमान पृथ्वीच्या सुमारे दहाव्या भागाइतके आहे व सूर्यापासूनचे अंतर पृथ्वीच्या कक्षेच्या तुलनेत थोडे अधिक आहे.

या स्थानामुळे मंगळ आणि पृथ्वी यांच्या कक्षा एकमेकांच्या तुलनेत ठरावीक प्रमाणात सुसंगत हालचाल करतात. या सुसंगततेमुळे निर्माण होणारा

गुरुत्वीय व्यत्यय पृथ्वीच्या कक्षेतील सूक्ष्म बदलांना चालना देतो. हे बदल इतके संथ असतात की, मानवी आयुष्यात त्यांची जाणीव होत नाही, पण भूवैज्ञानिक काळात ते निर्णायक ठरतात. मंगळ ग्रहाचे वस्तुमान बदलले किंवा तो अस्तित्वातच नसता तर पृथ्वीच्या कक्षेवर काय परिणाम झाला असता? मंगळ ग्रह नसता तर पृथ्वीची कक्षा अधिक अस्थिर झाली असती. तिच्या कक्षेतील लंबगोलाकारता अधिक वेगाने बदलली असती आणि अक्षीय झुकावातील चढ-उतार अधिक टोकाचे झाले असते. याचा थेट परिणाम पृथ्वीवरील दीर्घकालीन तापमान वितरणावर झाला असता. ध्रुवीय भागांमध्ये हिमनद्या अधिक वेगाने वाढल्या किंवा वितळल्या असत्या. हिमयुगांचा कालावधी, त्यांची तीव्रता, त्यांतील अंतर आज आपल्याला माहीत असलेल्या भूगर्भीयाढियांपेक्षा वेगळे दिसले असते.

पृथ्वीवरील जीवसृष्टीचा उपांतीचा प्रवासही त्यामुळे वेगळ्या मार्गाने घडला असता. महत्त्वाची बाब म्हणजे हा प्रभाव तत्काळ होत नाही. मंगळ ग्रहाचा हस्तक्षेप क्षणिक हवामान घटनांवर परिणाम करत नाही. तो पावसाचे प्रमाण, वादळे किंवा एका दशकातील तापमान बदल ठरवत नाही. त्याचा प्रभाव लाखो वर्षांच्या कालखंडात पृथ्वीच्या हवामानाची चौकट ठरवणारा आहे.

पृथ्वीवर जीवन टिकून राहण्यासाठी आवश्यक असलेली तुलनात्मक स्थिरता या गुरुत्वीय संतुलनामुळेच निर्माण झाली असावी असा विचार मांडला जात आहे. पृथ्वी ही स्वतंत्र प्रणाली नाही. ती सौरमालेतील गुरुत्वाकर्षणाच्या जाळ्यात घट्ट गुंतलेली आहे.

मंगळ ग्रह या जाळ्यातील एक सूक्ष्म पण महत्त्वाचा आपल्या जवळ असलेला धागा आहे. त्याची उपस्थिती पृथ्वीच्या कक्षेला एका मर्यादेत बांधून ठेवते.

पृथ्वीच्या हवामानाचा संपूर्ण इतिहास समजून घ्यायचा असेल तर खगोलीय घटकांचा विचार अपरिहार्य आहे. पृथ्वीवर घडणा?या मोठ्या प्राढिया अनेकदा आपल्या दृष्टीआड, संथ आणि शांतपणे कार्यरत असलेल्या शक्तींनी घडवलेल्या असतात.

पृथ्वीचे हवामान हे स्थानिक किंवा केवळ ग्रहांतर्गत वास्तव नसून ते सौरमालेतील परस्परसंलग्न हालचालींचा परिणाम आहे.

मंगळ ग्रह त्या प्राढियेतील एक लहानसा पण निर्णायक घटक आहे.

